२५ जानेवारी १९६९

किंमत : ६० पैसे




१०१५ ते १०२५ सदाशिव....शुभकामना

# माणूस





# शुभ कामना....

जेमतेम ताठ बसता येईल अशा १०१५ सदाशिव येथील आनंद कार्यालयाच्या दर्शनी बाजूच्या तीन-चार फूट उंचीच्या माळयावर आठ वर्षांपूर्वी ' माणूस 'चा जन्म झाला. दर आठवडयाला जमीन शेणाने सारवावी लागे आणि दिवसातून एखाद्याला तरी ताठ उभे राहिल्याबद्दल, वाकून न चालल्याबद्दल या माळयाने प्रसाद दिल्याशिवाय सोडले नव्हते. या प्रसादाचा पहिला मान मालकालाच मिळाला हे आजही आठवते आहे. ' आनंद 'चे दादा जोशी नवीन सारवून स्वच्छ केलेली जागा पाहायला म्हणून सहज वर आले आणि जिन्याजवळच डोक्यावरच्या लाकडाने असा तडाखा दिला की, घेरी येऊन ते मटकन काही वेळ खालीच बसले. या माळयाचे महिना भाडे होते फक्त पंधरा रुपये. त्या वेळी हेही खूप वाटत होते हे वेगळे. पुरंदरे शिवचरित्राची पहिली आवृत्तीही येथेच गुपचुप प्रसिद्ध झाली आणि संपलीही.

यानंतर ' माणूस ' ४१९ नारायण येथील गोखले वाडयात आला. आल्या-आल्याच पानशेतच्या तडाख्यात सापडला, पण सरकारी किंवा निमसरकारी अशा कोणत्याही मदतीची वाट न पाहता मित्रांच्या साहाय्याने यातून कालांतराने सही-सलामत बाहेरही पडला. मासिकाचे पाक्षिक, पाक्षिकाचे साप्ताहिक, आकारात बदल ही स्थित्यंतरे येथेच झाली. येथूनच तो सुप्याला विहीर खणायला गेला, त्याने ' अन्नसंचलना 'त भाग घेतला. बारा बाय अठराच्या या लहानशा खोलीतच ' बिहार परिवारा 'च्या कामासाठी तरुण जमत होते, साहित्यिकांची ' दक्षिणायने 'ही येथूनच निघत होती. या जागेने ' नाझी भस्मासुराचा उदयास्त ' पाहिला, ' व्होल्गा ' येथे 'लाल' झाली, 'ड्रॅगनला'ही येथेच 'जाग' आली. प्रभात फिल्म कंपनी, मा. विनायक या पुरवण्याही रात्ररात्र जागून येथेच सजवल्या गेल्या. ' संगम 'च्या माधवराव पटवर्धनांसारखा एखादा रसिक मुद्रक आणि सच्चा मित्र जाहिरातींचा प्राणवायू

कव्हर पान ३ वर......

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : पस्तिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. ७ जानेवारी, ६९

'माणूस'मध्ये पूर्वी जशा लेखमाला येत होत्या तशा आजकाल येत नाहीत. शिवाय 'दिल्लीदरबार'ही बंद झाल्यामुळे 'माणूस'ची चवच गेल्यासारखे वाटते. शिवाय ब. मो. पुरंदरे यांचे 'पुरंदरच्या बुरुजावरून' हे अत्यंत चांगले सदरही नियमित येत नाही. त्यामुळे कधी कधी असे वाटते की, 'माणूस'चा दर्जा (Standard) कमी होत चालला आहे की काय? 'व्होल्गा जेव्हा लाल होते', किंवा 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' यांसारख्या लेखमालेची अपेक्षा करावी काय? 'तो मी नव्हेच', 'मुंबई समाचार' बरे वाटले. काश्मीर, दक्षिणायन, बंगाल, आसाम यां-

मूल्य ६० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कल्पित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

सारख्या राजकीय स्वरूपाच्या लेखमाला सुरू केल्यास बरे होईल. विद्यार्थ्यांसाठी काही विधायक कार्यक्रम आखल्यास बरे होईल.

**द. मो. पुरंदरे,** औरंगाबाद

**स. न.** **जानेवारी, ९**

'तो मी नव्हेच' या क्रिमिनल गोष्टीत ॲ. कानिटकर ता. ४ च्या अंकात लिहितात, सरदार लाभसिंगाची जयपालकौर ही चौथी व शेवटची मुलगी म्हणून. आणि ता. ११ जानेवारीच्या अंकात पुढील भाग लिहिताना त्यांनी जयपालकौरला पाचवी बहीण 'हरबीरकौर' दाखविली आहे, हे कसे? सुंदर कथारचनेचा त्यामुळे विचका उडाला आहे.

**गो. बा. सामंत,** कामण (वसई)

**स. न.** **जानेवारी, १०**

आपल्या 'माणूस'च्या असंख्य नियमित वाचकांपैकीच मीही एक असून इतका दर्जेदार अंक मी क्वचितच पाहिला असेल.

आपल्या ४ जानेवारीच्या अंकापासून सुरू झालेल्या 'तो मी नव्हेच' या खटल्याचे आतापर्यंत सादर केलेले दोनही भाग वाचले. ॲड. माधव कानिटकर यांच्या शैलीने नटलेले हे लेखांक केव्हा एकदा वाचून संपवतो असे झाले आहे.

४ जानेवारीच्या अंकातील 'डॉक्टर' या गोष्टीला तोड नाही. गोष्टीचा शेवट अत्यंत हृदयस्पर्शी आहे.

११ जानेवारीच्या अंकातील 'तोच चंद्रमा नभात' हा, तसेच 'राजाजी व साथीजी' हे वैचारिक लेख आवडले. ग्यानबांच्या मुक्ताफळातील मार्मिक टीका वाचून अतिशय आनंद झाला. तिळगुळासारख्या गोड गोड शब्दांतून तिखट व मार्मिक टीका करण्याची त्यांची शैली कौतुकास्पद.

मात्र 'घरची राणी'चे परीक्षण वाचून 'हे मात्र फारचं झालं!' असं वाटलं.

**सतीश ब. दळवी,** शिवाजीनगर

**स. न.** **जानेवारी, ११**

'माणूस'च्या दिवाळी अंकापासून 'माणूस'चे स्वरूप खालावत चालले आहे असे दिसते. दिवाळीपूर्वीचे अंक आणि आताचे अंक यांत पुष्कळच अंतर आहे. हल्ली वाचनीय असे क्वचितच सापडते. एकंदरीत अंक कंटाळवाणेच निघतात. कधीतरी प्रसिद्ध होणाऱ्या श्री. अनंत भावे किंवा श्री. व. मो. पुरंदरे यांच्या लिखाणाशिवाय अंकात आकर्षक असे काही नसतेच. त्यांतल्या त्यात 'ग्यानबाचे गुऱ्हाळ' मात्र छान रंगते!

**मधुकर राजाराम कुलकर्णी,** डोंबिवली.

स. न. जानेवारी, ८

आपला ४ जानेवारी ६९ चा अंक वाचला. अतिशय आवडला. सौ. मुक्ता केणेकर यांची ' डॉक्टर ' ही कथा खरोखरीच हृदयद्रावक अशीच आहे पण त्यातील डॉक्टरांचे व्यक्तिचित्रण मनाला पटत नाही. माणूस कितीही दुष्ट असला अन् त्यात हा डॉक्टर—तरी तो असा निघृणपणा कधीच करणार नाही. डॉक्टरीच्या धंद्यात ' माणसाला शेवटपर्यंत वाचविण्याचा प्रयत्न करीन ' अशी शपथ घ्यावी लागते.

तसेच अॅड. कानिटकर यांचा ' तो मी नव्हेच ' हा खून खटला चालू जमान्यात विचार करावयास लावणारा आहे. याशिवाय श्री. शरद गोखले यांनी नाट्यमहोत्सवाचे परीक्षण करताना केलेल्या सूचना खरोखरीच नाट्यसंस्थाच्या चालकांनी विचार करण्यासारख्या आहेत. नवोदित नट, कथाकार, दिग्दर्शकांना वाव देणे, आशीर्वाद देणे हे आता अनुभवी महर्षींचेच काम आहे.

तसेच ' मुक्ताफळे ' या सदरातील राज्यारूढ पक्षावरील बोचरी टीका अतिशय मार्मिक अशीच आहे.

**अशोक दातार, पुणे**

स. न. जानेवारी, १०

आपल्या साप्ताहिकातील महाराष्ट्र नाट्य स्पर्धेवरील समीक्षण वाचले.

पी. डी. ए. वरील टीका अत्यंत औद्धत्यपूर्ण वाटली. संस्थेच्या सदस्यांखेरीज अशी टीका करण्याचा अधिकार कोणालाच-समीक्षकाला तर-नाहीच नाही.

संस्था चालवताना काय अडचणी येतात आणि त्याला योग्य कर्णधार नसल्यास ती कशी भरकटत जाते हे मान्यवर संस्थांचे इतिहास चाळून पाहिल्यास कोणाच्याही लक्षात येईल. संस्था स्थापन करणे सोपे आहे, चालविणे नाही. तेव्हा संस्थांच्या आणि त्यांतल्या त्यात मान्यवर संस्थांच्या भरीस कुणी पडू नये हे बरे.

दुसरा प्रश्न पात्रांसंबंधी. स्पर्धेसारख्या ठिकाणी पात्रे कुठली व कोण ठेवावयाची याचा विचार बाहेरच्यांनी का करावा ? इतकी वर्षे मानाचे स्थान मिळविणाऱ्या संस्थेने स्पर्धेला आपले स्वतःचे मोहरे इरेला घालणे हे योग्यच आहे. त्यांची स्वयंपूर्णता इतकी आहे की योग्य पात्रांकरता त्यांना बाहेर बघावे लागत नाही.

सर्वांत शेवटी, ह्या मान्यवर संस्थांना निवृत्त व्हा म्हणून सांगणे ह्याची इतरांना लाज वाटली पाहिजे. त्यांच्यावर मात करून निवृत्त करण्याची जिद्द हवी. तोंड वेंगाडून नाही.

**अनंत ओक, पुणे**
(दिग्दर्शक ' मीही एक जटायू ')

◻

# अन्नस्वतंत्रता आणि पुढे

'श्रीकैलास ते सिंधुसागर' हे अन्नस्वतंत्रता संचलन गेल्या सव्वीस जानेवारीला वेरूळ येथे सुरू झाले होते. अन्नासाठी यापुढे भारताने जगभर भिक्षा मागत हिंडू नये, फुकट मिळाली तरी अन्नधान्याची मदत स्वीकारू नये, ही या संचलनामागील तात्कालिक भूमिका होती. एकवेळ 'भूकबळी' होऊ, पण 'भीकबळी' होणार नाही ही या मोर्चाची गावोगाव घुमलेली घोषणा होती. ही घोषणा, संचलनामागील हा विचार, आता वातावरणाशी एकरूप झालेला आहे. विनोबा-जयप्रकाशांपासून तो डाव्या साम्यवाद्यांपर्यंत सर्वांनाच असे वाटू लागलेले आहे की, निदान परकीय अन्नमदत तरी तावडतोब बंद करणे आपल्याला अशक्य नाही. काहींचे मत तर असे आहे, की ही मदत बंद केल्याशिवाय, पी. एल्. ४८० सारखे करार रद्द केल्याशिवाय आपल्या शेतीचा व एकूण अर्थव्यवस्थेचा कायापालट होऊच शकणार नाही. अनेक अर्थशास्त्रज्ञांनीही अन्नस्वतंत्रतेचा जोरदार पुरस्कार केलेला आहे. ७१ सालपर्यंत हे ध्येय साध्य व्हावे यासाठी शासनाचेही प्रयत्न जोरात सुरू आहेत.

परंतु या संचलनाच्या निमित्ताने जो अधिक व्यापक विषय निदान मराठी जनतेसमोर उभा राहिला तो विशेष महत्त्वाचा आहे. दोन-तीन वर्षांत परकीय अन्नमदत बंद होईल, पी. एल. ४८० सारखे करार पुन्हा केले जाणार नाहीत, आपल्या वाट्याला आलेले एक लाजिरवाणे दुःख हलके होईल असे समजून चालू. पण मूलभूत अर्थाने आपण स्वावलंबी होण्याच्या मार्गावर आहोत, की आपली सारीच अर्थव्यवस्था हळूहळू परकीयांच्या आधीन होत आहे हा खरा प्रश्न आहे. धान्यमदत बंद झाली आणि खतांसाठी वा ट्रॅक्टरच्या सुट्या भागांसाठी पुन्हा परक्यांवर अवलंबून राहावेच लागले तर अन्नधान्याबाबत आपण स्वावलंबी आहोत हे आपले समाधान कितपत भरीव आहे? औद्योगिक क्षेत्रात परकीय मक्तेदारांचे जाळे घट्ट विणले गेलेले आहे. शेतीक्षेत्रातही हे जाळे यापुढे पसरणार असेल तर या सर्वच प्रगतीचा



आपण मुळापासून पुन्हा विचार केला पाहिजे. एकाच औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्राची वसाहत हे आपले पारतंत्र्यकाळातील स्वरूप होते. याऐवजी दोन-चार पुढारलेल्या राष्ट्रांच्या मेहेरबानीवर व आश्रयावर कसाबसा जगणारा एक दुय्यम दर्जाचा देश असे आपले स्वरूप ठरू पाहत आहे. आपल्या वसाहतीच्या दर्जात यामुळे फारसा बदल होत नाही. औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांची गुलामगिरी या नाही त्या स्वरूपात कायमच राहणार असेल तर आपल्या विकासाला, आपल्या स्वातंत्र्याला अर्थ काय, हा अन्नस्वतंत्रता संचलनाने उपस्थित केलेला मूळ प्रश्न आहे.

हा प्रश्न बहुतेक नवस्वतंत्र देशांसमोर आज उपस्थित झालेला आहे. याचे कारण असे संभवते. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर आर्थिक विकास हे या देशांसमोरील प्रधान उद्दिष्ट ठरले. या विकासाकडेही या देशांनी पश्चिमेच्या, आपल्यावर एकेकाळी राज्य करणाऱ्यांच्याच दृष्टिकोणातून पाहिले. त्यामुळे विकासाचा अर्थ कारखानदारी, औद्योगीकरण हा ठरला. यंत्रे आली, शहरे वाढली, प्रचंड श्रमशक्ती, विपुल निसर्गसंपत्ती यांकडे दुर्लक्ष झाले. बहुतेक नवस्वतंत्र देश कृषिसंस्कृतीच्या परंपरेत शतकानुशतके मुरलेले होते. औद्योगिक संस्कृतीशी सुरू झालेल्या या स्पर्धेत हे देश दोन–तीनशे वर्षांपूर्वी दुर्दैवाने मागे पडले. दरिद्री होते म्हणून मागे पडले हे खरे नाही. इंग्रज येथे स्थिरावण्याची कारणे तो आपल्यापेक्षा श्रीमंत होता, प्रगत होता ही नव्हेत. मँचेस्टरला गिरण्या सुरू होण्यापूर्वी खुद्द इंग्लंडच्या बाजारपेठांतही भारतीय कापडाला मागणी होती. इंग्लिश वखारवालेच हा व्यापार करीत असत. इंग्लंडात औद्योगिक क्रांती झाली आणि स्पर्धा नको म्हणून ब्रिटिशांनी येथील उद्योगधंदे मारून काढले, असा खरा प्रकार आहे. कृषी उद्योगांचा जो एक समतोल येथे अस्तित्वात होता तो या घटनेने बिघडला. हा समतोल

**पुन्हा स्थापन करणे, कृषिप्रधान अर्थरचनेची उभारणी करणे यादृष्टीने स्वातंत्र्या-नंतर विकासाची आपली वाटचाल सुरू व्हायला हवी होती.** कृषिविद्या ही येथील बहुसंख्य जनतेच्या हाडीमाशी मुरलेली विद्या होती. दीडशे वर्षांच्या पारतंत्र्यकाळातील शोषणाचे काही दुष्परिणाम धुवून काढण्याची आवश्यकता जरूर होती. पण यासाठी इतरांवर अवलंबून राहण्याचा प्रश्न नव्हता. आपल्याच श्रमांवर व ज्ञानावर विसंबून आपण कृषिउत्पादन काही प्रमाणांत वाढवू शकलो असतो. तशी नैसर्गिक अनुकूलता आपल्याजवळ होती व आहेही. कृषीतील अतिरिक्त उत्पादनातून औद्योगिक प्रगतीची सोय लावणे हा वास्तविक आपल्या-सारख्या कृषिप्रधान देशाचा विकासक्रम. परंतु दीडशे वर्षांच्या परकीय संस्कारांचा प्रभाव असा की हा क्रम आपल्याला जुनाट व मागासलेपणाचे द्योतक वाटला आणि पाश्चात्य छापाच्या औद्योगीकरणालाच आपण प्रगती समजलो. वस्तुत: ही परगती होती. व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारित असलेल्या औद्योगिक संस्कृतीने मळवलेली ही वाट आपल्या प्रकृतिविकृतीशी फारशी जुळणारी नव्हती. आपल्या स्वतंत्र आवि-ष्कारांना यात फारसा वाव नव्हता.

आणि ही वाट एकदा स्वीकारल्यावर प्रगतीच्या प्रत्येक नव्या टप्प्यासाठी प्रगत औद्योगिक देशांची मदत व त्यातून उद्भवणारे परावलंबन अपरिहार्य ठरले; पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळापेक्षा चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात परावलंबन कमी होण्याऐवजी कित्येक पटींनी वाढलेच आहे. इतके की, योजनेचा आकार, तिची सुरुवात किंवा अंमलबजावणी सारेच काही परकीय मदतीवर आता विसंबून आहे.

परावलंबन एका नव्या गुलामगिरीकडे नेणारे आहे. नववसाहतवादाचा धोका यातूनच उद्भवतो. दीड-दोनशे वर्षांपूर्वी पाश्चिमात्य देशांचे पूर्वेकडील आक्रमण सुरू झाले. त्यांनी वसाहतींचे पद्धतशीर शोषण सुरू केले. आपल्याकडील संपत्तीचा ओघ खेड्यांतून प्रथम शहरांकडे, शहरांतून नंतर विलायतेकडे वाहू लागला. या शोषणाचे स्वरूप जसजसे उघड होऊ लागले तसतशा एकेका देशात राजकीय स्वातंत्र्यासाठी चळवळी सुरू झाल्या. एकापाठोपाठ एक देश स्वतंत्र झाले. आपल्या देशातून इंग्रज गेले, व्हिएटनाममधून फ्रेंच गेले, डच परतले, पोर्तुगीजांनाही माघार घ्यावी लागत आहे. सर्व ठिकाणी देशी राजवटी आल्या, परंतु बहुतेकांना हे शोषण-चक्र थांबवता किंवा विरुद्ध दिशेला फिरवता आले नाही. त्यामुळे एक परकीय गेला तरी दुसऱ्यांना पुन्हा बोलवून घ्यावे लागले. बोलावण्याचे प्रकार वेगळे, आल्या-वर तळ ठोकण्याचे मार्ग वेगळे. पण मतलब तोच. बहुतेक नवस्वतंत्र देशांतून पूर्वी-पेक्षाही अधिक संपत्ती प्रगत औद्योगिक देश वाहून नेत आहेत. भौतिक संपत्तीपेक्षाही मानवी संपत्तीची लूट तर फारच भयानक आहे. बुद्धिमान तरुणांचा लोंढा खेड्यांतून शहरांकडे आणि शहरांतून परदेशांकडे या सर्व गरीब व नवस्वतंत्र देशांतून सतत

वाहतो आहे. हा ओघ थांबवला नाही तर वाटेल तेवढी परकीय मदत मिळवा, सहयोग–सहकार्याचे करार करा, कुठलाच नवस्वतंत्र देश प्रगत औद्योगिक राष्ट्रांच्या बरोबर येऊ शकणार नाही, या राष्ट्रांचे वर्चस्व कायमचे झुगारू शकणार नाही. राजकीय स्वातंत्र्याचे अलंकार यामुळे अनेकदा शोभेचे ठरतात. या नवस्वतंत्र देशांचे सार्वभौमत्वही कित्येकदा संकटात सापडते. जसे आपले ताश्कंदला किंवा कच्छ-प्रकरणी झाले तसे. या कोंडीतून सुटण्याचा मार्ग एकच असतो. या नववसाहतशाही-विरुद्ध झगडण्याची ईर्ष्या बाळगणे, आपली अर्थव्यवस्था स्वावलंबी व मजबूत बनविणे. नवस्वतंत्र देशांतील राष्ट्रवादी शक्तींसमोरील हे प्रधान कार्य असते. यात या शक्ती अपयशी ठरल्या तर यादवी, हिंसक क्रांती, लष्करी राजवटी या चक्रात हे देश सापडतात. जागतिक पटावर दुसऱ्याने पुढेमागे करावयाची सोंगटी एवढाच त्यांच्या स्वातंत्र्याला अर्थ उरतो. आशिया-आफ्रिकेतील अनेक देशांच्या बाबतींत हे घडलेले आहे. आपल्याकडे हे घडणारच नाही अशा भ्रमात राहणे चूक ठरेल.

आपल्या नियोजनाची दिशा यासाठी बदलली पाहिजे. अन्नधान्य व कपडालत्ता ही प्राथमिक गरज लक्षात घेऊ. मुंबईत व इतरत्रही कापड गिरण्या घडाघड बंद पडत आहेत. कामगारांवर बेकारी कोसळत आहे. या जुन्या गिरण्या चालू करायच्या तरी त्यासाठी कोटचवधी रुपये भांडवल म्हणून ओतावे लागणार आहेत. एवढे भांडवल ओतूनही तयार झालेल्या कापडाला गिऱ्हाईक मिळण्याची शाश्वती नाहीच. यापेक्षा हे कोटचवधी रुपये कामगारांच्या शेती पुनर्वसनासाठी खर्च केले तर शेती-लाही नव्या दृष्टीचा व ताज्या दमाचा लाभ होईल, बेकारी हटेल. वाढत्या शहरांची डोकेदुखी कमी होईल. मुंबईच्या अनेक कामगारांची खेड्यात कुठे न कुठे सोय आहे. थोडीफार जमीन तो किंवा त्याचे भाऊबंद बाळगून आहेत. ही जमीन आज दुर्लक्षित म्हणून कमी उत्पादक आहे. परंतु मशागत केली, थोडेफार भांडवल घातले तर दोन–चार एकरांतूनही कुटुंबाचे पोषण होईल एवढे उत्पन्न निघू शकते. यासाठी एक निधी, एक कायम स्वरूपाची यंत्रणा उभी करावी लागेल. खेड्याकडे पुनर्वसना-साठी निघालेल्या कामगारांची भांडवलाची व यंत्र-तंत्रज्ञानाची विश्वासार्ह सोय करावी लागेल. कामगारसंघटना, सरकार, उद्योगपती, बँका या सर्वांच्या सहकार्या-नेच हे काम व्यवस्थित पार पडू शकेल. सुरुवातीला काही खास आकर्षणेही ठेवावी लागतील. परंतु योजना शास्त्रशुद्ध असल्यावर थोडीफार सक्तीनेही ती गळी उतरवणे अवश्य ठरेल. शेतीत ज्या वेळी काम नसते किंवा कमी असते अशा वेळी, वर्षातून दोन–चार महिने बंद पडलेल्या जुनाट गिरण्या चालू ठेवाव्यात, खेड्यांत पुनर्वसना-साठी गेलेल्या कामगारांना त्यांत काम द्यावे, तयार झालेले कापड ना नफा ना तोटा या तत्त्वावर कामगारांना व इतरांनाही विकून गिरणी चालू ठेवण्यासाठी अवश्य असणारा पैसा खेळता ठेवावा. ज्या गिरण्या उत्तम स्थितीत आहेत त्यांना आपला माल फक्त परदेशांतच विकण्याची काही काळ सक्ती करावी. हे तलम

व भारी प्रतीचे कापड काही काळ आपल्यापैकी कोणाच्याही अंगावर झळकले नाही तर फारशी काही सौंदर्यहानी होणार नाही. यापेक्षा हा ओघ आपल्या शेतामातांतून, खेड्यापाड्यांतून वळला तर दहा–पाच वर्षांत चित्र बदलून जाईल. आपली शेती, आपली खेडी नव्या रक्ताच्या, ताज्या दमाच्या अशा पुनर्वसनासाठी फार भुकेलेली आहेत. नवीन जमीन आपल्याकडे लागवडीखाली येण्याची शक्यता आता फार थोडी आहे. आहे त्याच जमिनीवर अधिक खोल व बारीक मशागत केली पाहिजे. यासाठी पिढ्यान् पिढ्या ज्याला शेतीचा अनुभव आहे, ज्याचे आजही शेतीशी, खेडेगावांशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत अशा शहरांतील नव्या दृष्टीच्या कामगारवर्गाची योजना अधिक फलदायी ठरेल. संस्कार म्हणून, खेळीमेळीचे उत्सव म्हणून, विद्यार्थ्यांची श्रमशिबिरे वगैरे कार्यक्रम ठीक आहेत. परंतु आपल्यासमोर परकीय मदत न स्वीकारता अन्नवस्त्रादिकांच्या आपल्या गरजा भागविण्याचा, प्रत्येकाला पुरेसे काम व कामाप्रमाणे दाम मिळवून देण्याचा, कर्जात बुडालेली व त्यामुळे परक्यांच्या हस्तक्षेपाला बळी पडत चाललेली अर्थव्यवस्था स्वतंत्र करण्याचा घोर प्रश्न आहे. तो सोडविण्यासाठी अवघियांनी हिंमत बांधून असेच काहीतरी सामुदायिक चलन-वलन सुरू करणे निकडीचे आहे. विचारार्थ म्हणून एक दिशा फक्त वर सुचविली आहे. आणखीही काही मार्ग निघू शकतील.

अनुकूल प्रतिसाद मिळाला तर या दृष्टीने अधिक विचारविनिमय करण्यासाठी मुंबई येथे शक्यतो लवकर एक परिषद घ्यावी असा अन्नस्वतंत्रता प्रयत्नाचा यापुढील टप्पा आहे. दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रात दुष्काळ पडला असता सुपे येथ विहीर खोदण्यापासून या अन्नस्वतंत्रता विचाराचा पाठपुरावा सुरू झाला. 'श्री-कैलास ते सिंधुसागर' संचलन यातूनच उद्भवले. आता परिषदेची संभाव्य योजना. ज्यांना ज्यांना या विषयात काही गती आहे, आस्था आहे अशांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले तरच ही परिषदही मागील दोन कार्यक्रमांप्रमाणे तडीस जाईल. एका नव्या मार्गाचा शोध परिस्थितीने अनिवार्य ठरवलेला आहे. कदाचित 'जुनाट' म्हणून स्वातंत्र्यानंतर आपण त्याज्य ठरवला तोच साफसूफ करून पुन्हा वापरात आणावा लागण्याचीही शक्यता आहे. आपल्या शेतीचे उद्योगीकरण व उद्योगाचे ग्रामीकरण असे थोडक्यात या नव्या मार्गाचे ढोबळ वर्णन देता येईल. तपशील ? तो तर नेहमीच प्रत्यक्ष वाटचालीत ठरत असतो.

– श्री. ग. मा.

## मु क्ता फ ळे

**ग्या न बा**

# चार्लस वुल्फ आणि काँग्रेस वुल्फ

लबाड आणि दुष्ट राज्यकर्ते कसे वागतात याची ही कथा आहे. रूटर (की रॉयटर ?) या प्रख्यात वृत्तसंस्थेचा पेकिंग येथील बातमीदार व स्तंभलेखक अँन्थनी ग्रे या नावाचा इंग्लिश तरुण आहे. तिशीच्या वयाच्या या तरुणाला गेले दीड वर्ष लाल चीनने कसलेही आरोपपत्र दाखल न करता एका लहानशा खोलीत बंदिस्त करून ठेवलेले आहे. कुणीही त्याला भेटू शकत नाही. ब्रिटिश वकिलातीतील दोन अधिकारी, यांनीच काय ती १७ महिन्यांत त्याची एकदा १५-२० मिनिटे भेट घेतली होती. महिन्याला फक्त एक पत्र आपल्या इंग्लंडमधील आईला लिहिण्याची त्याला परवानगी आहे.

अँन्थनी ग्रे याला पकडून त्याच्यावर ही एकांतवासाची भयानक सजा लादण्याचे पेकिंग राजवटीला काहीही कारण नव्हते. ग्रे याने कसलाही गुन्हा केलेला नाही. माओ राजवटीतले एखादे गुपित त्याने जगाला जाहीर केलेले नाही किंवा लाल चीनमधील एखाद्या साहित्यिकाची कादंबरी चोरून देशाबाहेर प्रसिद्धीसाठी दिलेली नाही. गतवर्षी ब्रिटिशव्याप्त हाँगकाँगमध्ये जो दंगा झाला, त्यात दंगल केल्याच्या आरोपावरून आठ डाव्या विचारसरणीच्या चिनी वृत्तपत्रव्यावसायिकांवर ब्रिटिश सरकारने खटले भरून त्यांना शिक्षा ठोकल्या. या आठ चिनी भाईंना सोडून द्या, असे काहीही न सांगता, दुष्ट माओने ग्रे याला पकडून ठेवले आहे. ब्रिटिश सरकारला याचा अर्थ न सांगताही समजला ! त्यांनी मुकाट्याने या आठही डाव्या भाईंना विनशर्त मुक्त केले. मग ब्रिटिश सरकार बसले वाट पाहत. ग्रे आता सुटेल— मग सुटेल ! परंतु नीच माओने काही ग्रेला सोडले नाही. शेवटी नाक मुठीत धरून, ब्रिटिश सरकारने माओला पत्र लिहिले. आधी तुमची माणसे सोडली, आता ग्रेला कधी सोडता ? त्याची वृद्ध आई इंग्लंडमध्ये वाट पाहत आहे. आम्ही ज्यांना

पकडले त्यांनी गुन्हा केलेला होता. ग्रेने तर कसला गुन्हाही केलेला नाही ना ? मग सोडा ना हो आता त्याला...!

पेकिंग सरकार असले हरामखोर, त्यांनी ब्रिटिश सरकारला कळवले–दर महिन्याला ॲन्थनी आईला पत्र पाठवतो, यावरून त्या म्हातारीला आपला मुलगा मेलेला नाही हे समजलेच आहे ! तुम्ही आठ लोकांना सोडलेत, उपकार झाले. परंतु इतर आणखी १३ चिनी अजून तुरुंगात आहेत. त्यांना तुम्ही सोडलेले नाही.

माओ राजवटीची ही नाक दाबून तोंड उघडण्याची नीती फारच निषेधार्ह आहे. असे का कुणी करतात ? ब्रिटिश सरकार फारच पंचाइतीत आले आहे. एक ग्रे तुरुंगात आहे, परंतु ब्रिटिश सरकार अखेर उरलेल्या तेरा जणांना मुक्त करूनही कदाचित ॲन्थनीला सोडवील अशी शक्यता आहे.

दुष्ट, नीच माओ राजवटीची ही नीती मानवतेला काळिमा वगैरे फासणारी आहे ! आपले भारत सरकार असे खालच्या पातळीवर जाऊन कधीही वागणार नाही. गोव्याच्या मुक्तिसंग्रामात २६ वर्षांची सश्रम तुरुंगवासाची शिक्षा भोगत असलेला मोहन रानडे लिस्बनच्या तुरुंगात खितपत आहे. त्याची वृद्ध माता त्याच्या भेटीची आशा हरवून बसली आहे. रानडे पकडला गेला त्यानंतर गोव्याचा पोर्तुगीज गव्हर्नर, त्याची वायकापोरे आणि इतर पुष्कळ सटरफटर पोर्तुगीज अधिकारी भारत-सरकारच्या हाती पडले होते. या सर्वांना डांबून ठेवून पोर्तुगीज सरकारला भारत सरकारला नसते का सांगता आले–" रानडे व त्याचा सहकारी यांना मुक्त करीत असाल तरच ही मंडळी इथून बोटीत पाय ठेवू शकतील. " यामुळे कदाचित सालाझारने रानडेला सोडलेही असते. गव्हर्नरसाहेबांचा गोतावळा मगच लिस्बनला गेला असता ! परंतु असा दुष्टपणा आपल्या सरकारने केला नाही. सरकारने सर्व गव्हर्नरादी गोतावळ्याला न्हाऊ घातले, खाऊ घातले आणि चोळी-बांगडी देऊन लिस्बनला पाठवले. वर सांगितले –" आमचे ब्रिटिश मालक जर तुमच्याइतके सुंदर वागले असते, तर कदाचित भारतात गोव्याचा असा निराळा प्रश्नच राहिला नसता ! "

काही अटींवर मुक्तता करण्याची ' याचना ' मोहन रानडे यांनी सालाझार सरकारकडे केल्याचे वृत्त आता आले आहे ! भारत सरकार असा काही दुष्टपणा करील, ही आशा मावळल्यानंतर मोहन रानडे यांनी केल्या गोष्टीचा पश्चात्ताप होऊन हा मार्ग पत्करला असेल तर ते आपल्या परराष्ट्रनीतीला गौरवास्पद म्हटले पाहिजे. फादर फेरर, शेख अब्दुल्ला इत्यादी थोर थोर पुरुषदेखील आपल्या सरकारचे गोडवे गातात. समजा, आपला एखाददुसरा देशभक्त तिकडे तुरुंगात अनेक वर्षे खितपत राहिला तरीही जगात दुष्ट माणसांनीदेखील नावे ठेवावीत असे आपण काहीही करता कामा नये.

शिवाय आपला देश इतका बहुप्रसव आहे की इथे मोहनांना तोटा नाही !

थोर थोर मोहनांचा सहवास आपल्याला लाभतोच आहे. मग शांतताभंग करून उगाच सालाझारला दगड हाणण्यात तरी काय हशील ? चार्लस वुल्फने लिहिलेली ' दि बेरियल ऑफ सर जॉन मूर ' ही कविता जशी अजरामर आहे त्याचप्रमाणे पुढच्या पिढ्या अभिमानाने सांगतील–

—The burial of Mohan Ranade !
Slowly and gladly we let him down
From the field of his fame, fresh & gory
We carved not a line, we raised not a stone
But we left him alone with his story !

–Congress Wolf

---

## आशादायक भाकित

गेल्या आठवड्यात अमेरिकेतून भारताला एक दिलासा देणारी बातमी आली आहे. मार्लो या लेखकाच्या नाटकात ' हेलेन ऑफ ट्रॉय ' ही भूमिका करण्याकरिता मॅगी राईट ही इंग्लिश नटी न्यूयॉर्कला आली होती. हेलेनच्या भूमिकेत रंगभूमीवर ती निसर्गावस्थेत वावरली. मार्लोचे एक जुने नाटक तिने अल्पावधीत ज्याच्या


उत्तम शरीरसौष्ठवासाठी । भारतातील एकमेव

**तळवलकर व्यायामशाळा**

• अत्याधुनिक उपकरणे. • नियंत्रकांची वैयक्तिक देखरेख • निश्चित सर्वांगसुंदर सुधारणा • आत्मसंरक्षणासाठी " ज्युडो"-चे खास वर्ग • सर्वांना सोयीस्कर वेळा • स्त्रियांसाठी खास वर्ग.

१. ३३, क्वीन्स रोड, चर्नीरोड, मुंबई–४.
२. गोहील हाऊस ले. ज. रोड, माहीम, मुंबई–८६.
३. ५३२, लिंकिंग रोड, खार, मुंबई–५२.
४. " संगम ", घोडबंदर रोड, सांताक्रूझ, मुंबई–५४.

दूरध्वनि क्रमांक : ५३६७०६

Adimpact,

त्याच्या तोंडी तर केलेच परंतु वृत्तपत्रांना दिलेल्या मुलाखतीत ती म्हणाली,

मी अंगावर कपडे न घालता रंगभूमीवर वावरत होते तरी प्रेक्षकांत टाचणी पडली तर ऐकू जाईल इतकी शांतता होती. माझे असे माकित आहे, अंगावर कपडे न घालता वावरण्याची ही फॅशन हळूहळू लोकप्रिय होईल व प्रत्यक्ष व्यवहारातही कपड्यांचे बंधन उरणार नाही असे दिवस आता अमेरिकेत लवकरच येतील.

वा! छानच होईल. आपल्या देशातील कापडगिरण्या भराभर आजारी पडून बंद पडत आहेत. चरखा तर इतिहासजमा झाला आहे. अमेरिकेत जर लोकांनी कपडे न घालण्याचे ठरवले तर अर्थातच अमेरिकेतून भारतासारख्या देशाला कापडाची व तयार कपड्यांची भरपूर मदत मिळू लागेल.

मॅगी, यू आर खरोखरच राईट! हेलेन ऑफ ट्रॉय झिंदाबाद!! आम्ही नाटकाला सुयश चिंतितो!!!

---

## ते हवेच यात न पाप!

---

यंदाचे मराठी साहित्य संमेलन सुप्रसिद्ध कवि पुरुषोत्तम शि. रेगे यांच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथे थाटाने पार पडले. यंदा संमेलन 'गार' पडावे अशी इच्छा संमेलनाध्यक्षांनी सत्कारांच्या भाषणात व्यक्त केली होती, ती ठार चुकीची ठरली असली तरी संमेलनाचे यंदाचे अध्यक्ष कवि असल्याने संमेलन संपले तरी कवित्व मागे उरलेच!

संमेलनापूर्वी पुण्याला झालेल्या सत्कारसभेत पु. शि. रेगे यांनी ही साहित्य-संमेलने आता बंद करा, यंदाचे संमेलन हे शेवटचे ठरावे अशी आशा (की निराशा?) प्रकट केली होती. रेग्यांच्या या उद्गारांबरोबर श्रोतृवर्गात बसलेल्या भावी संमेलनाध्यक्षांच्या डोळ्यांपुढे झालेली संमेलने काजव्यासारखी चमकली! 'तू हवीस यात न पाप!' यासारख्या सुंदर कविता लिहिणाऱ्या कविवर्यांचे उद्गार ऐकून आम्हांला मात्र धक्का बसला. संमेलने बंद व्हावीत, नको ते संमेलनाध्यक्षपद, असे एखाद्याला वाटावे यात आक्षेपार्ह काहीही नाही. मात्र अध्यक्षपदाविषयी, संमेलनाचा वृत्तांत वाचल्यानंतर आमचे म्हणणे इतकेच आहे—

ते हवेच, यात न पाप
पण हवे असताना,
नकोच ते, नाहीच ते,
छे: हो कसले—बंद करा ते
यातच पाप.
—संताप आणि शिवाय नसता ताप! ○

चंद्रशेखर मराठे

# हरित-क्रांतीचे गौरवशाली प्रसादचिन्ह

निसर्गाची साथ आणि मानवी प्रयत्न यांचे संयुक्त फलित म्हणून भारतातील शेती-व्यवस्थेचा कायापालट होत असल्याची सुचिन्हे स्पष्ट दिसत आहेत. हरित-क्रांती (ग्रीन रेव्होल्यूशन) अद्याप अवतरली आहे किंवा नाही, याविषयी तज्ज्ञांचे मतभेद असले तरी तिची प्रसादचिन्हे दिसू लागली आहेत, याविषयी दुमत नाही. या हरित-क्रांतीच्या एका गौरवशाली पर्वाची ही कहाणी !

एप्रिल १९६१ पासून पंजाब राज्यातील लुधियाना जिल्ह्यास सघन शती-योजना लागू करण्यात आली. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १,४२० चौरस मैल असून लोकसंख्या ११ लाखांवर आहे. ४५,००० शेतकरी कुटुंबे १८८ खेड्यांमधील सुमारे ७,७४,००० एकर जमीन कसत आहेत. दुबार पिकांखालील क्षेत्र जमेसधरता जिल्ह्याचे लागणक्षेत्र १,०,३५,००० एकर आहे. पैकी ७२ टक्के जमिनीस पाणीपुरवठ्याची सोय उपलब्ध आहे. ओलित क्षेत्रापकी ८३ टक्के जमिनीस छोट्या पाणीपुरवठ्याच्या योजनांनी पाणीपुरवठा होतो. त्यांमध्ये विहिरी व ट्यूबवेल्स यांचा समावेश आहे. उरलेल्या १७ टक्के ओलित जमिनीस सरकारी कालव्यांकडून पाणीपुरवठा होतो. गहू, मका, भुईमूग, कपास व ऊस ही या जिल्ह्याची प्रमुख पिके होत. या पिकांखालील लागणक्षेत्र अनुक्रमे ४० टक्के, १३ टक्के, १६ टक्के, ६ टक्के व ३ टक्के असे आहे.

सघन शेतीयोजनेच्या पहिल्या पांच वर्षांत म्हणज १८६६ अखेरपर्यंत शेतीच्या सुधारलेल्या पद्धती अंमलात आणून शेतीचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न झाला. गेल्या दोन वर्षांत सुधारलेल्या बियाणांच्या द्वारा व संलग्न उपाययोजनांच्या द्वारा उत्पादन वाढविण्याची मोहीम राबविण्यात आली व अद्यापही येत आहे. १९६५–

६६ च्या रब्बी हंगामात 'लेर्मा रोजो' या बुटक्या गव्हाच्या जातीखाली १७२ एकर क्षेत्र होते व सुमारे १०० शेतकरी कुटुंबांनी या बियाणाचा वापर केला होता. १९६६–६७ सालात या जातीखालील क्षेत्र १८ हजार एकरांवर गेले व १९६६-६७ सालात गव्हाच्या या सुधारलेल्या जातीखालील क्षेत्र २,२४,००० एकरांवर गेले. सुमारे ३२,००० शेतकरी कुटुंबे या जातीचा वापर करीत आहेत. 'लेर्मा रोजो' हीच जात प्रामुख्याने प्रचारात असली तरी पीव्ही–१८, कल्याण–२२७, एस–३०८ इत्यादी जातीही लोकप्रिय आहेत.

परिणाम ? खालील अकडेवारीच पाहा–

| वर्ष | दर एकरी उत्पादन (मणांत) | एकूण उत्पादन (मणांत) |
|---|---|---|
| १९६०–६१ | १६·९ | ४५,३०,००० |
| १९६५–६६ | २४·२ | ९०,६०,००० |
| १९६६–६७ | २८·७ | १,०६,८०,००० |
| १९६७–६८ | ३६·३ | १४८,२०,००० |

गेल्या सात वर्षात दर एकरी उत्पादन ११४·८ टक्क्यांनी (वर्षाला सरासरी १६ टक्के) वाढले. याच काळात एकूण उत्पादन ४५ लाख मणांवरून १४८ लाख मणांवर गेले. म्हणजे २७·८ टक्के वाढ झाली. दर एकरी उत्पादनवाढीचा हा जागतिक उच्चांक आहे, असे या योजनेचे संचालक श्री. प्रीतमसिंग यांनी नमूद केले आहे.

मक्याच्या उत्पादनातदेखील स्थानिक बियाणांऐवजी संकरित मक्याचे बियाणे वापरण्याची मोहीम सुरू आहे. या मोहिमेमुळे मक्याचे सरासरी उत्पादन ८३ टक्क्यांनी वाढले असून गेल्या सात वर्षांत मक्याचे एकूण उत्पादन अडीच पटींनी वाढले आहे. सध्या २४ हजार एकर क्षेत्र संकरित मक्याखाली आहे. पुढील वर्षी हे क्षेत्र ४० हजार एकरांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांना देण्यात आलेले समग्र शिक्षण, खताचा वाजवी पुरवठा व पीक संरक्षक उपाययोजना या त्रिसूत्रीमुळे संकरित मकायोजना यशस्वी होऊ शकली.

भुईमुगाखाली १९६०–६१ मध्ये ६७ हजार एकर क्षेत्र होते ते १९६७–६८ साली १,८४,००० एकर झाले. त्याचे दर एकरी उत्पादन याच काळात १० मणांवरून १७ मणांवर गेले तर प्रत्यक्ष एकूण उत्पादन ६,८०,००० मणांवरून ३२,६०,००० मणांवर गेले.

गहू, मका व हरभरा या धान्यांचे उत्पादन या काळात सुमारे ९० टक्क्यांनी

वाढले. योजनेतील उद्दिष्ट ५० ते ६० टक्के वाढीचे होते. ही सर्व वाढ बहुतांशी पिकाखालील ऐन क्षेत्र न वाढविता दर एकरी उत्पादन वाढवून साध्य झाली आहे हे विशेष !


लुधियानाच्या या अफाट यशाने आज देशाच्या धान्य आयातीपैकी निम्मे धान्य चौथ्या योजनेच्या काळात जादा पुरवण्याची पंजाबने उमेद धरली आहे. पंजाबच्या चौथ्या योजनेमध्ये शेतीउत्पादन वाढीचे वार्षिक उद्दिष्ट साडेसहा टक्के धरले आहे. मुख्य धान्ये व गळिताची धान्ये यांचे उत्पादन ३८ टक्के वाढविण्याचे उद्दिष्ट आहे, तर ऊस व कपास यांचे उत्पादन २० व २१ टक्के वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस धान्याचे उत्पादन ६८ लाख टन होईल, असा अंदाज आहे.

राज्याच्या शेती व सामूहिक विकास योजनेसाठी ५४·३७ कोटी रु. चा खर्च धरला आहे तर १६२·७३ कोटी रु. निरनिराळ्या आर्थिक संस्थांकडून गुंतविले जाणार आहेत.

जगातील आठ गहू उत्पादक देशांना (जपान, मेक्सिको, अमेरिका, अर्जेंटिना, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान व रशिया) दर एकरी उत्पादन वाढीत मागे सारणारा लुधियाना व देशाच्या धान्य तुटीपैकी निम्मी तूट भरून काढण्याची जिद्द धरणारा पंजाब हा हरित-क्रांतीचा अग्रदूत आहे. स्वातंत्र्यलढ्याची सुरुवात ज्या पंजाब प्रांतातून झाली त्याच पंजाब प्रांतातून अन्न स्वातंत्र्य-लढ्याची द्वाही अशा सक्रिय व नेत्रदीपक प्रगतीच्या द्वारे फिरावी, ह्यात काही ऐतिहासिक संकेत असेल काय ? ○

सोने-चांदीच्या
तसेंच
खड्यां मोत्यांच्या कलात्मक
दागिन्यासाठी.
डी. एम.
आणि कं. ज्युवेलर्स
एन. सी. केळकर रोड दादर, मुंबई २८

# सेक्युलॅरिझम् : अन्वय आणि अर्थ



वि. म. दांडेकर


गेली काही वर्षे वाढत्या प्रमाणात झालेल्या जातीय दंगली, गेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या सुमारास गोहत्याबंदीकरिता झालेली निदर्शने आणि चळवळ, गोवर्धनपुरीच्या शंकराचार्यांनी केलेले तिचे नेतृत्व, सार्वत्रिक निवडणुकांत हिंदुत्व-वाद्यांना मिळालेले यश इत्यादी अनेक कारणांनी भारतीय राज्यव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत धर्माचे नेमके स्थान काय, यासंबंधी पुष्कळ साधकबाधक चर्चा नव्याने सुरू झाली आहे. अलीकडेच प्रा. नरहर कुरुंदकर यांनी 'साधना' साप्ताहिकात 'सेक्युलॅरिझम् आणि इस्लाम – पार्श्वभूमी व भूमिका' या मथळ्याखाली चार लेख (दि. ७, १४, २१ व २८ डिसेंबर १९६८) लिहून या विषयाची सविस्तर चर्चा केली आहे. त्यांचे लेखन विचारपूर्ण नसले तरी विचारप्रवर्तक निश्चितच आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या काही महत्त्वाच्या मुद्यांचा परामर्ष घ्यावा आणि या विषयावरील चर्चेस अधिक चालना द्यावी या हेतूने मी खालील विचार मांडीत आहे.

सेक्युलर याचा मूळ अर्थ ऐहिक किंवा इहलौकिक असा आहे. त्यामुळे सेक्युलर राज्यसंस्था म्हणजे जिचे कार्यक्षेत्र इहलौकिक बाबींपुरते मर्यादित केले

आहे अशी राज्यसंस्था. लोकजीवनाच्या पारलौकिक बाबीत अशी राज्यसंस्था हस्तक्षेप करीत नाही किंवा त्यांचे नियंत्रण करीत नाही; म्हणजेच अशी राज्यसंस्था धर्मनिरपेक्ष असते. परंतु सेक्युलर म्हणजे इहलौकिक म्हणजे धर्मनिरपेक्ष असे म्हणताच पर्यायाने धर्माची व्याप्ती पारलौकिक बाबींपुरती मर्यादित होते. मानवी जीवनातील पारलौकिक बाबीच धर्माचा मुख्य गाभाही आहे. परंतु प्रा. कुरुंदकर म्हणतात त्याप्रमाणे कोणताही धर्म स्वतःला निव्वळ पारलौकिक मानीत नाही किंवा मानवी जीवनाची ऐहिक व पारलौकिक अशी विभागणीही मान्य करीत नाही. याची कारणे सोपी आहेत. राज्यसंस्थेप्रमाणेच धर्मसंस्थाही लोकजीवनावर प्रभुत्व, असलेली एक सत्ता आहे आणि आपल्या सत्तेचे क्षेत्र अधिकाधिक व्यापक करणे हा प्रत्येक सत्तेचा स्वभाव आहे. त्यामुळे मानवी जीवनातील कोणत्याही क्षेत्रावर आपले प्रभुत्व कायमचे सोडून देण्यास कोणतीहि सत्ता तयार होत नाही. साहजिकच कोणताही धर्म ऐहिक व पारलौकिक हा फरक मान्य करीत नाही किंवा आपले क्षेत्र पारलौकिक बाबींपुरते मर्यादित करून घेण्यास तयार होत नाही. प्रत्येक धर्माने त्याच्या सद्दीच्या काळात मानवी जीवनातील अनेक निव्वळ ऐहिक बाबींवरही प्रभुत्व प्रस्थापित केलेले आहे ते याच कारणाने व धोरणाने.

परंतु सत्ताप्रसाराचे हे तत्त्व केवळ धर्मसंस्थेसच लागू आहे असे नाही. राज्यसंस्थेसही ते तसेच लागू आहे. प्रत्येक राज्यसत्तेने आपल्या भरभराटीच्या काळात लोकजीवनातील निव्वळ पारलौकिक बाबींतही हस्तक्षेप करून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याची खटपट केली आहे. राज्यसत्ता आणि धर्मसत्ता यांमधील ही सत्तास्पर्धा आजतागायत सर्वत्र चालू आहे. युरोपात राष्ट्रवाद उदयास येताच राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांमधील ही सत्तास्पर्धा प्रखर झाली. आज तेथे अनेक वर्षांच्या झगड्यानंतर मानवी जीवनातील इहलौकिक बाबींवर राज्यसंस्थेची सत्ता जवळजवळ अबाधित झालेली आहे. परंतु अजूनही हा संघर्ष पूर्णतया संपलेला नाही. इहलौकिक ते कोणते आणि पारलौकिक ते कोणते, अमुक एक बाब धर्माच्या कक्षेत येते किंवा नाही, यासंबंधीचा वाद अधूनमधून उपस्थित होत राहतोच. याचे एक साधे उदाहरण म्हणजे कुटुंबनियोजनाची इष्टानिष्टता, नैतिक-अनैतिकता, धार्मिक-अधार्मिकता इत्यादींबाबत चर्चने घातलेले लक्ष आणि त्यासंबंधी चर्चचे मत शिरसावंद्य मानणारी, बाकी सर्व बाजूंनी आधुनिक आणि पुढारलेली अमेरिकन व युरोपीय, बहुसंख्य रोमन कॅथॉलिक जनता.

तात्पर्य, राज्यसंस्था आणि धर्मसंस्था या दोहोंमधील ऐतिहासिक संघर्षातून निघालेली सेक्युलॅरिझम् ही एक समंजस, व्यवहारी तडजोड आहे. त्यामुळे सेक्युलर राज्यसंस्था म्हणजे धर्मनिरपेक्ष राज्यसंस्था, म्हणजेच इहलौकिक बाबीपुरते आपले कार्यक्षेत्र मर्यादित करून घेतलेली राज्यसंस्था, हा सेक्युलॅरिझम्चा मूळ अर्थ



सर्वत्र चालू असलेली ही सत्तास्पर्धा

मानला तरीही या तडजोडीची केवळ एक बाजू आहे. धर्मसंस्थाही आपले क्षेत्र पारलौकिक बाबींपुरतेच मर्यादित करून घेईल ही तिची दुसरी बाजू आहे. या दोनही बाजू सांभाळल्याखेरीज अर्थातच तडजोड शक्य होणार नाही.

दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर सेक्युलर राज्यसंस्था ज्या वेळी आपले अधिकार-क्षेत्र मानवी जीवनाच्या इहलौकिक बाबीपुरते मर्यादित करून घेण्याचे मान्य करते त्याच वेळीं सर्व इहलौकिक बाबींवर आपला अधिकार सांगते आणि याबाबत धर्माने लुडबूड करू नये, असा स्पष्ट इशारा देते. सेक्युलॅरिझम ही राज्यसंस्थेने धर्म-संस्थेसमोर मांडलेली एक व्यवहारी तडजोड आहे. राज्यसंस्थेने स्वतःच्या अधिकार-क्षेत्रावर घालून घेतलेली आणि त्याचरोबर धर्मसंस्थेच्या अधिकारक्षेत्रावर घातलेली ती एक मर्यादा आहे. प्रत्यक्ष व्यवहारात इहलोक आणि परलोक यांच्या मर्यादा निश्चित करणे सोपे नाही. त्याकरिता राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांमधील संघर्ष चालूच राहील. परंतु या तात्त्विक मर्यादेला उभयपक्षी मान्यता मिळाली तर ही मर्यादा व्यवहारात निश्चित करणे एवढेच वादाचे स्वरूप राहील. एवढे झाले तरी मानवी सांस्कृतिक इतिहासात तो एक महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल.

सेक्युलॅरिझमचे हे दुहेरी स्वरूप भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांत स्पष्ट केलेले आहे. घटनेच्या २५ व्या कलमात प्रत्येक व्यक्तीस मूलभूत हक्क म्हणून दिलेले धर्मस्वातंत्र्य नमूद केले आहे. त्याचा आशय असा आहे--

सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्य, तसेच घटनेच्या या भागात नमूद केलेले व्यक्तीचे इतर मूलभूत हक्क यांस बाधा न आणता प्रत्येक व्यक्तीस सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि कोणत्याही धर्माची उपासना, आचरण आणि प्रसार करण्याचा हक्क आहे.

तात्पर्य, घटनेने एका बाजूस व्यक्तीस पूर्ण धर्मस्वातंत्र्य दिले आहे म्हणजेच पर्यायाने व्यक्तिगत धार्मिक बाबीत हस्तक्षेप करण्यास राज्यसंस्थेस मनाई केली आहे. परंतु त्याचबरोबर सार्वजनिक सुव्यवस्था, नीतिमत्ता आणि आरोग्य, तसेच घटनेने व्यक्तीस दिलेले इतर मूलभूत हक्क धर्माच्या कक्षेतून बाहेर काढून घेतले आहेत. या इतर मूलभूत हक्कांत सार्वजनिक कायद्याबाबत समता, धर्म, जात, वंश इत्यादींवर आधारित विषमता, अस्पृश्यता, माणसांची खरेदीविक्री, वेठ इत्यादींना अमान्यता इत्यादी हक्कांचा समावेश आहे. या सर्व बाबीही धर्माच्या कक्षेतून बाहेर काढल्या आहेत.

घटनेने धर्मसंस्थेच्या अधिकारक्षेत्रावर घातलेल्या या मर्यादा एवढयानेही स्पष्ट न झाल्या तर, ज्या २५ व्या कलमात व्यक्तीचे धर्मस्वातंत्र्य मान्य केले आहे, त्याच कलमाच्या दुसऱ्या परिच्छेदात हे स्पष्ट केले आहे की, सर्व आर्थिक, वित्तीय, राजनैतिक किंवा अन्य इहलौकिक (सेक्युलर) बाबींचे, जरी कदाचित् त्या पारंपारिक धर्माचरणाशी संबंधित असल्या तरी, निर्बन्धन किंवा नियंत्रण करण्याचा राज्यसंस्थेचा अधिकार आहे आणि व्यक्तीस दिलेल्या उपरिनिर्दिष्ट धर्मस्वातंत्र्याने राज्यसंस्थेच्या या अधिकारास बाध येत नाही.

याच संदर्भात घटनेच्या ४४ व्या कलमाचाही उल्लेख करता येईल. या कलमात राज्यसंस्थेच्या धोरणाचे एक मार्गदर्शक तत्त्व म्हणून असे नमूद केले आहे की, भारताच्या सर्व भागातील नागरिकांना सारखा लागू होईल असा एक नागरी कायदा (सिव्हिल कोड) तयार करण्याचा राज्यसंस्था यत्न करील. या मार्गदर्शक तत्त्वाचा आशय हाच की नागरी कायदा ही सर्व राज्यसंस्थेच्या कक्षेतील आणि धर्मसंस्थच्या कक्षेबाहेरील बाब आहे.

तात्पर्य, भारतीय राज्यघटनेने मानवी जीवनाच्या सर्व इहलौकिक बाबी धर्मसंस्थेच्या कक्षेतून बाहेर काढून राज्यसंस्थेच्या अधिकारात दिल्या आहेत. परंतु त्याचबरोबर हे लक्षात ठेवले पाहिजे की, मानवी जीवनाचा पारलौकिक किंवा पारमार्थिक आशय आणि त्यास अनुसरून मानवास भासणारी धर्मनिष्ठेची गरज भारतीय राज्यघटनेने मान्य केली आहे. आणि त्या बाबतचे स्वातंत्र्य हा प्रत्येक व्यक्तीचा एक मूलभूत हक्क मानला आहे. सेक्युलॅरिझमच्या बाबतची प्रा. कुरुंदकरांनी त्यांच्या पहिल्या लेखांकाच्या सुरवातीसच मांडलेली त्यांची भूमिका भारतीय राज्यघटनेच्या वरील धोरणाशी जुळतीच आहे. ते म्हणतात "सेक्युलॅरिझमची माझ्यासमोरील मुख्य कल्पना धर्म ही फक्त पारलौकिक प्रश्नांचा विचार करणारी संस्था आहे, या एका मुद्यातून निष्पन्न होणारी आहे. समाजजीवनाच्या सार्वजनिक कक्षेतून धर्म बाजूस सारणे आणि तो केवळ पारलौकिक बाबींसाठी मर्यादित करणे हा मी सेक्युलॅरिझमचा मुख्य अर्थ मानतो."

## धर्मविरोधी भूमिकेची सुरुवात

परंतु यानंतर जेमतेम एक परिच्छेद उलटतो न उलटतो तोच ही भूमिका ते सोडून देतात आणि निव्वळ धर्मविरोधी भूमिका घेतात. ते म्हणतात, "धर्माने सरंजामशाहीच्या काळात स्वीकारलेली, पुरस्कारलेली समाजरचना आणि जीवनमूल्ये या दोन्हींचाही ठसा समाजाच्या मनावरून शक्य तितका पुसून काढणे ही प्रक्रिया सेक्युलॅरिझम्‌ची प्रक्रिया आहे. कारण सेक्युलॅरिझम ही कल्पनाच धर्माविरुद्धच्या बंडातून क्रमाने विकसित होत आलेली आहे." धर्माने जुन्या काळी पुरस्कारलेली समाजरचना आवश्यक तेथे बदलावी हा सेक्युलॅरिझमचा अर्थ सर्वमान्य आहे. परंतु धर्माने पुरस्कारलेल्या सर्व जीवनमूल्यांचा ठसाही समाजाच्या मनावरून पुसून काढणे हाही सेक्युलॅरिझमचा अर्थ आहे का? मानवी जीवनमूल्यांचे इहलौकिक आणि पारलौकिक असे दोन प्रकार करणे शक्य आहे किंवा नाही? जर शक्य असले तर धर्माने पुरस्कारलेली पारलौकिक जीवनमूल्येही नष्ट करणे असा सेक्युलॅरिझमचा अर्थ आहे का? आणि जीवनमूल्यांचे इहलौकिक आणि पारलौकिक असे दोन प्रकार मानणेच शक्य नसले किंवा पारलौकिक मूल्येही नष्ट करणे हाच सेक्युलॅरिझमचा अर्थ असला तर प्रा. कुरुंदकरांना अभिप्रेत असलेला सेक्युलॅरिझमचा जो मूळ अर्थ की धर्माची कक्षा पारलौकिक बाबीपुरती मर्यादित करणे त्याचा निश्चित अर्थ काय?

अशा रीतीने सेक्यलॅरिझम्‌ची मूळ कल्पना विशद करताना प्रा. कुरुंदकरांनी सुरवातीसच फारशी तर्कसंगती सांभाळलेली दिसत नाही. त्यानंतर त्यांच्या या धर्मविरोधी भूमिकेस अधिकृत बैठक देण्याच्या यत्नात त्यांना भारतीय राज्यघटनेची ओढाताण करावी लागली आहे. आपल्या तिसऱ्या लेखांकात ते म्हणतात –" भारतीय संविधानात सेक्युलर हा शब्द वापरण्यात आला नाही–कारण मग धार्मिक प्रश्नावर कायदा करण्याचा संसदेला अधिकार राहिला नसता." यातील पहिला भाग अर्थातच प्राध्यापकांनी बेधडक केलेले एक विधान आहे. वर उद्धृत केल्याप्रमाणे घटनेच्या २५ व्या कलमाच्या दुसऱ्या परिच्छेदात सेक्युलर शब्द स्पष्टपणे वापरला आहे. दुसऱ्या भागाविषयी बोलावयाचे तर असे की प्राध्यापकांच्या मते सेक्युलॅरिझम्‌ची कल्पनाच जर मूलत: धर्मविरोधी आहे तर घटनेत सेक्युलर शब्द वापरल्याने धार्मिक प्रश्नात हस्तक्षेप करण्यास संसदेला अडचण निर्माण होण्याचे कारण काय? तात्पर्य, लागेल तेथे भारतीय घटनेला, लागेल तेथे सेक्युलॅरिझमला, ठोकून बडवून आपल्या खाजगी धर्मविरोधी दलात सामील करून घेणे एवढाच प्रा. कुरुंदकरांच्या विवेचनाचा हेतू दिसतो.

ते पुढे म्हणतात–" सर्व नागरिकांना समान नागरी व गुन्ह्यांचा कायदा निर्माण करणे हा घटनेचा हेतू मार्गदर्शक तत्त्व म्हणून ४४ व्या कलमात स्वीकारण्यात



**सर्व धर्मांचा इतिहास**
**म्हणजे कत्तलींचाच इतिहास !**

आला आहे." वास्तविक घटनेच्या ४४ व्या कलमात फक्त नागरी कायद्याचा (सिव्हिल कोड) उल्लेख आहे. त्यात गुन्ह्यांच्या कायद्याचा (क्रिमिनल प्रोसीजर कोड) उल्लेख नाही. यामुळे प्रस्तुत विवेचनात फरक पडत नाही हे खरे. परंतु मोघम ज्ञान अविकृत भासविण्याचा हा आणखी एक नमुना आहे. अशा विषयांच्या चर्चेत केलेली विधाने आणि उल्लेख अधिक काटेकोरपणे करावयास हवेत. असो.

"भारतीय संविधानात सेक्युलर हा शब्द वापरण्यात आलेला नाही" या भरंवशावर प्रा. कुरुंदकर घटनेच्या ४४ व्या कलमात नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्त्वाचा जो दूरान्वय लावतात तो अधिक महत्त्वाचा आहे. ते म्हणतात– "हे ४४ वे कलम हिंदू आणि मुसलमान किंवा कोणताही धर्म यांच्या धार्मिक कायद्यांत हस्तक्षेप करण्याचा संसदेचा हक्कच घोषित करीत नाही तर असा हस्तक्षेप करणे, लवकरात लवकर करणे हे सरकारचे व संसदेचे कर्तव्य घोषित करते." मला वाटते यात प्रा. कुरुंदकरांचा काही तरी घोटाळा होत आहे. त्यांच्या मूळ भूमिकेस धरून उपरिनिर्दिष्ट तत्त्वाचा अर्थ लावावयाचा तर त्याचा हेतू सर्व धर्मांच्या धार्मिक कायद्यांत हस्तक्षेप करणे असा नसून नागरी कायद्याची बाब धर्माच्या कक्षेतून काढून घेणे हा आहे असे म्हणणेच अधिक सयुक्तिक होईल. नाहीतर असे मानावे लागेल की, प्रा. कुरुंदकरांच्या मते भारतीय संविधानात सेक्युलर शब्द वापरलेला नाही, एवढेच नव्हे तर भारतीय संविधान मुळातच सेक्युलर नाही. प्रा. कुरुंदकरांना असे म्हणावयाचे नाही असे वाटते. परंतु कोणी सांगावे ?

त्यांच्या चौथ्या आणि शेवटच्या लेखांकाच्या शेवटी तर प्रा. कुरुंदकरांनी त्यांची धर्मविरोधी भूमिका अगदी रक्तरंजित केली आहे. ते म्हणतात– "धर्म मध्ययुगात निर्माण झाले–कोणत्याही धर्माचा व संस्कृतीचा इतिहास मानवाच्या गुलामीचा आणि धर्माच्या नावे चालू असणाऱ्या पिसाट कत्तलींचाच इतिहास आहे–एक-

मेकांना नामशेष करण्याच्या ऐवजी हजार वर्षांच्या वाटचालीनंतर धर्माच्या नावे कत्तली व अत्याचार करण्याची प्रवृत्ती हीच नामशेष करण्याच्या निर्णयावर माणसाला यावे लागले. हा आधुनिकतेचा टप्पा म्हणजे सेक्युलॅरिझम !" वास्तविक बहुतेक सर्व धर्म प्राचीन आहेत. त्यातील वयाने सर्वांत लहान इस्लाम हाही मध्ययुगपूर्व आहे. सर्व धर्मांचा सर्व इतिहास हा केवळ मानवी गुलामीचा आणि कत्तलींचा इतिहास आहे हेही खरे नाही. अज्ञान आणि पाशवी प्रवृत्ती यातून मानवास मुक्त करून मानवाची सांस्कृतिक उन्नती आणि प्रगती साधण्यात सर्व धर्मांचा फार मोठा भाग आहे. किंबहुना नवीन राष्ट्रवाद उदयास येईपर्यंत धर्म हाच मानवी समाजधारणेचा मुख्य आधार होता. ज्या वेळी आजच्या मानाने मानव फार अज्ञानी आणि पाशवी होता त्या वेळी धर्माने त्याला हाक मारून माणुसकीच्या मार्गाला लावले आहे. त्या काळाची आजकालशी तुलना करून धर्माची अवहेलना करणे युक्त दिसत नाही. धर्माधर्मांच्या संघर्षातून अमानुष अत्याचार आणि कत्तली झाल्या हे खरे. परंतु त्यांचे कारण धर्म नसून त्या काळी माणूसच आजच्या मानाने फार अमानुष होता हे आहे. धर्माचा कोणताही संबंध नसताना केवळ विजयोन्मादातही पुष्कळ अमानुष अत्याचार आणि कत्तली झाल्या आहेत. शिवाय ज्याचा आपण आज आधुनिक म्हणून उदोउदो करीत आहोत त्या राष्ट्रवादाच्या नावाने काय कमी अमानुष अत्याचार व कत्तली झाल्या. परंतु हा स्वतंत्र विषय आहे. प्रस्तुत विषयापुरते बोलावयाचे तर एवढेच की सेक्युलॅरिझमची कल्पना धर्माधर्मातील संघर्षातून निघालेली नाही आणि सेक्युलॅरिझम हा त्या संघर्षातील आधुनिकतेचा टप्पाही नाही. राष्ट्रवादाच्या उदयानंतर प्रबळ होत चाललेली राज्यसंस्था आणि आधीच अस्तित्वात असलेली धर्मसंस्था यांच्या सत्तास्पर्धेतून निघालेली सेक्युलॅरिझम ही एक समंजस तडजोड आहे. सेक्युलॅरिझमची कल्पना धर्मविरोधी नाही. या कल्पनेत धर्माला मर्यादित परंतु निश्चित स्थान आहे. धर्मकल्पनेचे किंवा धर्माने पुरस्कारलेल्या सर्वच्या सर्व जीवनमूल्यांचे समूळ उच्चाटन करण हा सेक्युलॅरिझमचा आशय नाही.

राष्ट्रवादाच्या उदयानंतर प्रबळ झालेली राजसंस्था आणि पूर्वीच अस्तित्वात असलेली धर्मसंस्था यांच्या सत्तास्पर्धेतून सेक्युलॅरिझम्‌ची कल्पना निघालेली असल्यामुळे प्रा. कुरुंदकर म्हणतात त्याप्रमाणे राष्ट्रवाद आणि सेक्युलॅरिझम्‌ या सहचारी कल्पना आहेत असे मानता येईल. परंतु या दोन्ही कल्पनांबरोबरच लोकशाही ही तिसरी सहचारी कल्पना आहे असे प्रा. कुरुंदकर म्हणतात. वास्तविक लोकशाही आणि सेक्युलॅरिझम्‌ यांचा सहवास निदान तात्त्विक दृष्टचा तरी अनावश्यक वाटतो. वर म्हटल्याप्रमाणे राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांच्या सत्तास्पर्धेतून निघालेली सेक्युलॅरिझम्‌ ही एक तडजोड आहे. या तडजोडीचा एक पक्ष जो राज्यसंस्था ती लोकशाही असेल, हुकूमशाही असेल किंवा राजेशाहीही असू शकेल, त्यामुळे राज्य-

संस्थेन धर्मसंस्थेशी तडजोड करण्याची गरज किंवा त्या तडजोडीचे स्वरूप बदलत नाही. तसेच राज्यसंस्था लोकशाही आहे म्हणून ती सेक्युलरच असेल, किंवा ती हुकूमशाही आहे म्हणून अधर्मी वा धर्मविरोधीच असेल, अथवा ती राजेशाही आहे, म्हणून धर्माधिष्ठितच असेल असाही नियम मानण्याचे कारण नाही. राज्यसंस्था मग ती लोकशाही, हुकूमशाही किंवा राजेशाही कशीही असो, ती तत्त्वत: सेक्युलर, अधर्मी किंवा धर्माधिष्ठित काहीही असू शकेल. लोकशाही, हुकूमशाही किंवा राजेशाही ही राज्यसंस्था आणि जनता यांच्या परस्परसंबंधांची भिन्न स्वरूपे आहेत. सेक्युलॅरिझम, अधर्मीपणा किंवा धर्माधिष्ठान ही राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांमधील परस्परसंबंधाची भिन्न स्वरूपे आहेत. या दोन कल्पना भिन्न आहेत आणि तत्त्वत: त्या स्वतंत्र ठवणेच सोयीचे आहे.

## गोंधळाची जाणीव

या भिन्न कल्पनांची गल्लत केल्यामुळे होणारा वैचारिक गोंधळ क्षणभर प्रा. कुरुंदकरांनाही जाणवल्यासारखा दिसतो. ते म्हणतात–" प्रारंभी मी म्हटले होते, की सेक्युलॅरिझमचा मुख्य आशय धर्माची कक्षा परलोकापुरती मर्यादित करणे हा आहे. मध्येच मी म्हटले, राष्ट्रवाद आणि लोकशाही या सेक्युलॅरिझम्च्या सहचारी कल्पना आहेत. आणि शेवटी मी म्हटले, भारतीय संविधानातील समान नागरिकत्व हा सेक्युलॅरिझम्चा मुख्य आधार आहे. ही सगळी वाक्ये रचनेत परस्परांपेक्षा थोडी थोडी निराळी आहेत. पण प्रत्येक वाक्यात अंतर्भूत असलेल्या गृहीत कल्पना आपण तपासू लागलो तर तो आशय सार्वजनिक जीवनातून धर्म निष्प्रभ करणे व व्यक्तीची व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा निर्माण करून धर्माच्या गुलामगिरीतून मानवी मन मोकळे करणे हा आहे.' वस्तुत: वरील सर्व वाक्ये केवळ रचनेत परस्परांपेक्षा थोडीथोडी निराळी आहेत असे नाही, तर मूलभूत वैचारिक गोंधळाची ती द्योतक आहेत. या गोंधळातून बाहेर पडावयाचे तर सेक्युलॅरिझम्चा जो मूळ अर्थ की– धर्माची कक्षा परलोकापुरती मर्यादित करणे–तो घट्ट धरून त्याचे तर्कशुद्ध विवरण करावयास हवे, ते न करता प्रा. कुरुंदकर धर्मविरोधी अप्रस्तुत कोलाहल माजवून त्यात आपला वैचारिक गोंधळ बुडवून टाकण्याचा यत्न करीत आहेत असे दिसते.

राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांच्या संघर्षातून सेक्युलॅरिझम्च्या कल्पनेचा उदय झालेला आहे ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे सेक्युलॅरिझम्विषयी आणखी एक गोष्ट स्पष्ट होते. ती अशी की भारतासारख्या देशात ज्यात अनेक धर्मीय आहेत तेथे त्यांनी शांततेने एकत्र राहावे म्हणून किंवा तेथील अल्पसंख्य धर्मीयांना संरक्षण मिळावे म्हणून सेक्युलॅरिझम्च्या कल्पनेचा उदय झालेला नाही. राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांच्या संघर्षातून ही कल्पना निर्माण झाली असून राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांची अधिकारक्षेत्रे मर्यादित व निश्चित करून देणे हा तिचा

उद्देश आहे. प्रत्येक मानवी समाजाची ही एक ऐतिहासिक गरज आहे. मग तो समाज एकधर्मी असो व अनेकधर्मी असो. राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांची परस्पर अधिकारक्षेत्रे अशा रीतीने निश्चित केल्याने कोणत्याही मानवी समाजाला इहलौकिक प्रगती, नीतिमत्ता आणि न्याय साधणे सुलभ होते असा ऐतिहासिक अनुभव आहे. म्हणून सेक्युलॅरिझम् हा मानवी सांस्कृतिक इतिहासात प्रगतीचा एक महत्त्वाचा टप्पा मानावयास हवा. प्रा. कुरुंदकरांच्या लक्षात हा मुद्दा आलेला आहे परंतु वर सांगितल्याप्रमाणे त्यांनी सेक्युलॅरिझम्‌ची लोकशाहीशी निष्कारण सांगड घातल्याने त्यांचे या विषयाचे प्रतिपादन सदोष झाले आहे. ते म्हणतात त्याप्रमाणे "मुसलमान या देशात असले काय, नसले काय–त्यामुळे सेक्युलॅरिझम्‌ची गरज कमी होणार नाही." परंतु सेक्युलॅरिझम् अल्पसंख्येच्या हितासाठी नसतो. तो नेहमीच बहुसंख्येच्या हितासाठी असतो" असे म्हणणे किंवा बहुसंख्याकांच्या जीवन – विकासाचा एकमेव मार्ग म्हणून सेक्युलॅरिझम्‌कडे पाहणे तर्कशुद्ध नाही. वर म्हटल्याप्रमाणे सेक्युलॅरिझम् ही प्रत्येक मानवी समाजाची एक ऐतिहासिक गरज आहे–मग तो समाज एकधर्मी असो वा अनेकधर्मी असो. अनेकधर्मी समाजात बहुसंख्य, अल्पसंख्य सर्वांची ती सारखीच गरज आहे. कारण त्यायोगे कोणत्याही समाजाला ऐहिक प्रगती, नीतिमत्ता आणि न्याय साधणे सुलभ होते असा ऐतिहासिक अनुभव आहे.

सेक्युलॅरिझम्‌चा विचार करताना साहजिक अनवधानाने आपण पुष्कळदा भारतातील विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात तो करतो. त्यामुळे भारतात अनेक धर्मीय आहेत म्हणून सेक्युलॅरिझम्‌ची कल्पना अनेक धर्मीयांच्या सहजीवनाशी निगडित आहे असे वाटते. तसेच भारतीय राज्यघटना लोकशाही असल्याने लोकशाही आणि सेक्युलॅरिझम् या दोन अविभिन्न कल्पना आहेत असे वाटते. वास्तविक लोकशाही, अनेक धर्मीयांचे सहजीवन आणि सेक्युलॅरिझम् या तत्त्वतः तीन भिन्न आणि स्वतंत्र कल्पना आहेत आणि या विषयाच्या तात्त्विक चर्चेत त्या स्वतंत्र ठेवणेच इष्ट आहे. परंतु भारतात सेक्युलॅरिझम्‌चा आचार कसा असावा, प्रत्यक्ष समाजव्यवहारात उद्‌भवणाऱ्या अनेक प्रश्नांवर सेक्युलॅरिझम्‌ची भूमिका काय असावी याचा विचार करताना अर्थातच तत्संबंधित वस्तुस्थितीची इतर अंगे लक्षात घेणे आवश्यक आहे. भारतीय लोकशाही आणि अनेकधर्मी भारतीय समाज ही या वस्तुस्थितीची दोन प्रमुख अंगे आहेत. म्हणून भारतीय राज्यघटना लोकशाही आहे, भारतीय राज्यसंस्था येथवर विशद केलेल्या अर्थाने सेक्युलर किंवा धर्मनिरपेक्ष आहे आणि भारतीय समाज अनेकधर्मी असून उपासनेचे स्वातंत्र्य हा व्यक्तीचा एक मूलभूत हक्क म्हणून घटनेने मान्य केला आहे अशा परिस्थितीत भारतीय समाजाची धर्मविषयक धारणा काय असावी असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचे उत्तर देताना प्रामुख्याने ही लोकव्यवहाराची बाब आहे हे लक्षात ठेवले पाहिजे आणि मूळ तात्त्विक भूमिकेला

धक्का लागू न देता जेथवर लोकव्यवहार सांभाळता येईल तेथवर तो सांभाळला पाहिजे ही जाणीव ठेवून या प्रश्नाचा विचार झाला पाहिजे.

### समान नागरी कायदा

उदाहरणादाखल सर्व नागरिकांना समानपणे लागू होईल असा नागरी कायदा निर्माण करण्याचा प्रश्न घेऊ. नागरी कायदा ही गोष्ट धर्माच्या कक्षेच्या बाहेर आणि राज्यसंस्थेच्या पूर्ण अखत्यारीतील आहे ही गोष्ट राज्यघटनेने स्पष्ट केली आहे. अशा तऱ्हेचा नागरी कायदा तयार करण्याचा यत्न राज्यसंस्था करील असे मार्गदर्शक तत्त्वही घटनेने नमूद करून ठेवले आहे. अर्थातच् या दृष्टीने पावले टाकावयास हवीत हे उघड आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की भारतीय संसदेने मुस्लीम जनमताकडे दुर्लक्ष करून हिंदू बहुमताच्या बळावर असा कायदा करून टाकावा आणि राज्यसंस्थेने तो सर्व सामर्थ्यानिशी राबवावा. घटकाभर असे धरून चालू की असा कायदा असावा याला सध्याच्या संसदेतच बहुमत नाही. मग आपण काय केले असते ? समाजनेत्यांनी, विचारवंतांनी याविषयी लोकशिक्षण हाती घेऊन, जनमत जागृत करून संसदेत बहुमत प्रस्थापित करीपर्यंत थांबावेच लागले असते. लोकशाही राज्यघटनेत तरी याला पर्याय नाही. परंतु प्रा. कुरुंदकरांचे तसे मत दिसत नाही. ते म्हणतात– " मागासलेल्या देशात समाजकारण मागासलेले असते, राजकारण मागासलेले असते, अर्थव्यवस्था मागासलेली असते, शिक्षण कमी


मातांनो
आपले बाळ
निरोगी असावे
असे आपल्याला
वाटते ना ?
बाळाच्या
कोणत्याही तक्रारींवर
खालील ठिकाणी
वैद्यकीय सल्ला
मिळेल.

**न्यू इरा**
**होमिओपॅथिक**
**फार्मसी**

दादर रेल्वे स्टेशनसमोर,
(पश्चिम) मुंबई–२८




असते, मने तर फारच मागासलेली असतात. या मनाला पटेपर्यंत परिवर्तन थांबवून धरावयाचे म्हटले तर भारतातील समाजपरिवर्तन हा काही सहस्रके चालणारा कार्यक्रम मानावा लागेल. " या समाजपरिवर्तनाला सहस्रके लागतील की शतके लागतील, का ते काही दशकांतच साधू शकेल हे समाजधुरीण आणि विचारवंत यांबाबत आवश्यक ते लोकशिक्षणाचे कार्य किती कौशल्याने आणि निष्ठेने हाती घेतात त्यावर अवलंबून राहील. परंतु जो काळ लागेल तो लागेल. त्याला दुसरा उपाय दिसत नाही. निदान लोकशाहीच्या मर्यादेत तरी पर्याय दिसत नाही. कारण अन्य मार्ग एवढाच उरतो की अशा मागासलेल्या देशाने मुळातच लोकशाहीऐवजी समाजसुधारणेला वाहिलेली हुकूमशाही पत्करावयास हवी होती. ते कदाचित् शक्यही होते. कारण प्रा. कुरुंदकर म्हणतात ते खरे असले तर भारतीय जनतेने प्रौढ मतदानावर आधारलेली लोकशाही मागितलेली नव्हती. ती फक्त नेत्यांनी मागितली होती. तेव्हा मनात आणले असते तर नेत्यांना कदाचित् हुकूमशाही प्रस्थापित करता आली असती. परंतु लोकशाहीच्या मर्यादांची जाणीव असूनही समाजाच्या अंतिम हिताकरिता, उन्नतीकरिता लोकशाहीच श्रेयस्कर ठरेल या निष्ठेने भारतीय घटनाकारांनी लोकशाहीचाच अवलंब केला. सेक्युलॅरिझमची सहचारिणी म्हणून प्रा. कुरुंदकरांनीही तिचे काही काळ स्वागत केले. परंतु आता ती त्यांच्या खाजगी धर्मविरोधी दलात सामील होत नाही असे पाहताच तिच्यावरही बळजबरीचा प्रसंग आला असावा असे दिसते.

सुदैवाने आज समान नागरी कायदा करण्याला संसदेतील हिंदू बहुमतामुळे बहुमतांचा पाठिंबा आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत संसदेचे कर्तव्य काय असा प्रश्न

उपस्थित होतो. बहुमताच्या बळावर संसद असा कायदा करू शकेल यात शंका नाही आणि संसदेने कायदा केला तर राज्यशासन त्याची अंमलबजावणी करू शकेल असेही मानण्यास प्रत्यवाय नाही. प्रा. कुरुंदकर म्हणतात त्याप्रमाणे " हा समान नागरी कायदा जर संसदेने करण्याचे ठरविले तर त्यांना अडवणारी शक्ती मुसलमानांच्या जवळ नाही ! संसदेविरुद्ध बंड करून भारतीय गणराज्य धोक्यात आणण्याची ताकद शस्त्रबळान, संख्याबळाने कोणत्याच दृष्टीने मुसलमानांजवळ नाही !" परंतु याबाबत केवळ गणराज्याला धोका नाही एवढीच खबरदारी घेणे पुरेसे आहे का ? मुस्लीम समाजाच्या हिताकरिता का होईना परंतु केवळ हिंदू बहुमताच्या बळावर एखादी सुधारणा राबवली गेली तर तिचा परिणाम म्हणून मुस्लीम समाज आधुनिक आणि प्रागतिक होण्याऐवजी अधिकच धर्मांध होण्याचा धोका लक्षात घेणे जरूर नाही का ? म्हणून संसदेत असा एक मतप्रवाह आहे की हिंदूंच्याकरिता केलेला नागरी कायदा मुसलमानांनाही लागू करावा अशी मागणी शक्य तर मुसलमानांकडून यावी. ज्याप्रमाणे हिंदू समाजसुधारकांनी आणि विचारवंतांनी हिंदु समाजात गेली शंभर वर्षे याविषयी जागृती केली तशीच जागृती मुसलमानात करण्याची संधी मुस्लीम नेते व विचारवंतांना द्यावी. हिंदू विचारवंतांनी त्यांना आवश्यक ते साहाय्य करावे. आणि निदान सुशिक्षित मुसलमानांत यासंबंधी जागृती होताच संसदेने पुढील पाऊल टाकावे.

प्रा. कुरुंदकरांना ही भूमिका मान्य नाही. तिची ते ' हृदय-परिवर्तनाची सोज्वळ भूमिका ' म्हणून हेटाळणी करतात. ते म्हणतात–" मुस्लीम समाजाबाबत कोणताही प्रश्न निघाला की हा प्रश्न मुसलमानांना समजावून सांगा, त्यांना पटू द्या, त्यांनी मागणी करू द्या म्हणजे सोडवू, असे सांगण्यात येते ! हा पदर झटकण्याचा एक प्रकार आहे. हृदय-परिवर्तनाला समाजजीवनात एक महत्त्व आहेच, पण ते एकमेव महत्त्व नव्हे ! आमच्या संविधानाची भूमिकाच याहून निराळी आहे–या संविधानाला निष्ठा वाहिलेले लोक केवळ हृदय-परिवर्तनाची भाषा बोलू शकत नाहीत. हृदयपरिवर्तन ही स्थितिवाद्यांनी हुडकून काढलेली पळवाटीची भाषा म्हटली पाहिजे. हिंदूंशी सल्लामसलत करणे, मुसलमानांशी सल्लामसलत करणे ही भूमिकाच भारतीय संविधानाच्या आत्म्याच्या विरोधी जाते."

मला वाटते हा तारतम्याचा प्रश्न आहे. नागरी कायदा ही बाब धर्माच्या कक्षेत बसत नाही आणि समान नागरी कायदा केव्हाना केव्हा तरी करावाच लागेल याचा पुनरुच्चार संसदेत व संसदेबाहेर सर्व समाजनेत्यांनी सतत करीत राहिले पाहिजे. भिन्न भिन्न हितसंबंधांतील सल्लामसलतींचे दुसरे टोकही कटाक्षाने टाळले पाहिजे. प्रा. कुरुंदकर म्हणतात–" मौलाना हुसेन अहमद मदनी म्हणत, भारतीय संविधान हा एक मॉहिदा आहे. या शब्दाला इस्लामच्या धर्मशास्त्रात विशिष्ट अर्थ

आहे. जणू भारतातील हिंदू हे एक राष्ट्र, मुसलमान हे दुसरे राष्ट्र, आणि या दोन राष्ट्रांनी परस्परांच्या व्यवहारांत हस्तक्षेप न करता एकत्र नांदण्याचा केलेला करार म्हणजे भारतीय संविधान, असे मौ. मदनींचे स्पष्टीकरण होते. " हे जर खरे असेल तर भारतीय संविधानाची ती भूमिका नाही हे पुन्हा पुन्हा स्पष्ट केले पाहिजे. परंतु मूळ तत्त्वाला याप्रमाणे घट्ट धरून राहिल्यानंतर सल्लामसलत करता कामाच नये, मुस्लीम समाजनेत्यांना आणि विचारवंतांना त्यांच्या समाजात जागृती करण्याची संधी देताच कामा नये, असे मला वाटत नाही. किती थांबावे, किती थांबू नये हा तारतम्याचा प्रश्न आहे. आपण सद्हेतूने पुढे टाकलेल्या पावलाचा विपरीत परिणाम होऊ नये, पाऊल मागे घ्यावयास लागू नये याची दक्षता लोकव्यवहारात सतत घेतली पाहिजे.

लोकशाही आणि अनेक धर्मीयांचे सहजीवन या पार्श्वभूमीवर सेक्युलॅरिझम्‌चा अर्थ कसा लावावा यासंबंधी जे अनेक व्यावहारिक प्रश्न वारंवार उपस्थित होतात त्यांचे आणखी एक उदाहरण म्हणून अनेक सरकारी, सार्वजनिक समारंभात जे हिंदूंचे संस्कार केले जातात त्यांचा उल्लेख करावयास हवा. भूमिपूजा, नारळ फोडणे, हारफुलांनी विविध प्रतिमा, वस्तू आणि वास्तू यांचे पूजन इत्यादी बाबी यांत येतात. राज्यसंस्था सेक्युलर किंवा धर्मनिरपेक्ष आहे तर मग हे धार्मिक संस्कार सरकारी सार्वजनिक समारंभांतून काढून टाकले पाहिजेत, असे कट्टर सेक्युलॅरिस्टांचे म्हणणे आहे. त्यांत मुद्दा आहे हे मान्य केले पाहिजे. परंतु पुष्कळ वेळा असे आढळून येते की, पाश्चात्य देशात अशा समारंभात केले जाणारे सर्व संस्कार हे सेक्युलर संस्कार आहेत असे ही मंडळी मानतात आणि त्या संस्कारांना त्यांची हरकत नसते. ते खरे नाही, हे त्यांना सांगितले पाहिजे. शँपेनची बाटली ही नारळापेक्षा कोणत्याही अर्थाने अधिक सेक्युलर नाही किंवा मेणबत्तीही तेलाच्या दिव्यापेक्षा सेक्युलर नाही. बहुधा सर्व संस्कार, नमस्कार, शुभेच्छा यांच्या बुडाशी धर्मभावना आहे. सर्व सरकारी सार्वजनिक समारंभांतून ही सारी सद्‌भावना, केवळ धर्माधिष्ठित आहे म्हणून, निपटून काढून टाकण्याचे ठरविले तर ते करता येईल. परंतु त्यायोगे सार्वजनिक जीवन निष्कारण दरिद्री होईल असे मला वाटते. माझ्या एखाद्या मुस्लीम मित्राने मला शुभेच्छा म्हणून म्हटले की " अल्ला तुम्हांला तुमच्या कार्यात यश देवो " तर त्याला हरकत करण्याचाच हा प्रकार आहे. किंवा मुसलमान शेजारणीच्या मुलीला बरे वाटावे म्हणून हिंदू शेजारणीने गणपतीला नवस केला तर इस्लामवर आक्रमण आले, असे म्हणण्याचाच हा प्रकार आहे. सेक्युलॅरिझम्‌चा असा संकुचित अर्थ लावून काहीच साधत नाही. त्यायोगे भिन्न धर्मीयांचे सहजीवन अधिक सुसह्य होते असेही नाही. सार्वजनिक जीवन मात्र दरिद्री होते. हजारो वर्षांचा सांस्कृतिक इतिहास सांगणारा हा मानवी समाज आपल्या सार्वजनिक जीवनात या सांस्कृतिक वारशाचा कोणताच भाग आणू शकत




शुक्रवारी कुराणपठण आणि रविवारी...

नाही. पोरकेपणाने एकत्र येतो आणि पोरकेपणाने निघून जातो. म्हणून सर्वच संस्कार बंद करून टाका हे या प्रश्नाचे उत्तर नाही. या प्रश्नाचे उत्तर हे की अशा प्रसंगी सर्वधर्मीयांना त्यांच्या त्यांच्या पद्धतीने व परीने त्यांच्या शुभेच्छा व्यक्त करण्याची संधी मिळाली पाहिजे. हा केवळ सहिष्णुतेचा प्रश्न नाही. सार्वजनिक, राष्ट्रीय जीवन सांस्कृतिकदृष्ट्या अधिक संपन्न करण्याचा हा उपाय आहे. देशात उपलब्ध असलेल्या विविध संस्कृतींनी राष्ट्रीय जीवन सजविण्याचा हा मार्ग आहे. त्यायोगे सेक्युलॅरिझमला कोणताही बाध येत नाही.

## आकाशवाणी कार्यक्रम

या प्रकारचे दुसरे उदाहरण आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या भक्तिसंगीताचे देता येईल. आकाशवाणी हे राज्यसंस्थेचे साधन आहे. भक्तिसंगीत अर्थातच धार्मिक आहे, म्हणून ते आकाशवाणीवरून प्रसारित होऊ नये असे कट्टर सेक्युलॅरिस्ट म्हणतात. या म्हणण्यातही मुद्दा आहे हे मान्य केले पाहिजे. परंतु या प्रश्नाचे उत्तर आकाशवाणीवरून सर्व धार्मिक संगीत किंवा अन्य कार्यक्रम बंद करावेत हे दिसत नाही. वर म्हटल्याप्रमाणे अशाने सार्वजनिक आयुष्य पोरके होईलच; शिवाय आकाशवाणीवरील कार्यक्रमाचे स्वरूप सर्वस्वी सार्वजनिक नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. आकाशवाणीचे कार्यक्रम बव्हंशी कुटुंबियांकरिता, खाजगी घराकरिता असतात. धार्मिक भावना आणि संस्कार ही कौटुंबिक आणि वैयक्तिक जीवनाची एक अत्यावश्यक गरज आहे. ती आकाशवाणीसारख्या साधनाने जेवढी पुरविता येईल तेवढी पुरविणे ही आकाशवाणीची जबाबदारी आहे. बहुसंख्य श्रोते हिंदू असल्याने हिंदू धार्मिक संगीत वा कार्यक्रम अधिक प्रमाणात प्रसारित होणे हेही साहजिक आहे. परंतु इतर धर्मीयांच्या धार्मिक गरजांकडे दुर्लक्ष होत असेल तर ते होता कामा नये हेही खरे आहे. इतर धर्मीयांची आकाशवाणीविषयी ही तक्रार असेल तर ती रास्त आहे. तिचे निराकरण करणेही अवघड नाही. उदाहरणार्थ, आठवड्यांचे सातही दिवस सकाळचे कार्यक्रम हिंदू भक्तिसंगीताने सुरू करण्या-ऐवजी शुक्रवारचे कार्यक्रम कुराणपठनाने आणि रविवारचे कार्यक्रम बायबल-

पठणाने सुरू करावेत. कुराणपठनास सायंकाळची वेळ अधिक योग्य वाटत असली तर सायंकाळचे कार्यक्रम कुराणपठनाने सुरू करावेत. कुराण आणि बायबलमधील उतारे वाचून झाल्यावर प्रादेशिक भाषांत त्यांचे अनुवाद करावेत. कुराणपठन हे केवळ मुसलमानांकरिता किंवा बायबलपठन हे केवळ ख्रिश्चनांकरिता असेही मानण्याचे कारण नाही. आकाशवाणीवरील धार्मिक कार्यक्रमांचा उद्देश हा असावयास हवा की, सर्व धर्मांना संमत होतील अशा सामान्य नीतितत्त्वांवर भर द्यावा की ज्यायोगे सर्वधर्मीयांची धार्मिक भावना आणि संस्कार यांची गरज भागेल आणि त्यांना आत्मिक शांती लाभेल.


प्रा. कुरुंदकरांसारखे जे विचारवंत सेक्युलॅरिझम् म्हणजे धर्मविरोध असे मानतात त्यांचा अर्थातच या सर्वधर्मसमभावी सामाजिक धारणेस विरोध असणार हे उघड आहे. प्रा. कुरुंदकर तर सर्वधर्मसमभाव ही हिंदू जातीयवाद्यांनी सेक्युलॅरिझम्चा बुरखा पांघरून घेतलेली एक सोज्वळ भूमिका आहे असे समजतात. ते म्हणतात– " पहिली सोज्वळ भूमिका सर्वच धर्म सारखेच पवित्र आहेत हे तुणतुणे वाजवीत सर्व धर्मांची स्तुती करण्याची आहे. म्हणजे कोणत्याही धर्माच्याबाबत धर्मचिकित्सेची किंवा धार्मिक गुलामगिरीविरुद्ध झगडण्याची गरजच बाजूला झटकून टाकता येते ! " येथे हे स्पष्ट केले पाहिजे की, सर्वधर्मसमभाव हा धर्मभावनेविषयीच्या आदरावर आधारित आहे. सेक्युलॅरिझम्लाही धर्मभावनेविषयी आदर अभिप्रेत आहे असे मी मानतो. नाही तर सेक्युलॅरिझम् ही राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांमधील सन्मान्य तडजोड होऊ शकणार नाही. इहलौकिक कोणते, पारलौकिक कोणते, धर्माच्या कक्षेत काय बसते, काय बसत नाही येथवरची धर्मचिकित्सा सेक्युलॅरिझम्ला मंजूर आहे. धार्मिक सत्तेने इहलौकिक गुलामगिरी निर्माण केली असेल तर ती नष्ट करणे हेही सेक्युलॅरिझम्चे कार्य आहे. या दोन्ही बाबी सर्वधर्मसमभावास धक्का देत नाहीत. परंतु धर्माचा पारलौकिक आशय आणि त्याची मानवी मनास गरज आहे किंवा नाही इत्यादीविषयींची चिकित्सा महत्त्वाची असली तरी ती सेक्युलॅरिझम्चा विषय होऊ शकत नाही. सर्वधर्मसमभावातही अर्थातच ती बसत नाही. तो विषय काहीसा गहन आहे. ठोकळेबाज शिवीगाळीने त्याचा निकाल लावण्यासारखा नाही. ज्या कोणास तो गम्य असेल त्याने त्याची चर्चा विषयास साधेल अशा तोलाने करावी.

सर्वधर्मसमभावाचा विचार करताना याविषयी महात्मा गांधींची भूमिका काय होती याचा उल्लेख करणे अगत्याचे आहे. कारण महात्मा गांधींनी आपले प्रत्यक्ष दैनंदिन धर्माचरण सर्वधर्मसमभावी करण्याचा यत्न केला होता. प्रा. कुरुंदकरांनीही साहजिकच या विषयाचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात–" १९२५ इतक्या आधीच्या काळी गांधीजी म्हणाले, " सर्वच धर्म खरे आहेत अशी माझी श्रद्धा आहे. " हे वाक्य अतिशय गमतीचे वाक्य आहे. या वाक्याचा खरा अर्थ कोणताच

धर्म खरा नाही असा होतो. हेच बहुवा लोकांना कळत नाही." हे गांधींना कळवून टाकावे हे बरे! त्यांनी उद्धृत केलेले महात्मा गांधीचे दुसरे एक वाक्य कळायला अधिक सोपे आहे असे वाटते. गांधीजी म्हणत, "सत्य सुसंगत असते आणि परमेश्वर सत्यमय आहे असे मला वाटते, म्हणून सर्वच धर्म परस्परांशी सुसंगत असणार हे उघड आहे." मी असे समजतो की सर्व धर्मांच्या अंतिम एकतेविषयी महात्मा गांधींना जी व्यक्तिगत प्रचीती आली असेल त्याचे हे स्पष्टीकरण आहे. ते काहीही असले तरी प्रस्तुत विषयापुरते बोलावयाचे तर हा विषय सेक्युलॅरिझम्च्या बाहेर आहे आणि सर्वधर्मसमभावी सामाजिक धारणेसही अनावश्यक आहे. धर्माचे अधिकारक्षेत्र पारलौकिक बाबींपुरते मर्यादित करणे हा सेक्युलॅरिझमचा अर्थ असल्याने इहलोक आणि परलोक यांची मर्यादा कोठे आहे यासंबंधीची चर्चा सेक्युलॅरिझम्ला प्रस्तुत आहे. परंतु सर्व धर्मांचा पारलौकिक आशय एकच आहे का, हा प्रश्न सेक्युलॅरिझम्ला अप्रस्तुत आहे.

सर्वधर्मसमभावासंबंधी बोलावयाचे तर सर्व धर्मांचा पारलौकिक आशय एकच आहे हा त्याचा आशयही नाही आणि आधारही नाही. सर्व धर्मांचा पारलौकिक आशय कदाचित एक नसला तरी सर्वधर्मसमभावाला बाध येत नाही. सर्वधर्मसमभावाचा आधार केवळ साधी नागरी सभ्यता एवढाच आहे. समाजाची धारणा सर्वधर्मसमभावी आहे याचा अर्थ प्रत्येक व्यक्तीने रोज राम-रहीम या जोडनामाचा उच्चार एकदा पूर्वेकडे आणि एकदा पश्चिमेकडे तोंड करून करावा असा नाही. त्याचा अर्थ इतकाच की मी माझ्या घरी हवेतर केवळ रामनाम घ्यावे. परंतु रहीमचा उच्चार करणाऱ्या शेजाऱ्याच्या धार्मिक भावनांचा आदर करावा. मानवी मनाच्या गरजा भिन्न आहेत, विविध आहेत, याची जाणीव आणि या विविधतेनेच सामाजिक जीवन संपन्न आणि समृद्ध होते ही धारणा हीच सर्वधर्मसमभावाची आधार आहे.

सारांश, सेक्युलॅरिझम्ची मूळ कल्पना केवळ राज्यसंस्था आणि धर्मसंस्था यांमधील परस्परसंबंधांपुरतीच मर्यादित आहे. राज्यसंस्थेचे अधिकारक्षेत्र मानवी जीवनाच्या इहलौकिक बाबींपुरते आणि धर्मसंस्थेचे अधिकारक्षेत्र पारलौकिक बाबींपुरते मर्यादित करावे ही तिची मूळ कल्पना आहे. भारतीय लोकशाही आणि अनेक धर्मीय भारतीय समाज यांच्या संदर्भात या कल्पनेचा विस्तार करावयाचा तर आणखी दोन घटक लक्षात घ्यावे लागतात. ते म्हणजे व्यक्ती व समाज. व्यक्तीला कोणत्याही धर्माची उपासना, आचार आणि प्रसार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. परंतु त्यात पारलौकिक बाबींपुरती मर्यादित केलेली धर्माची कक्षाच अभिप्रेत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर समाजाची धर्मविषयक धारणा सर्वधर्मसमभावी असावयास हवी. साधी नागरिक सभ्यता, दुसऱ्याच्या भावना व निष्ठा यांविषयी आदर आणि मानवी जीवनातील भिन्नता आणि विविधता यांविषयी सहृदय एवढाच सर्वधर्मसमभावाचा आशय आणि आधार आहे. ○



# डॉक्टर खोसला प्रकरणाच्या निमित्ताने

**मुलाखतींचे संयोजन : दत्तप्रसाद दाभोळकर**

'**मा**णूस'चा तेरा नोव्हेंबरचा अंक. त्या अंकातील इतर सारा मजकूर बाजूला ठेवून एका वाचकाचे ते पत्र मी पुन्हा पुन्हा वाचले. त्या वाचकाने नेमके मर्मावर बोट ठेवले होते. त्याने उपहासाने लिहिले होते, 'या देशात आता लोकशाही तशी रुजलीय ! अन्नाचा आणि भिकेचा वाडगा घेऊन आपण आज देशोदेश हिंडतो आहोत. तसे पाहिले तर अन्नप्रश्नाची चर्चा आपण अग्रक्रम देऊन केली पाहिजे. पण ते राहिले बाजूला. कृषी विद्यापीठे कोठे उभारावीत, या प्रश्नावर आपण हमरी-तुमरीवर येतोय. सीमेवर आणि सीमेच्या आत अनंत प्रश्न पुरुषार्थाला आव्हान देत उभे आहेत. इतिहास घडविण्याचा हा काळ आहे. मात्र इतिहास घडविण्याऐवजी कोणत्या ऐतिहासिक पुरुषांचे पुतळे उभारावेत या चर्चेत आपण दंग आहोत. सारे

रोम जळत असताना निरो सारंगी वाजवीत होता. त्या निरोनेही हेवा करावा, अशी काही वरची पातळी आपण आज गाठली आहे...'

त्या वाचकाचे ते म्हणणे मला पटले होते. ज्या प्रश्नांनी अस्वस्थ व्हावे, वेडेपिसे व्हावे, झोप उडावी, असे प्रश्न आपण चटकन विसरतो. भलत्याच गोष्टीत रंगून जातो ! प्रत्येक भारतीय अस्वस्थ व्हावा, त्याचे मन अभिमानाने, संतापाने आणि शरमेने भरून यावे, अशी एक घटना नुकतीच घडली.

ती सकाळ. रेडिओवरच्या सकाळच्या मराठी बातम्या.

"कुसूम रानडे आपल्याला प्रादेशिक बातम्या देत आहेत ...... 'डॉ. हरबिंदरसिंग खोराना या सेहेचाळीस वर्षांच्या तरुण भारतीय शास्त्रज्ञाला यंदाचे नोबेल पारितोषिक वहाल करण्यात आलेले आहे... डॉ. खोराना यांनी अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारलेले असून ते सोडण्याचा त्यांचा विचार नाही.'"

त्यानंतर आठवडाभर उलटसुलट बातम्या येत होत्या. भारताबद्दल बोलावयाची वेळ आली की, खोराना अद्वातद्वा बोलतात. रागाने लाल होऊन बोलतात. खोरानांना भारतात साध्या नोकऱ्या नाकारल्या गेल्या. रेल्वे स्टेशनवरसुद्धा त्यांना अपमानास्पद वागणूक मिळाली ! 'लाल फिती'चा गळफास आपल्या संशोधनकार्याला लागू नये म्हणून त्यांनी नाइलाजाने देशत्याग केला. भारताने या शास्त्रज्ञाचा तेजोभंग केला. तसे पाहिले तर एकापाठोपाठ येणाऱ्या या बातम्यांतसुद्धा विसंगती होती. खरे सांगायचे तर सर्वसामान्य जनता, सरकार आणि वृत्तपत्रे कशी भांबावून गेलीत याचा या बातम्या जणू पुरावा होत्या.

एक गोष्ट मात्र खरी होती, भारतात जन्मलेल्या, भारतात वाढलेल्या, आयुष्यातील पायाभरणीचे शिक्षण भारतात झालेल्या एका तरुणाला संशोधनक्षेत्रातला सर्वोच्च सन्मान मिळाला होता आणि भारतात राहिलो असतो तर आपल्याला हे संशोधन करता आले नसते असे त्याने सांगितले होते. या देशातील वातावरण संशोधन करावयाला कुचकामी आहे, असा त्याचा दावा होता. सर्वसामान्य जनतेची कल्पना मात्र वेगळी होती. हा गरीब देश स्वतःला परवडणार नाही असा खर्च संशोधनावर करतो आहे अशी आकडेवारी होती. त्यानंतर काही दिवस वृत्तपत्रांतून उलटसुलट अग्रलेख आले. चहा घेता घेता गरम नरम चर्चा झाल्या. सरकारी प्रवक्त्यांनी काही खुलासे केले. जागरूक वाचकांनी पत्रे लिहिली. या चर्चेमधूनपण खूप परस्परविरोधी मते प्रकट झाली. 'कुणाचा कुणाला मेळ नाही' हाच वग पुढे सुरू राहिला. या चर्चेत प्रकट झालेल्या परस्परविरोधी मतांचे संकलन आपण असे करू शकू :

- भारताच्या संशोधनक्षेत्रातील जागा काही वृद्ध शास्त्रज्ञ अडवून

बसले आहेत. तरुणांना योग्य वाव मिळत नाही. 'लाल फिती'चा धुमाकूळ तर संशोधनक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर आहे.

● खोरानांना भारतात नोकरी मिळत नव्हती हे साफ खोटे. त्यांना योग्य सोयी उपलब्ध असलेल्या नोकऱ्या दोनदा देऊ केल्या होत्या. खोरानांनीच त्या नाकारल्या.––स्वतःच्या स्विस वायकोला भारतात राहावयास आवडत नाही म्हणून नाकारल्यात ! साऱ्याच तरुण शास्त्रज्ञांना भारतात आज खूप मोठी संधी उपलब्ध आहे.

● जग आज झपाट्यानं जवळ येतंय. संशोधन कार्याला तर देशाच्या कृत्रिम सीमा कधीच नसाव्यात. आपण परदेशांत राहून मोलाचे संशोधन करू, असे ज्या तरुणांना वाटते त्यांना खुशाल परदेशांत जाऊ दे. ते तरुण शेवटी मानव जातीचीच सेवा करताहेत. ते जन्माने भारतीय आहेत एवढे श्रेय आपणांला खूप झाले.

● तंत्रज्ञांनी परदेशांत स्थायिक होण्यासाठी जाण्याची लाट आज या देशात उसळलेली आहे. तंत्रज्ञ जेव्हा स्थायिक होण्यासाठी परदेशांत जातात त्या वेळी देशाने त्यांच्या शिक्षणावर खर्च केलेला वेळ व पैसा वाया जातो. त्यामुळे या स्थलांतराला आपण आता बंदी घातली पाहिजे. किमानपक्षी परदेशांत स्थायिक होण्यासाठी जाणाऱ्या तरुणांकडून हा सारा खर्च वसूल होईल असा एखादा बाँड आपण डॉलर्सच्या स्वरूपात घेतला पाहिजे.

● आपण आपल्या शिक्षणक्षेत्राचीच आज पुनर्रचना केली पाहिजे. देशाला अर्थशास्त्रज्ञ, प्रशासक, वृत्तपत्रकार, समाजशास्त्रज्ञ, न्यायाधीश या साऱ्या क्षेत्रांत कर्तबगार, हुशार तरुण हवे असतात. आपल्याकडे हुशार मुलांना फक्त डॉक्टर, इंजिनीअर वा शास्त्रज्ञ बनविण्याचे आज खूळ निघालंय. परिणामी या क्षेत्रांतील असंख्य तंत्रज्ञांना नोकऱ्या नसल्याने परदेशांत जावे लागते आणि इतर क्षेत्रांत कर्तबगार तरुणांचा तुटवडा पडतो.

● आज बनवितो आहोत तेवढ्याच गतीने आपण तंत्रज्ञ बनविले पाहिजेत. कारण आपणांला मध्ययुगात वावरणारा चाळीस कोटींचा हा देश झपाट्याने विज्ञानयुगात न्यावयाचा आहे. विज्ञानाची प्रगती एवढ्या

वेगाने होते आहे की, अजून काही दशके या देशातील तरुणांना तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ या दोनच शब्दांची मोहिनी पडली पाहिजे.

या परस्परविरोधी चर्चेत आणखी दोन गोष्टी नोंद करण्यासारख्या होत्या. पहिली गोष्ट अशी–११ डिसेंबर १९६८ या दिवशी खोरानांनी हेगला नोबेल पारितोषिक स्वीकारले. त्या दिवसापूर्वीच ही चर्चा बहुतांशी संपुष्टात आलेली होती. पुन्हा एखादी असली घटना घडेपर्यंत या विषयावर आता फारशी चर्चा होईल असा पण रंग नव्हता. झालेल्या चर्चेपासून काही बोध घेऊन शासनाने काही ठाम धोरण जाहीर केलेले नव्हते आणि या चर्चेच्या संदर्भात घडलेली दुसरी गोष्ट अधिक महत्त्वाची होती. भारतात व भारताबाहेर संशोधनक्षेत्रात काम करणाऱ्या भारतीयांपैकी फारच थोड्या शास्त्रज्ञांनी या चर्चेत आपले मत नोंदवले होते. खरे पाहता या लोकांच्या दृष्टीने हे प्रश्न महत्त्वाचे होते. या लोकांच्या तक्रारी, अडचणी, मते समजावून घेणे अगत्याचे होते.

' माणूस 'चा प्रतिनिधी म्हणून मी संशोधनक्षेत्रातील काही मान्यवर मंडळींना भेटलो. त्यांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या लोकांना भेटलो तेव्हा माझे वा ' माणूस 'चे म्हणून एकही मत माझ्याबरोबर नव्हते. निरनिराळ्या वृत्तपत्रांतून आलेल्या व वर नोंदवलेल्या प्रतिक्रिया मी फक्त त्या शास्त्रज्ञांच्यासमोर ठेवल्या. त्यांवरच्या त्यांच्या प्रतिक्रिया विचारल्या आणि या लोकांना भेटलो तेव्हा मला सुखद आश्चर्याचा एक धक्का बसला. त्या साऱ्या शास्त्रज्ञांनी या प्रश्नावर अस्वस्थ होऊन विचार केलेला होता. लोकांत काय बोलले जाते हे त्यांना माहीत होते. या प्रश्नावर त्या शास्त्रज्ञांची स्वतःची अशी काही मते आहेत. अनुभवावर आणि भरभक्कम पुराव्यावर ती मते आधारलेली आहेत. मी निवडलेले शास्त्रज्ञ वयाच्या तिशीतल्या तरुणांपासून ते सत्तरी ओलांडलेल्या वृद्धांपर्यंतचे होते. त्यांत राष्ट्रीय प्रयोगशाळांचे प्रमुख होते, परदेशांत स्थायिक होऊ पाहणारे तरुण होते, एक तपाहून अधिक काळ परदेशांत काढून नुकतेच मायभूमीला परत आलेले शास्त्रज्ञही होते.

वरवर पाहिले तर एकाच्या मताचा मेळ दुसऱ्याच्या मताशी बसत नव्हता. ते विचार तसे विसंगत वाटत होते. पण वरवर परस्परविरोधी वाटणाऱ्या त्यांच्या त्या मतांमागे समान विचारांचे एक सूत्र होते. निदान मला तरी तसे ते जाणवले. एका अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नाचे तेवढेच अस्वस्थ करणारे उत्तर मला मिळाले. त्या शास्त्रज्ञांनी मला जे काही सांगितले ते मी तुम्हांला जवळजवळ त्यांच्याच शब्दांत सादर करतो आहे. कुणी सांगावे, मला जे जाणवले ते कदाचित तुम्हांलाही त्या मुलाखती वाचल्यावर जाणवेल.

..................................

............


एक लक्षात घ्या की, केवळ पैशासाठी नाही तर स्वत:च्या अंगभूत गुणांच्या विकासासाठी हे तरुण आपला देश सोडतात.



डॉ. श्रीकृष्ण दवे

१

" १४ वर्षांच्या कोवळ्या पोरापोरींनी घेतलेल्या ' डेटस ', ड्रेन पाईप पॅन्ट, रॉक एन् रोल डान्स अधूनमधून जागरूक वाचकांच्या वाचनात येणारे डॉ. किन्सेसारख्यांचे अहवाल, या गोष्टींमुळे असेल कदाचित् पण बहुसंख्य भारतीयांच्या मनातील अमेरिकन जीवनाबद्दलची प्रतिमा तशी ढवळलेली आहे. तसे पाहिले तर हे सारे खरेही आहे. पण आणखीही काही गोष्टी खऱ्या आहेत. या सर्वांत श्रीमान आणि प्रगत देशांनी स्वत:चे असे काही मानबिंदूपण निर्माण केलेत. अमेरिकन शिक्षणपद्धती हा अमेरिकेचा मानबिंदू आहे. इतर शंभर गोष्टींत हे लोक कदाचित तडजोड करतील. पण स्वत:च्या शिक्षण संस्थांचे पावित्र्य, त्यांची उंची हे लोक खाली येऊ देणार नाहीत. अमेरिकेतील विद्यापीठे समजावून घेतलीत तर तुम्हांला अमेरिकन जीवनाचे बरेचसे आकलन होईल. त्याच वेळी भारतातील बुद्धिमान तरुणांना अमेरिकेचे आकर्षण का वाटते याचाही तुम्हांला उलगडा होईल. कारण, भारतातील बहुतेक हुशार शास्त्रज्ञ अमेरिकन विद्यापीठांत स्थायिक झालेत. अमेरिकेतील शिक्षण संस्थांची कार्य-



पद्धती कळल्यावर अमेरिकेत स्थायिक झालेल्या हुशार भारतीय शास्त्रज्ञांबद्दलचे तुमच्या मनातील गैरसमज नाहीसे होतील. त्या शास्त्रज्ञांना भारतात कोणते बदल अपेक्षित आहेत हेपण तुम्हांला कळून येईल.

डॉ. श्रीकृष्ण दवे मोकळेपणाने माझ्याशी बोलत होते. एका तपाहून अधिक काळ अमेरिकन विद्यापीठांत काम करून डॉ. दवे नुकतेच भारतात परत आले ते कायमचे भारतात स्थायिक होण्यासाठी! डॉ. दवे मूळचे अहमदाबादचे. त्यांचे आई आणि वडील दोघेही गुजराथमधील नावाजलेले शिक्षणतज्ज्ञ होते. एम्. एस्सी. (टेक) आणि पीएच्. डी. या दोन पदव्या अत्युच्च सन्मानांसह मिळवून दवे ५६ साली अमेरिकेला गेले. इंडियाना विद्यापीठात प्राध्यापक आणि संशोधक म्हणून ते दहा वर्षे काम करीत होते. इस्रायलच्या डॉ. वाईजमन प्रयोगशाळेतपण ते एक वर्ष काम करून आलेत. भारत आणि अमेरिका इथल्या वातावरणात त्यांना कोणता फरक जाणवतो, अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीय शास्त्रज्ञांच्या अपेक्षा काय आहेत, एवढयापुरतीच डॉ. दवे यांनी आपली मुलाखत मर्यादित ठेवली होती.

—डॉ. दवे म्हणाले . . .

"अमेरिकेत स्थायिक होणाऱ्या साऱ्या तरुणांना एकाच मापाने मोजणे चूक होईल. या तरुणांत दोन प्रकारची वर्गवारी करता येईल. डॉक्टरेट घेणारे सारेच तरुण काही शेवटी असामान्य बुद्धिमत्तेचे नसतात. सर्वसामान्य बुद्धिमत्तेच्या भारतीय शास्त्रज्ञांना भारतात पुरेशा नोकऱ्या नसताना किंवा जास्ती तंत्रज्ञ उपलब्ध असताना, अमेरिकेतील फार मोठ्या पगाराचा मोह पडला आणि ते अमेरिकेत स्थायिक झाले तर त्यात तसे खटकण्यासारखे काही नाही, त्यामुळे देशाचे काही नुकसान होणार आहे असेही नाही. उलट या गोष्टीमुळे देशाचा फायदा होतो;

कारण भारतातील एकत्र कुटुंब–पद्धतीमुळे अमेरिकेत स्थायिक झालेले बहुतेक लोक, डॉलर्सच्या स्वरूपात काही रक्कम या देशात पाठवत असतात. त्यामुळे देशाला नकळत परकीय चलन मिळून जाते. विचारांची आणि ज्ञानाची देवाणघेवाणपण त्यामुळे सुलभ होते. एखाद्या भागाचा विकास करावयाचा असेल तर, त्या भागातील साऱ्या तरुणांनी त्या भागातच राबले पाहिजे ही कल्पनाच शेवटी चुकीची आहे. साधे उदाहरण घ्या. पंजाब हा भारतातला सर्वांत समृद्ध आणि प्रगत प्रदेश आहे. आणि सर्वांत अधिक सरदारजीच जगभर विखुरलेले आहेत. देशातील सर्वसामान्य कुवतीचे लोक परदेशांत गेले म्हणून देशाचे काही नुकसान होत नाही हे माझे मत आहे. पंजाबचे उदाहरण माझे म्हणणे स्पष्ट करावयास पुरेसे आहे.

पण ज्या वेळी देशातील असामान्य बुद्धिमत्तेचे तरुण देशात संधी नाही म्हणून देश सोडतात, त्या वेळी मात्र देशाचे नुकसान होते. एक विचित्र परिस्थिती निर्माण होते. हे तरुण काही पैशासाठी देश सोडत नाहीत. कोणताही जातिवंत कलावंत वा शास्त्रज्ञ हा पैशापेक्षा स्वतःच्या अंगभूत गुणांचा विकास करावयालाच अधिक महत्त्व देत असतो. पैसा ही त्याच्या मते दुय्यम गोष्ट असते. अमेरिकेतही शिक्षण संस्थांत असलेले पगार इतर उद्योगधंद्यांच्या मानाने खूप कमी आहेत. पण तरीही शेवटी अमेरिकेतील प्रमुख शास्त्रज्ञ आणि अमेरिकेत स्थायिक झालेले प्रमुख भारतीय शास्त्रज्ञ तुम्हांला विद्यापीठांत काम करतानाच आढळून येतील. कारण अमेरिकन विद्यापीठांची रचना बुद्धिमान तरुणांना भूल पाडील अशी केलेली आहे. त्यांच्या कर्तृत्वाला तेथे वाव आहे, याबद्दल त्यांची खात्री पटलेली आहे.

या गोष्टी अमेरिकेत दोन प्रकारे साध्य केलेल्या आहेत–शिक्षक असणे हा अमेरिकेत फार मोठा सन्मान समजला जातो. सामाजिक जीवनात शिक्षकाला फार मोठी प्रतिष्ठा असते. गेल्या शतकात आपल्याकडे पंतोजींना गावात जो मान असे त्याहून अधिक मान आज अमेरिकेत प्रोफेसरला मिळतो आणि अमेरिकत प्रोफेसर-पद मिळवणे आणि टिकवणे हे एक दिव्य असते. तुम्हांला प्रोफेसर म्हणून निवडतात त्या वेळी तुम्ही कोणाचे विद्यार्थी आहात, तुमच्या किती ओळखी आहेत, तुम्ही कोणत्या देशातील आहात या गोष्टींना काहीही किंमत नसते. तुमच्या अद्ययावत ज्ञानाची निःपक्षपाती परीक्षामंडळाकडून परीक्षा घेतली जाते. पुढील दोन वर्षांत तुम्ही कोणते संशोधन करणार आहात, याचा आराखडा तुम्हांला परीक्षा मंडळा-समोर मांडावा लागतो. या सर्व कसोट्यांना उतरलात तर तुम्हांला प्रोफेसरपद मिळते. मात्र प्रोफेसर हे पद तुम्हांला कायमचे म्हणून कधीच बहाल केले जात नाही. तुम्ही अगदी नोबेल पारितोषिकाचे मानकरी असलात तरी तुम्हांला कायमची प्रोफेसरकी मिळत नाही ! दर दोन वर्षांनी तुम्ही काय काम केलेत याचा आढावा घेतला जातो. तुम्हांला शिकवावयास जमते का हे ठरविण्यासाठी विद्यार्थ्यांना मत-

दान करण्याचा अधिकार असतो. या सर्व कसोटचांना उतरलात तर तुम्हांला पुन्हा दोन वर्षांसाठी प्रोफेसर म्हणून नेमले जाते.

भारतात याच्या किती उलट परिस्थिती आहे याचा विचार करा. शिक्षकांचा फक्त पगारच कमी आहे असे नव्हे, तर सामाजिक जीवनात 'शिक्षक' हा शब्द आपण हास्यास्पद बनवलाय ! त्यातूनही पुन्हा या नोकऱ्या देतानाही इतर अनेक अवांतर गोष्टींचा फार विचार होतो. आपल्या विद्यापीठांत आणि राष्ट्रीय प्रयोगशाळांतही नोकरी कायमची म्हणून दिली जाते. तुमचा वरिष्ठ निवृत्त होईपर्यंत तुमचा वरिष्ठ राहतो. बऱ्यापैकी 'ओळख' असलेला तुमचा सहकारीही तुमचा वरिष्ठ बनू शकतो– भारतात मला योग्य संधी नव्हती, असे डॉ. खोराना या यंत्रणेच्या संदर्भात म्हणाले होते ! आणि त्यांचे ते म्हणणे बरोबर होते हे तुम्ही मान्य कराल. खोरानांना भारताबद्दल प्रेम नाही, असा काही समज भारतात पसरवलेला आहे. मला वाटते तो समज चुकीचा आहे. खोरानांना मी ओळखतो. खोरानांचा आवडता विद्यार्थी मल्होत्रा तर माझा जानी दोस्त आहे. गेली अनेक वर्षे स्वतःचे विद्यार्थी निवडायचे असतील त्या वेळी खोराना शक्यतो भारतीय निवडतात. त्या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन भारतीय पद्धतीचे जेवण जेवावयास त्यांना आवडते. एवढेच नव्हे तर आपल्या विद्यार्थ्यांना आवर्जून त्यांनी भारतात जाऊन स्थायिक होण्याचा प्रयत्न करावा म्हणून ते सांगतात आणि खोरानांच्या मनात भारताबद्दल जी ओढ आहे, निदान तेवढी तरी ओढ अमेरिकेतील प्रमुख भारतीय शास्त्रज्ञांच्या मनात भारताबद्दल आहे.

त्यामुळेच आपण आपल्या विद्यापीठांची पुनर्रचना केली, 'शिक्षक' या शब्दाला फार मोठी सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली, निवड करण्याची आणि बढती देण्याची आपली पद्धत सुधारली, विद्यापीठे आणि राष्ट्रीय प्रयोगशाळा यांचे सहकार्य वाढले, तर अमेरिकेत राहणारे अनेक बुद्धिमान तरुण भारतात परत येतील.

या गोष्टी केव्हा होतील हे मला माहीत नाही. पण निकडीची म्हणून एक वेगळी गोष्ट आपण करू शकू. भारतातील विद्यापीठांचा आणि अद्ययावत ज्ञानाचा संबंध सुटून आता खूप वर्षे झाली आहेत ! डॉ. खोराना मध्यंतरी म्हणाले, "कलकत्ता आणि मुंबई विद्यापीठे ही भारतातील प्रमुख विद्यापीठे आहेत. पण या विद्यापीठांतील विज्ञान विषयाच्या प्राध्यापकांपैकी सत्तर टक्के प्राध्यापक, अमेरिकन विद्यापीठांची डॉक्टरेटच्या अभ्यासक्रमाची प्रवेश-परीक्षासुद्धा उत्तीर्ण होणार नाहीत." भारतात परत आल्यावर मला वाटले खोराना थोडे चुकले आहेत. ही टक्केवारी आज नव्वद टक्क्यांपर्यंत सहज वाढलेली आहे ! मी हे विधान कोणाला दुखविण्यासाठी करीत नाही. केवळ खळबळ माजविण्यासाठीही करीत नाही. मी हे विधान पूर्ण विचारांती, जबाबदारीने करतोय. या विद्यापीठातील दहा टक्के प्राध्यापक मला

## कहाणी अ‍ॅटमबॉम्बच्या जन्माची....

शास्त्रज्ञ राष्ट्राचे काही देणे लागतात. राष्ट्राने शास्त्रज्ञांचा अपमान केला तरी शास्त्रज्ञ आपली जबाबदारी विसरू शकत नाहीत. निदान गेल्या पिढीतील अमेरिकन शास्त्रज्ञांना असे वाटावयाचे. ज्या अ‍ॅटमबॉम्बने दुसऱ्या महायुद्धाचा निकाल लावला त्या अ‍ॅटमबॉम्बची ही जन्मकथा. कहाणी अ‍ॅटमबॉम्बच्या जन्माची आणि अमेरिकन शास्त्रज्ञांच्या देशप्रेमाची !

हॉन आणि मिटनर यांचा 'युरेनियमचा किरणोत्सर्ग' हा प्रबंध प्रसिद्ध झाल्यावर अमेरिकन शास्त्रज्ञांत खळबळ माजली. अणुबॉम्बसारखे एखादे अस्त्र बनविता येईल हे त्यांच्या लक्षात आले. हिटलर या क्षेत्रात आघाडी मारील अशी त्यांना भीती वाटली. नोबेल पारितोषिकाचा मानकरी डॉ. फर्मी याने अमेरिकेच्या संरक्षणखात्याला या संकटाची कल्पना देणारे पत्र लिहिले. त्याच्या पहिल्या दोन पत्रांना साधी पोचसुद्धा देण्यात आली नाही. शेवटी फर्मीने चिडून पत्र लिहिले आणि त्या पत्राचा मात्र उपयोग झाला. या जगविख्यात शास्त्रज्ञाबरोबर चर्चा करण्यासाठी संरक्षणखात्याने १७ मार्च १९३९ ला एक कॅप्टन पाठवून दिला ! जुलै १९३९ मध्ये त्या कॅप्टनने अहवाल पाठविला. 'फर्मीचे म्हणणे पटण्यासारखे नाही. फर्मी काही विचित्र बडबडतो आहे !'

फर्मी तरीही निराश झाला नाही. फर्मी, झिलार्ड, टेलर, विशकॉक आणि विगर हे पाच शास्त्रज्ञ आईन्स्टाइनला जाऊन भेटले. आईन्स्टाइन आणि प्रे. रूझवेल्ट यांच्या व्यक्तिगत मैत्रीचा आईन्स्टाइनने या वेळी उपयोग करावा, अशी त्यांनी मागणी केली. आईन्स्टाइनने ऑगस्ट १९३९ मध्ये प्रे. रूझवेल्टना पत्र लिहिले. त्या पत्राची पोच यावयास १९३९ चा ऑक्टोबर महिना उजाडला आणि शेवटी आईन्स्टाइनला नाही म्हणणे कठीण दिसते म्हणून, वीस फेब्रुवारी १९४० ला फर्मीच्या हातात अणुबॉम्बच्या निर्मितीची सुरुवात करण्यासाठी, सहा हजार डॉलर्सची प्रचंड रक्कम देण्यात आली ! या एवढ्या रकमेवर अमेरिकन शास्त्रज्ञांनी कार्याला सुरुवात केली. संरक्षण खात्यातील उर्मट अधिकाऱ्यांची आणि बेपर्वा मंत्र्यांची समजूत घालत घालत अधिकाधिक रक्कम मिळविली. परिणामी अणुबॉम्ब निर्मितीच्या क्षेत्रात अमेरिका सदैव अग्रेसर राहिली. फर्मी त्या वेळी व्यक्तिगत अपमानामुळे शांत राहिला असता वा त्याने देशांतर केले असते, तर दुसऱ्या महायुद्धाचा निकाल किती वेगळा लागला असता !

भेटले आणि माझे म्हणणे त्यांनी खोडून काढले तर मी चुकलो हे जाहीर करताना पहिला आनंद मला होईल. अमेरिकेत पदवीपरीक्षेचा अभ्यासक्रम दरवर्षी बदलला जातो. एकही ठराविक पुस्तक त्या परीक्षेला नसते. अद्ययावत ज्ञानाशी तुमचा केवढा संबंध आहे तेवढेच फक्त परीक्षेत अजमावले जाते...आणि इकडे मुंबई आणि कलकत्ता विद्यापीठांतील विज्ञान विषयाचे अभ्यासक्रम आणि पुस्तके गेल्या चाळीस वर्षांत फारशी बदललेली नाहीत. म्हणूनच प्राध्यापकांना आकर्षक वेतनश्रेणी आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देत असतानाच, त्यांच्यासाठी सुटीमध्ये सक्तीच्या परीक्षा घेतल्या पाहिजेत. त्या परीक्षांचा अभ्यासक्रम ठरविण्यासाठी आणि प्राध्यापकांना शिकविण्यासाठी चंद्रशेखर, खोराना, मित्रा या इतर शास्त्रज्ञांना सुटीत भारतात बोलावले पाहिजे, त्यामुळे त्या शास्त्रज्ञांचा देशाशी असलेला संबंध अजिबात सुटला असे होणार नाही आणि आमच्या प्राध्यापक मंडळींचाही अद्ययावत ज्ञानाशी थोडाफार संबंध येईल !" ◻




... ... ... ...


पण मी म्हणतो की, चंद्रशेखर काय किंवा डॉ. खोराना काय या लोकांना भारतात परत आणण्याचा हट्ट कशासाठी? त्यांच्या संशोधनाची आपल्याला खरंच गरज आहे का?




## डॉ. बा. शं. जोशी

## २

तुम्हांला माहीत आहे? – 'सल्फर' हा शब्द तसा भारतीय आहे. गंधक शोधून काढले प्रथम आपण भारतीयांनी. त्याच्या गुणधर्मांचा अभ्यासही प्रथम आपणच केला. गंधकाच्या गुणधर्मावरून आपण त्याला 'शल्वारू' (धातूंचा शत्रू) असे म्हणत होतो आणि आपल्या ग्रंथावरून गंधकाचा अभ्यास करणारे लोक त्याला शल्वारू, सल्फरू, सल्फर म्हणू लागले. एखाद्या शास्त्रीय संज्ञेला प्रतिशब्द योजण्यासाठी समिती नेमून बहुधा काही उपयोग होत नाही. मुलाचे नाव शेवटी आई-वडिलांनी ठेवावयाचे असते. इतरांनी जमेल तशी त्याला त्या नावाने हाक मारावयाची असते. शास्त्रीय जगातल्या संज्ञापण बहुधा अशाच ठरविल्या जातात. तो मान शेवटी त्या त्या संशोधकाला असतो. डॉ. बी. एस. जोशी यांना भेटावयास चाललो त्या वेळेस मला नकळत हे सारे आठवले. कारण, डॉ. जोशी यांनी नुकताच चाफ्याच्या फुलातून एक महत्त्वाचा औषधी घटक पदार्थ शोधून काढला. त्याचे नाव त्यांनी ठेवलंय 'चंपाकीन.' आज जगभर त्या पदार्थाला 'चंपाकीन'च म्हटले जाते. आणि डॉ. जोशींनी केलेले संशोधनकार्य





एवढे विस्तृत आणि विविध आहे की, 'चंपाकीन' ही आपली त्यातली एक मामुली गोष्ट !

डॉ. जोशी मूळचे धारवाडचे. प्रख्यात कन्नड भाषाशास्त्रज्ञ शं. वा. जोशी यांचे ते चिरंजीव. आयुष्यातील पहिली डॉक्टरेट त्यांनी वेंकटरामन या प्रख्यात भारतीय शास्त्रज्ञाच्या हाताखाली मिळविली. त्यानंतर डॉ. जोशी केंब्रिजला गेले. त्रेपन्न सालची ती गोष्ट. डॉ. खोरानांनी ज्या वेळी केंब्रिज सोडले त्याच वेळी डॉ. जोशी यांनी केंब्रिजला प्रवेश केला. खोरानांनी ज्या डॉ. टॉड यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टरेट संपादन केली त्याच डॉ. टॉड यांच्या मार्गदर्शनाखाली जोशींनीपण आपली डॉक्टरेट संपादन केली. आयुष्यातील ही दुसरी डॉक्टरेट मिळवल्यावर डॉ. जोशी शिकागोला गेले. डॉ. मॉरिश हॅरास यांचे सहकारी म्हणून त्यांनी दोन वर्षे काम केले. डॉ. जोशींनी त्यांच्याबरोबर काम केले त्याच डॉ. टॉडना नोबेल पारितोषिक मिळाले आणि डॉ. मॉरिश हॅरासनाला ते कधी मिळणार हा फक्त वेळेचाच प्रश्न आहे.

अठ्ठावन्न साली डॉ. जोशी भारतात परत आले. संशोधनक्षेत्राबाहेर काम केले असते तर मोठ्या पगाराच्या नोकऱ्या त्यांना खूप मिळत होत्या. पण डॉक्टरांना या क्षेत्राबाहेर काम करण्याची इच्छा नव्हती. गेले एक तप ते संशोधनक्षेत्रातच काम करताहेत. जगातील मान्यवर मासिकांतून त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रसिद्ध केलेल्या प्रबंधांची संख्या पन्नासाहून अधिक आहे आणि डॉ. जोशींच्या कामाचा आजचा तडाखा पाहिला तर ते अगदी लवकरच शतक ओलांडणार हे उघड आहे.

डॉ. जोशी भारतात परत आले. भारतात रा न त्यांनी मोलाचे संशोधन केले. त्यांची मते डॉ. टिळकांसारखी असणार अशी माझी आपली कल्पना होती. पण

डॉक्टरांनी मला गेल्या गेल्या आश्चर्याचा धक्का दिला. ते म्हणाले, " भारतातील परिस्थिती खरोखरच विचित्र आहे. पुरेशा नोकऱ्या आणि पुरेशा सोयी उपलब्ध नाहीत. भारतात हवी त्या प्रकारची नोकरी मिळवणे खरोखरच कठीण आहे. माझीच गोष्ट घ्या. अठ्ठावन्न साली भारतात परत यावे ही माझी प्रामाणिक इच्छा होती. आल्यावर संशोधनक्षेत्रातच काम करावयास मिळावे एवढी माफक मागणी होती. त्या वेळी मला भारतात नोकरी मिळाली याचे साधे सरळ कारण म्हणजे मी डॉ. वेंकटरामन यांचा विद्यार्थी होतो. त्यांचा आवडता होतो. योगायोगाने त्याच वेळी पुण्याची ' नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ' निघालेली होती. त्यात त्यांचा सहकारी म्हणून डॉ. वेंकटरामन मला घेऊ शकले. पण माझ्याबरोबरच्या इतर अनेकांना ती नोकरी मिळण शक्य नव्हते. त्यांची भारतात परत येण्याची खरोखरच इच्छा होती. माझ्या त्या मित्रांनी त्या वेळी माझ्याइतकेच प्रबंध प्रसिद्ध केलेले होते. पण त्यांची आणि वेंकटरामन यांची ' ओळख ' नव्हती. भारतातही ' ओळख ' हे प्रकरण फार महत्त्वाचे आहे. आणि खरे सांगू, त्यात कोणाचाच दोष नाही. जेव्हा कमी नोकऱ्या आणि जास्ती लोक अशी विचित्र परिस्थिती असते त्या वेळी जगभर हेच घडते. मला वाटते, आपण ज्या प्रश्नावर बोलणार आहोत, तो प्रश्न असा थोडा वेगळा आहे. राजकारणी लोकांनी आणि वृत्तपत्रकारांनी या प्रश्नाची एक वेगळीच प्रतिमा जनमानसात तयार केली आणि ' साप साप ' म्हणत आपण भुई थोपटत बसलोय. आणि जे प्रश्न विचारात घ्यावयास पाहिजेत ते तर आपण अजून विचारातच घेतलेले नाहीत.

## साहेबाची भ्रष्ट नक्कल

साहेबाची भ्रष्ट नक्कल करण्याची आपली जुनीपुराणी सवय अजूनही कायम आहे. आपण उचललेला ' ब्रेनड्रेन ' हा शब्द याचे अगदी ' लेटेस्ट ' उदाहरण. खरे पाहता हा शब्द प्रथम काही वर्षांपूर्वी इंग्लंडमध्ये निघाला. त्यांच्या संदर्भात तो शब्द बरोबर आहे. कारण तेथे तयार तंत्रज्ञ आहेत. त्यांना पुरेशा नोकऱ्या त्या देशात आहेत. पण तरीही देशात राहून ते काम करण्याऐवजी ते तरुण अमेरिकेत जाताहेत. इंग्लंडमध्ये जेवढा पगार मिळतो त्या मानाने अमेरिकेत अधिक पगार मिळतो हे त्यामागचे एकमेव कारण आहे. स्वित्झर्लंड, जर्मनी येथे तशी परिस्थिती नाही; कारण त्यांचेही पगार अमेरिकेच्या जवळपास आहेत. त्यामुळे तेथील तरुण अमेरिकेत जात नाहीत. भारतात याच्या उलट परिस्थिती आहे. आपल्याकडे संशोधनक्षेत्रापुरते बोलावयाचे तर फार थोड्या नोकऱ्या उपलब्ध आहेत. त्या तयार तरुणांना भारतात नोकऱ्या नाहीत म्हणून ते अमेरिकेत गेले तर बिघडले कुठे ? आज अमेरिकेत आठशे भारतीय बायोकेमिस्ट आहेत. त्या विषयातील फारच थोडे संशोधन आज भारताला हवे आहे. त्या तरुणांना भारतात परत आणले

तर त्यांचा ' ब्रेनरस्ट ' होण्यापलीकडे आणखी काही होणार नाही. इंग्लंडमधील शास्त्रीय मासिकांतून संशोधक पाहिजेत अशा खूप जाहिराती दर अंकात असतात. पण तरीही अमेरिकेतील ब्रिटिश तरुण त्याला प्रतिसाद देत नाहीत. ' ब्रेनड्रेन ' हा शब्द त्यांना म्हणूनच वापरावा लागतो. आपणांकडे आम्ही जाहिराती देत नाही पण तरीही अनेक तरुणांचे दररोज माझ्याकडे अर्ज येतात. भारतात बऱ्यापैकी नोकरी मिळाली तर त्यांना परत यावयाचे असते.

या संदर्भात तुम्ही कदाचित ' सायन्टिफिक पूल 'चे नाव पुढे कराल; पण स्पष्ट सांगावयाचे तर पार्लमेंटमध्ये प्रश्न विचारले जातात, वृत्तपत्रांत अग्रलेख येतात, वरच्या जागेवर बसलेल्या लोकांना या साऱ्यांचे समाधान करावे लागते, अशा या घटनेतून सर्वसामान्य जनतेच्या डोळ्यांत धूळफेक करणारे ' सायन्टिफिक पूल 'सारखे पांढरे हत्ती तयार होतात. खरे पाहता ज्या क्षणी तुम्ही ' सायन्टिफिक पूल ' तयार करता त्याच क्षणी शास्त्रज्ञांना या देशात पुरेशा नोकऱ्या नाहीत हे तुम्ही मान्य करता. ' सायन्टिफिक पूल ' काही विशिष्ट कारणाने, काही विशिष्ट काल-खंडापुरते निर्माण झाले तर ते आपण समजू शकू. पण ते काही कायमचे उत्तर होऊ शकत नाही; किंबहुना ज्या क्षणी तुम्ही ' सायन्टिफिक पूल ' कायमचे उत्तर म्हणून कायम ठेवू पाहता त्याच क्षणी ते हास्यास्पद बनतात. आता असे पाहा. दोन वर्षांपुरते तुम्ही शास्त्रज्ञाला त्या ' पूल 'वर घेता, देशाला न परवडणारा सातशे रुपये पगार त्याला देता, पण या शास्त्रज्ञाची दोन वर्षे मोठी कुचंबणा होते. त्या दोन वर्षांत मन लावून काही ' संशोधन ' करण्यापेक्षा तो शास्त्रज्ञ नाइलाजाने नव्या नोकरीचे ' संशोधन ' करीत राहतो. त्यातही वाईट गोष्ट अशी की, दोन वर्षांत देशात काही अचानक फरक पडून या लोकांना नव्या नोकऱ्या मिळण्याची शक्यता नसते. ' पूल 'वर जेव्हा तुम्ही नवे शास्त्रज्ञ घेता त्या वेळी जुने शास्त्रज्ञ हताश होऊन परत जातात आणि त्यानंतर नवे लोकही या ' पूल 'वर यावयास बिचकतात. पण मी म्हणतो आपणांकडे नोकऱ्या नाहीत तर या लोकांना परत बोलावण्याचा हट्ट कशासाठी ? किंबहुना त्या तरुणांना परत आणण्याऐवजी आज इथे असलेल्या लोकांनाच अधिकाधिक सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. परदेशांतून शास्त्रज्ञ इथे आणून त्यांचा ' ब्रेनरस्ट ' करण्याऐवजी इथे असलेल्या शास्त्रज्ञांनाच योग्य सवलती आणि साधने देऊन त्यांचा ' ब्रेनरस्ट ' होत नाहीना हे पाहणे अगत्याचे आहे.

## आग रामेश्वरी : बंब सोमेश्वरी

डॉ. जोशींचे बोलणे मला जरा मध्ये तोडावेसे वाटले. मी त्यांना म्हटले, " आपणांकडे नको तेवढे तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ आपण बनवितो आहोत आणि इतर क्षेत्रांत कर्तबगार तरुणांचा तुटवडा पडतो आहे. त्यामुळे तरुणांना

लहान वयातच शास्त्राकडे जाण्यापेक्षा इतर विषयांकडे जाण्यास आपण भाग पाडले तर...?" पण डॉ. जोशींनी माझे ते बोलणे मध्येच थांबवले. त्यांनी मला तसे थोडे जामलेच. ते म्हणाले, "मी या संशोधनक्षेत्रात खूप दिवस काम करतोय. स्वतःचे विचार कसे मांडावेत, कोणत्या पद्धतीने मांडावेत ते मला माहीत आहे. आपल्या विचारांवर इतरांचे काय प्रतिप्रश्न यतील हे लक्षात घेऊनच विचार सांगावे लागतात, हेही मला माहीत आहे. तुम्ही माझे सबंध विचार एकून घ्या. त्यानंतर तुम्हांला एखादा एकसंघ विचार ऐकल्यासारखे वाटत नसेल तर पुढे पाहू."

"आता तुम्ही विचारलेतच तर थोडा पुढे जाऊन तुमच्या प्रश्नाकडे वळतो. हे मत यापूर्वी मी अनेक जबाबदार लोकांकडून अनेक स्वरूपांत ऐकले आहे. पण मला सांगा, आपण लोकशाही स्वीकारली आहे, की लोकशाहीचा सांगाडा? लोकशाही म्हणजे मूलभूत मानवी स्वातंत्र्य, प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या अंगभूत गुणांचा विकास करण्याची संधी. स्वतःच्या मनाला आवडेल त्या क्षेत्रात काम करण्याचा हक्क. अशा वेळी मुलाने कोणत्या शिक्षणक्रमाकडे जावे हे कोणी सांगू शकणार नाही. हा शिक्षणक्रम संपल्यावर त्याने कोणत्या क्षेत्रात काम करावे हे ठरविण्याचा अधिकार पण फक्त त्या व्यक्तीचाच असेल आणि अशा वेळी इथे संधी नाही असे वाटले तर त्या तरुणाने परदेशांत जाणेही सहजशक्य आहे. गीतेच्या भाषेत हा त्याच्या स्वधर्म रक्षणाचा प्रश्न आहे. पुन्हा इच्छा नसताना देशात डांबून कोणी काही काम करील ही कल्पना चुकीची आहे. या संदर्भात राष्ट्र, राष्ट्रप्रेम वगैरे शब्द पुढे करणे पण चुकीचे. कारण या शब्दांचे अर्थही आज झपाटचाने बदलताहेत. त्यातून पुन्हा हे शब्द सांगून शिकवता येत नाहीत. त्या गोष्टी सहजपणे अंगात भिनतील असे वातावरण निर्माण करावे लागते. आपणांसमोर ते वातावरण नाही. लाचलुचपत, वशिलेबाजी यांनी भरलेल्या राजकीय पुढाऱ्यांनी तरुणांना हे शब्द सुनावण्याचा हास्यास्पद प्रकार आहे.

मात्र तुम्ही मघाशी विचारलेला प्रश्न थोडचा वेगळ्या संदर्भात बरोबर आहे. या देशात वीस हजार इंजिनीअर बेकार बसतात. त्यापेक्षा त्या तरुणांना वा त्यांच्या पालकांना त्याची आधी कल्पना नसते हे माझ्या मते भयावह आहे. नियोजन नावाची गोष्ट या देशात अस्तित्वात आहे का याची या वेळी शंका येते. पुढील दहा वर्षांत प्रत्येक क्षेत्रात अंदाजे किती लोक लागतील याची यादी सरकारने प्रसिद्ध करावी. आपल्या शिक्षण संस्थांतून किती लोक बाहेर पडणार याचाही जनतेला अंदाज द्यावा. आणि मग प्रथम या आकडयांचा अभ्यास करून बहुसंख्य पोटार्थी लोक स्वतःचा अभ्यासक्रम निवडतील. त्यामुळे त्या तरुणांची नंतर होणारी निराशा आणि देशाच्या शक्तीचा अपव्यय टळेल."

## हे उपाय योजा

डॉ. जोशींनी मध्येच आपले बोलणे थांबवले आणि माझ्याकडे पाहून ते दिलखुलासपणे हसले. ते म्हणाले, "तुम्ही वृत्तपत्रांतले लोक मोठे मजेशीर असता. मला ज्या गोष्टीवर बोलायचे नव्हते त्या गोष्टीवर बोलावयास लावलेत ! आणि ज्या विषयावर मी काही सांगणार होतो तो विषय तसाच ठेवलात. या देशात अधिक शास्त्रज्ञ आणि कमी नोकऱ्या आहेत हे मी तुम्हांला सांगितले. या परिस्थितीत या तरुणांनी परदेशांत जाणे अटळ आहे हेपण ,सांगितग. आणि आता तुमच्या मनात एक परस्परविरोधी गुंतागुंतीचे चित्र तयार झाले असेल. या देशाची प्रगती झपाट्याने व्हायची तर अधिकाधिक शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ हवेत. आणि आज मात्र आपणांकडे असलेल्या शास्त्रज्ञांनाच आपण नोकऱ्या पुरवू शकत नाही. 'सायन्टिफिक पूल 'सारखे हास्यास्पद प्रकार आपणांस योजावे लागतात. या सर्वांमागे खरे कारण काय आहे ?—या प्रश्नामागचे खरे कारण फार सोपे आहे. एखाद्या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन त्याला धडक देण्याची शासनाची कुवत आज संपलेली आहे. आपल्या देशात शेकडो कापड गिरण्या आहेत. हजारो औषधे बनविणारे कारखाने आहेत. त्यांच्यावर स्वतःचे संशोधन विभाग ठेवण्याची सक्ती शासन का करीत नाही ? या कारखान्यांनी स्वतःचे छोटे छोटे संशोधन विभाग सुरू केले तर योग्य पगारावर परदेशांतील बहुतेक भारतीय शास्त्रज्ञांना भारतात नोकऱ्या मिळतील; किंबहुना शास्त्रज्ञांची चणचण निर्माण होईल. खाजगी उद्योगधंद्यातील कार्यक्षम कारभारामुळे या शास्त्रज्ञांना योग्य सवलती देऊन त्यांच्याकडून भरपूर काम करवून घेतले जाईल. आणि तसे पाहाल तर खाजगी कारखान्यांवरपण देशाने सक्ती करणे योग्य नाही. त्याची तशी जरुरीपण नाही. मात्र देशातील जे कारखाने कायमचे परकीय सहकार्यावर उभे असतात त्यांवर बंदी घाला. आणखीही एक करा. समजा, मुंबईला एखादा औषधी कारखाना दर वर्षी दहा कोटी रुपयांची रसायने परदेशांतून आणतो. ती रसायने, ते पदार्थ, ती यंत्रे संपूर्णपणे या देशात बनविणे कठीण नाही. ही गोष्ट एकदम होणार नाही. पण दरवर्षी त्या कारखान्याला एक एक कोटी रुपयांचे कमी परकीय चलन द्या. तेवढ्या दहा वर्षांच्या काळात त्याला या देशात संशोधन करून या देशातील उपलब्ध साधनसामग्रीवर स्वतःचे उत्पादन सुरू ठेवावे लागेल. समोरचे दोर कापले गेले की, या लोकांसमोर लढण्याशिवाय दुसरा मार्ग राहणार नाही. आणि त्या वेळी त्यांना परदेशांतील भारतीय शास्त्रज्ञांना सन्मानाने परत बोलवावे लागेल. **साऱ्या जीवनात तुम्ही स्वदेशीला किती महत्त्व देणार आहात, स्वावलंबनाचा किती अट्टाहास धरणार आहात, हा खरा सवाल आहे.**

या देशाने झपाट्याने विज्ञानयुगात प्रवेश करावा ही तुमची इच्छा मी समजू शकतो. एक समृद्ध, समर्थ संपन्न भारत आपणांला झपाट्याने उभा करावयाचा आहे

[पृष्ठ ७३ वर]

## देव न मानणारा देवमाणूस ज्यासाठी भांडला होता तेच भांडण आमची आजीही भांडली होती.....

# पिंड

आजोबा वारल्यानंतर माझी आजी बरीच वर्षे होती. ती गेली यंदा गणपतीच्या आगेमागे. तसं तिला विशेषसं आजारपण वगैरे काही आलं नव्हतं. आपल्याला हार्टफेल होऊनच मरण यावं अशी तिची मनोमनी इच्छा होती आणि का कोण जाणे, अर्धांगाच्या झटक्याची तिने मनात भयानक धास्ती घेतलेली होती. कुणा तिच्या वयाच्या माणसाशी किंवा बाईशी बोलताना ही भीती ती बोलून दाखवायची. अंथरुणावर पडून कुजत, हाल होत, उपेक्षा सहन करीत जगण्याचा तिला तिटकारा होता. जावं ते आपलं पटकन् डाव संपवल्यासारखं जावं असं तिच्या मनात होतं. देवाची प्रार्थना करताना ती मागणं हेच मागायची. म्हणायची, रामराया, मला सगळं भरपूर मिळालं. काही इच्छा नाही. इच्छा आहे ती अशा मरणाची. –तिच्या मनात मात्र मरणाचे विचार सतत घोळत. लहानपणच्या, नाहीतर तरुणपणच्या संसार करता करता तिला ज्या मैत्रिणी लाभल्या होत्या, त्यांपैकी एखादी गेलेली समजली की ती अगदी अस्वस्थ व्हायची — कोमेजून जायची आणि स्वतःशीच आपली वयाची किती वर्ष झाली – मैत्रिणीचं वय काय होतं – त्याचा अदमास घेऊन आपणही जाणार – जायचा दिवस जवळ आला ह्या विचारानं त्रस्त व्हायची. माझ्या आईला म्हणजे तिच्या सुनेला म्हणायची, “ अग बयो, केळकरांची शिताक्का गेली हो काल तापानं –अग, माझ्यापेक्षा पाच वरीसानी लहान ना ती. आटपली बिचारी, ” आणि आजी गप्प व्हायची. मनातल्या मनात सारी उजळणी करायची.

गणपतीच्या तयारीत असतानाच ती गेल्याची तार आली. तसं आजीला तिच्या प्रार्थनेप्रमाणं विनायासं मरण आलं होतं. अर्धांगाचा झटका वगैरे आला नव्हता. दुसऱ्या कुणाला तिचं काही करावं लागलं नव्हतं. स्वयंपाक-जेवणं झाल्यावर सारी आवरासावर घरातल्या बाईनं करावी तशीच स्वतःची आवरासावर करून ती निघून गेली होती.

## चंद्रकांत मतकर

माझी आजी तिच्या काळाच्या मानाने पुढारलेलीच म्हणायला पाहिजे. हा पुढारलेपणा तिच्या अंगी उपजत होता, उपरा, अगांतुक नव्हता. तिच्या मनात ज्या कल्पना येत त्या तिच्या ऐन उमेदीच्या वेळी विलक्षण समजल्या जात. ह्या कल्पनांमुळे आणि त्या आचरणातच आणल्यामुळे आजीवर गावात काहुरेही उठत. पण तिने दाद दिली नव्हती. कुणालाच. माझ्या आजीच्या गावात वपन झाल्यावर डोईवरचे केस पुन्हा पूर्वीप्रमाणे वाढवून वावरणारी म्हणजे माझी आजीच. लोक, नातेवाईक ह्याबद्दल काय म्हणतात ह्याचा विचार करायला ती तयारच नव्हती. ऐकणे दूरच राहिले. तिने पुन्हा डोईवरचे केस का वाढवले ह्याला कारणेसुद्धा अगदी मनस्वी अशीच दिली होती. वैधव्य आल्यावर तिनं जनरीत म्हणून सर्व केलं होतं. पण दर महिन्याला न्हाव्यापुढे बसायची वेळ येणार हे तिच्या लक्षात आल्याबरोबर तिचे मन विथरून गेले. ती सगळ्यांनाच विचारू लागली.



" अरे, एरवी तुम्ही बायकांना जपता, त्यांना नटवता, सजवता – परपुरुषाचा तिच्याशी संबंधही येऊ देत नाही – तिचं लवकर लग्न लावता आणि तिचा नवरा मेला तर तिला एकदम न्हाव्यापुढं बसवता ! अरे, तुमची लज्जा कुठं गेली रे मग? तुमची मनं रे कशी झडून नाही जात ?"

तिचा नुसता तळतळाट झाला होता. तिचे हे प्रश्न ऐकूनच ऐकणारे गांगरून गेले होते. आणि मग आजीनं एकदमच सांगून टाकलंन,

"न्हाव्यापुढे मी बसायची नाही आणि आता सरळच केस वाढवायला लागेन."

आमच्या घरात पूजेला येणारे जे गुरुजी होते ते तर हे सर्व ऐकून भेदरूनच गेले. पण तरीही ते म्हणाले,

" अहो, म्हणजे हे संन्याशानं पुन्हा संसार सुरू करावा असंच झालं. केवढं पाप! त्यांना मोक्षप्राप्ती कशी होईल मग ? स्वर्ग कसा लाभेल मग ?"

आजी ओरडली,

" चालेल त्यांना स्वर्ग नाही मिळाला तरी. आणि मी केस वाढवले म्हणजे संसार सुरू केला असं नाही होत. नाहीतरी तुम्ही अशा तांबड्या बायकांना दुसऱ्यांचे कोदे उपसायला सांगता, बाळंतपणे करायला लावता तेव्हा संसार करायलाच सांगता की– ह्याचं आजारपण कर, त्याचं आणखी काही कर हे सांगता ते ! फुकट मोलकरीण मिळते म्हणून होय ? – मला ठाऊक आहे ह्यांच्याशी मी कशी वागले ते. नुसत्या केसांनी कुणाचा स्वर्ग, नरक ठरत नसतो."

मग आजीने चक्क केस वाढवले होते. कुणालाही धूप न घालता.

आजीनंच मला एकदा हे सारं सांगितलं होतं. तिनं सांगितलं तेव्हा प्रसंगही तसाच आला होता. मला वाटतं, मी इंग्रजी दुसरीत असेन तेव्हा आणि एक दिवस माझ्या आत्याकडून एक मनुष्य सांगत आला होता – " लक्ष्मणराव वारले. जांघेत कॅन्सरची गाठ होती. ती फुटली. दहा-बारा फूट लांब काळ्या नासक्या रक्ताची धार कारंज्यासारखी उसळली सरळ. मग अर्धा तासही ते राहिले नाहीत." आजीचे जावईच गेले होते. पोरीला आलेलं वैधव्य तिला देखत पाहावं लागलं होतं. त्या वेळी मला फार भीती वाटली होती. कशाची, म्हणावं तर खांडेकरांनी देव न मानणारा देवमाणूस म्हणून आगरकरांवर जो धडा लिहिला होता, त्यातल्या गोष्टींची. ज्यांना आगरकरांनी विरोध केला होता त्याची. मनात उगवलेले विचार सरळ सरळ सांगायचे ते आपले आजीलाच. अशी माझी तऱ्हा होती. आजीजवळ बोलताना कशाची धास्ती नसायची. आमचे अण्णा लगेचच त्या माणसाबरोबर आत्याकडे गेले होते. त्या दिवशी शाळेला मी गेलोच नव्हतो. दुपारी आई सुन्न झाल्यासारखी बसली होती आणि आजीच्या डोळ्यांतून पाणी वाहत होतं. एकीकडे ती म्हणत होती, "मी एवढी पासष्ट वर्षांची झाल्ये पण मला यम येत नाही न्यायला आणि त्या कोवळ्या पोराला – तिशीतल्या पोराला मात्र न्यायला येतो..." आणखी ती पुष्कळ बोलत

होती स्वत:शीच. तेव्हाच मी तिला आत्याचे पण केस कापणार का म्हणून विचारलं होतं. आई त्या स्थितीतही "मेल्या, दळभद्र्या, काय विचारतोयस?" असं म्हणून मला दणका घालायलाच उठली होती. पण विचारू दे त्याला काय ते असं आजीनं तिला खुणावलं होतं आणि "बघ, माझे केस कापलेत का?" असंही विचारलं होतं. आणि आपणहूनच ओघाने सारे सांगितले होते. देव न मानणारा देवमाणूस ज्यासाठी भांडला होता तेच भांडण आमची आजीही भांडली होती. आजीचं मग मला आश्चर्यही वाटलं होतं.

थोड्याच दिवसांत आत्याही आमच्या घरी आली आणि तिचं काय करायचं ह्याबद्दल बोलणी सुरू झाली. मला आपलं विधवांचं दु:सह आयुष्य आणि शाळेत 'रॅपिड रीडर' म्हणून नेमलेल्या 'मी' कादंबरीच्या संक्षिप्त आवृत्तीतलं "बाबा रे, आम्ही बायका म्हणजे गोठ्यात बांधलेली मुकी जनावरं" वगैरे वगैरे आठवायचं आणि आत्या आमच्या अण्णांना असं काही म्हणते का ह्याकडं माझं लक्ष असायचं. पण आत्या बोलतच नसे. तिचा एकुलता एक दीड वर्षांचा मुलगा होता. त्याच्याकडेच फक्त टक लावून पहात ती असायची. त्या वेळी तिचा चेहरा गंभीर आणि खूप खूप विचारात पडल्यासारखा दिसायचा. एवढा कसला ती विचार करी कोण जाणे! पण तिच्याशी जाऊन आपण बोलावं असं मात्र जे वाटे ते विरूनच जायचं. हीच आत्या पहिल्यांदा आमच्याकडे यायची तेव्हा किती हसत हसत यायची, तिला तर मी 'खाऊआत्या'च म्हणायचो. चॉकोलेटचा डबा, बिस्किटांचा पुडा, आणखी काय काय ती आणत असे. संध्याकाळी तिचे यजमान लक्ष्मणराव येत असत कामावरनंच परस्पर आणि मग ती दोघं जेवूनच जात असत. त्या वेळी आत्या आली की खरोखरच आकाश ठेंगणं व्हायचं — तिच्याशी काय बोलू आणि काय नको बोलू असं होऊन जायचं. पण आता मात्र अगदी फूल कोमेजल्यागतच तिची स्थिती झाली होती. मी तिच्याभोवती वाटोळं वाटोळं फिरायचो पण बोलायचो नाही. तीही गप्पच असायची एवढं खरं. पण तिच्याबद्दल बोलणी सुरू झालीच होती. एक दिवस अण्णा आणि आई बाहेर गेले होते. तेव्हा आजीनं आपल्या मुलीशी—आत्याशी—बोलणं काढलं होतं. मला अभ्यास करता करता ते ऐकू येत होतं. आजी म्हणत होती,

"नंदे, अग आता तू पुढं काय करायचं ठरवलांयस?"

"आई, मला किनई अगदी सुचतच नाही — सारखं आपलं ह्यांचंच मनात येतं."

आजी यावर जराशी गप्प बसली; पण एकदम म्हणाली,

"तुझं खोटं नव्हे. सुचायचं नाहीच. पण असं म्हणून चालेल का? अग, हातपाय हलवायलाच हवेत केव्हातरी. नाही का?"

"तूच मला सांग काहीतरी."

आजीनं जणू सारा विचार आधीच केला होता, ती म्हणाली,

" शिकायला लाग. म्याट्रिक हो. भावाकडे नुसते तुकडे मोडायचे नाहीत. आपल्यालाही अभिमान हवा. आता अजून कोणी बोलणार नाही. पण रोजचंच झाल्यावर धुसफूस सुरू होईल, ऐकावं लागेल काहीबाही. अग, दारिद्र्य सोसावं पण ओशाळं होऊ नये, समजलीस ! शाळेत जायला लाग. तुझ्या पोराला मी सांभाळेन.'

" इश्श, आता का शाळेत जायचं. हसतील मला. "

" कोणी हसत नाहीत. आणि हसले तर त्यांचे दात पाहावेत आणि पाडावेतही. अग, परिस्थिती पडल्यावर करावं लागतं माणसाला सर्व. "

ह्यावर आत्या काही बोलली नव्हती.

पण पुढं आजीच अण्णांच्या मागं लागली आणि एक दिवस आत्या शाळेत गेली. तिच्याबरोबर त्या दिवशी मीच शाळेपर्यंत गेलो होतो. आत्या अगदी गोरीमोरी झाली होती. तिची पावलं जड पडत होती. वर्गामध्ये शिरताना तिनं माझ्याकडं घाबरंघुबरं होऊन पाहिलं होतं. मला मग भारीच भरून आलं होतं.

आत्याच्या यजमानांच्या फंडाचे आणि विम्याचे पैसे एक दिवस मिळाले होते. तसे काही फार नव्हते. पण आत्याची ती एक ठेवच होती.

त्या दिवशी अण्णा आत्याला म्हणत होते,

" नंदे, आज मला पैशाची अडचण आहे – ते पैसे मी घेऊ का वापरायला ? मी परत करीन सगळेच्या सगळे. आज मला नड आहे, तर हो म्हण. "

आत्या बिचारी कात्रीत सापडली होती. तिला अगदी ब्रह्मांड आठवलं असणार तो बोलेना. शेवटी आजी तणतणली होती,

" अण्ण्या, अरे, ह्या पैशाला तू हात लावू नकोस. अरे, बाहेर तुझी एवढी पत नाही पैसे उभे करायची ? त्या बापडीचे पैसे ते केवढे आणि तू तिला काय विचारतोयस ? अरे, तिला आश्रय दिलास तो काय ह्या पैशांकडे पाहून ? तू नाही म्हणालास तरी कुणाच्याही मनात असंच येईल पटकन. त्यापेक्षा दुसरीकडनं उसने आण आणि नंदीचे हे पैसे बँकेत फिक्सामध्ये ठेव. व्याज तरी मिळेल तिला त्या पैशांवर."

आजीनं आत्याची सुटका केली होती. अण्णा दोघींवरही चिडले होते नंतर. त्यांनी कितीतरी दिवस अबोलाच धरला होता दोघींशी. आईने पण. पुढे आजीशी बोलू लागले पण आत्याशी मात्र अबोलाच राहिला. भाऊबीजही देत नसत. तिच्या पोराला पाण्यात पाहत असत. पण आजी खमकी होती. ती कुणाची डाळ शिजू देत नसे.

आत्या मॅट्रिक झाली. एस. टी. सी. पण. आणि नोकरीलाही लागली.

तिचा मुलगा शाळेत जाऊ लागला होता.

आजीनं आत्याला नोकरी मिळाली त्या दिवशी सत्यनारायण केला. तिला जणू वाटत होतं आपल्यालाच नोकरी लागली.

आजीनं तिचं बिऱ्हाडही लावून दिलं.

आजी नसती तर आत्याची काय स्थिती झाली असती बरं ?

आजीचा स्वभाव मनस्वी होता. पहिल्यापासूनच. असा मनस्वी स्वभाव होता म्हणून ती कणखर बनली होती. संसारातले धक्केचपेटे तिने ह्या मनस्वीपणानेच अंगावर झेलले होते. आजोबांबरोबर ती जेव्हा घरातनं बाहेर पडली तेव्हा अक्षरश: जमिनीचं अंथरुण आणि आकाशाचं पांघरुण अशी स्थिती होती. आजोबांना आठ भाऊ आणि तीन बहिणी होत्या. एवढ्या बारा भावंडांना रोज पोट भरेल इतके जेवायला मिळणेही मुष्कील होते. शेतजमिनीतलं भात पुरतच नसे. दारिद्र्य तर पाचवीला पुजलेलं. दारिद्र्य असलं की भांडणं त्याच्याबरोबर असतातच. ह्याचपायी आजोबा वेगळे झाले. एका खणाची जागाही वाटणीत आली नसती. आजोबांच्या डोक्यात मुन्सफीच्या परीक्षेला बसायचं फार होतं. वेगळं झाल्यावर त्यांनी अगोदर काय केलं असेल तर ते हेच. कण्या तर कण्या, पेज तर पेज असं खाऊन आणि राहून ते मुन्सफी पास झाले. त्यांनी वकिली सुरू केली. वकिली काय एकदम चालू लागत नाही. वकिलीतूनही गडगंज मिळायला काळ जावा लागतो. आजी जे म्हणायची की "त्यांना ठाऊक आहे मी कशी वागले त्यांच्याबरोबर ते." ह्यामागे मला वाटतं हाच कठीण काळ असावा. आजीनं आजोबांच्या रथाचं चाक निसटू दिलं नाही. आंबुर्लीच्या महारांचा खटला आजोबांकडे आला आणि त्यांचा काळ पालटला. लक्ष्मी चालत आली त्यांच्याकडे. स्वतःचं मोठं घर झालं. चौसोपी. आजीच्या लक्षात हा खटला नेहमी असायचा. कारण म्हणूनच पुढं तिनं महारांसाठी आंबुर्लीला वेगळं विठोबाचं देऊळ बांधवलं. महारांसाठी वेगळं देऊळ हा तसा गावातल्या लोकांना उलटंपालटं व्हायला होईल असाच जोरदार धक्का होता. आजीनं तो दिलाही.



आजीच्या ह्या मनस्वीपणामुळेच आजी पुष्कळ गोष्टी करू शकली. अगदी परवा परवाचा संयुक्त महाराष्ट्राचा सत्याग्रहही. ऐंशी वर्षांची ही वृद्धा नातवाबरोबर–माझ्याबरोबर – सत्याग्रहात आली. पोलिसांनासुद्धा तिला पकडावं कसं हा पेच पडला होता. त्यांनी तिला सोडलंही. घरापर्यंत पोचवलं. तिचा ह्या सत्याग्रहातून फायदा कोणताच नव्हता. पण घरात जी सतत बोलणी चालत, त्यावरनं तिनंही आपला ह्यात वाटा असला पाहिजे असं मनात घेतलं आणि चक्क माझ्याबरोबर ती सत्याग्रहात आली. बेचाळीसमध्ये माझा मामा जेव्हा तुरुंगात गेला तेव्हा पोलीस मागावर असलेल्या भूमिगतांना तिनं घरात लपवून ठेवलं होतं. सोनवा पुरोहितांना तिनं लुगडं नेसवून पोलिसांच्या डोळ्यात धूळ फेकली होती.

आजी धीराची होती हेही खरं. आजोबांच्या मरणाचा प्रसंग तिनं सांगितला होता एकदा. आजोबांना अतिसाराचं दुखणं होऊन ते गेले. शौचाला जाऊन जाऊन त्यांच्या पायांना घट्ट गाठी झाल्या. चार–सहा दिवस आजोबा जेर होते. आजीला कळून चुकलं काय वाढून ठेवलंय ते. डॉक्टर इंजेक्शन देऊ लागले तेव्हा ती त्यांना म्हणाली होती,

" आता त्यांना काही करू नका. माझ्या समाधानासाठी तुम्ही इंजेक्शन देत असाल. पण जात्या जीवाला आता त्रास देऊ नका आणि त्यांचे हाल करू नका. निवांतपणे जाऊ देत. "

मग आजोबा दोन–एक तासांनी गेलेच.

आजीनं शांतपणानं तो सारा प्रसंग सहन केला. डोळ्यांतून टिपूस न काढता. पण ह्याचा अर्थ आजोबांवर तिचं काहीच प्रेम नव्हतं किंवा तिला त्यांच्याबद्दल काहीच वाटत नव्हतं असा कुणी केला असता तर तो चुकीचा ठरला असता. कारण तिच्या नेहमीच्या सांगण्याप्रमाणे एखाद्या गोष्टीसाठी धाई धाई रडत बसलं म्हणजेच प्रेम व्यक्त केलं वा दुःख व्यक्त केलं असं होत नसतं. आजोबा गेल्यापासून आजीनं त्यांच्या आवडीच्या म्हणून ज्या गोष्टी होत्या, त्या तर सोडून दिल्याच पण तिच्या खास आवडीच्या गोष्टीही तिनं सोडून दिल्या. आजोबांना भाजणीचं थालीपीठ अतिशय आवडे, अदमुरं ताक म्हणजे आजोबांना अमृतच वाटे, भज्यांवर त्यांचा अतिशय लोभ होता – ह्या गोष्टी आजीनं सोडल्या. त्याबरोबरच भाताशिवाय पान न हालणाऱ्या तिनं भातही सोडला. रोज ती एकदाच जेवू लागली. आजोबांच्या नंतर भावाभावांचं जेव्हा पटेनासं झालं तेव्हा तिनंच आजोबांच्या रोजच्या बैठकीतल्या एका स्नेही वकिलाला बोलावलं आणि सर्व मत्तेची वाटणीपत्रं करायला सांगितलं. तिनं हे मोठ्या आवडीनं केलं असं नव्हे, पण ताणून तोडण्यापेक्षा लांब राहावं आणि येणं–जाणं राहावं अशा धोरणानं वाटणी करावयाबद्दलची पावलं तिनंहूनच पुढं टाकली. त्या वकिलाला तिचा स्वतःचा वाटाही राखायला तिनं बजावलं होतन. वकिलानं कारण विचारलं तेव्हा " मुलांनी हाकलून दिली तर दारटोळ्या

करीत हिंडायला नको" असं फटकळपणे मुलांच्या तोंडावरच तिनं सांगितलं. पुढं कोर्टानं तिला "आजी, तुम्ही उद्या गेल्यावर तुमच्या वाटणीचं साऱ्या भावांत विभागायचं ना" असं विचारल्यावर ती म्हणाली होती, "नाही – साऱ्यात विभागायचं नाही. हरीला द्यायचं." "का ?" म्हणून विचारल्यावर म्हणाली, "हरीच तेवढा लायक आहे सांभाळायला. बाकीचे डोमकावळे आहेत नुसते." आजी कोर्टात असं म्हणाली असं आपापल्या नवऱ्यांकडून कळल्यावर सुना नुसत्या जागच्या जागी होरपळल्या होत्या.

आजी एकंदर पाहिलं तर सामान्यच होती पण काही वेळा सामान्यसुद्धा लक्षणीय असे काही करतो-त्यातलीच आजी एक होती. आजीच्या वेळी काही प्रेमविवाह नव्हते पण माझा प्रेमविवाहच होणार आणि तोही एका चांद्रसेनीय कायस्थ प्रभू मुलीशी हे तिला मी सांगितल्यावर ती म्हणाली होती,

"मुलीची केल्येस ना परीक्षा तू. मग माझी हरकत नाही."

अण्णा ह्यावरनं मला घराबाहेर काढायला निघाले तेव्हा ती जोरजोराने ओरडून म्हणाली,

"अण्ण्या, असली तारांगणं घालायला तू लहान नाहीस. अरे, मुलाला मुलगी आवडल्यावर आपण कशाला मध्ये यायचं? त्याला घालवायचंच असलं तर त्याचं त्या पोरीशी लग्न करून दे आणि बिऱ्हाड करून देऊन तेथे राहायला घालव. कायमचा तोडू नकोस त्याला."

मग मला म्हणाली,

"उद्या आण रे तिला आपल्या घरी. बघू दे मला कशी आहे ती!"

दुसऱ्या दिवशी कॉलेजचे तास शिकवून झाल्यावर वसूला घेऊन मी घरी गेलो होतो. वसू वावरली होती. पण तिच्या पाठीवर हात फिरवून आजी म्हणाली होती

"अग, आम्ही ब्राह्मणाच्या घरची माणसं. आमच्या रीती वेगळ्या आणि तुमच्या रीती वेगळ्या. अशा वेळी अर्धवट शिकलेली मुलगी असली तर घोटाळेच व्हायचे. आता तू कॉलेजातील मास्तरीण. जमवून घेशील ना. घेतलंस तर मी येईन तुझ्या हातचं जेवायला."

आणि आजी माझ्याकडे पुढे खरोखरच जेवायला आली होती.

आणि माझी आई मात्र "कमाल आहे सासूबाईंची, परभिणीकडचं कसं बाई चालतं," म्हणत बसली होती आणि सारखं तेच उगाळत होती.

आजी म्हणायची,

"माणूस कसं आहे नेहमी पाहावं. ते चांगलं मिळवलं म्हणजे निभलं."

माझं लग्न झालं आणि चार-सहा महिन्यांनीच सरकारी कॉलेजमधला मी म्हणून माझी बदली झाली. वसूचीही बदली मी करून घेतली. घरापासून लांबवर प्रथमच जायला लागलं होतं. आजीनं माझ्याकडे यावं म्हणून मी तिला पुष्कळदा

चौथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

**ब. मो. पुरंदरे**

□□

**मूल्य : रुपये बेचाळीस फक्त**

□□

राजहंस प्रकाशन

पुणे

सांगितलं. पण आजी थकली होती. दर वेळी ती म्हणायची,

" आपल्या घरी काय ते बरंवाईट व्हावं; माझं काही आता खरं नाही."

त्याच वेळी अर्धांगाचा झटका आपल्याला आला तर काय, ह्याचा धसका तिनं घेतला होता.

परवा तार आली तेव्हा मला धक्का बसलाच. धक्का बसला नाही, असं कसं म्हणू ? पण आजी सुटली होती. व्याण्णव वर्षांची होऊन ती गेली होती. आपला डाव अगदी नीट पुरतेपणी संपवून. तिची कोणतीही इच्छा राहिली नव्हती, कारण इच्छा झाल्यावर ती दडपण्याचा वा कोंडून ठेवण्याचा तिचा स्वभाव नव्हता.

अमरावतीहून वसू आणि मी घरी लगेच गेलो. दहाव्या दिवशी तिच्या पिंडाला कावळा शिवेना. कुणाच्या काही लक्षात येईना. आजीला आश्वासन तरी काय द्यायचं, ह्याचा विचार पडला होता. मुलं, सुना, नातवंडं, समृद्धी अशा सगळ्यात आजी होती आणि त्या समाधानी अवस्थेतच ती गेली.

शेवटी अण्णांनी माझ्याकडे पाहिलं आणि ते म्हणाले,

" आई, अग तुझ्या नातसुनेचं–वसूचं बाळंतपण इथंच घरी करू. तू काळजी करू नकोस बघू."

तरी कावळा शिवेना. भटजी म्हणाले,

" अण्णा, आजींनी तुम्हांला काही सांगितलं होतं का जाताना ?"

अण्णांनी नाही म्हणून मान हलवली. पण तेवढ्यात लक्षात आल्यासारखे ते म्हणाले,

" आई, तुझ्या मनात हे क्रियाकर्म करावंसं नव्हतं. श्राद्धपक्षाचा तुला तिटकारा होता–रागही होता. म्हणून " मी वारल्यावर असलं काही करू नका–एखाद्या गरीबाला मदत करा, " असं म्हणाली होतीस. जनरीत म्हणून आम्ही हे केलं. पण तुला नको तर ह्यापुढे नाही करणार. त्याऐवजी गरीबाला मदत करू."

कावळा शिवला होता.

आणि मग त्यांची शाळाच भरली होती.






*अमरकसिंग आणि जयपालकौरचे लग्न झाल्यावर थोडचाच दिवसांत तिला कळते की, आपला पती हा एक अट्टल बदमाष आहे. बलजितकौर ही आपली सवत आहे. आठ महिन्यांची गरोदर असताना बलजितकौरच्या साहाय्यानं जयपाल माहेरी पळून जाते. मागोमाग अमरिकसिंग तेथे जातो व तिच्या वडिलांचा खून करतो. जयपाल जबर जखमी होते. जखमी अवस्थेतच अमरिकसिंगला सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंग पकडतात...*

**ॲड. माधव कानिटकर**

अंबाला येथील ॲडिशनल सेशन्स जज्ज न्यायमूर्ती वेदी यांच्यासमोर तारीख १६ सप्टेंबर १९५४ रोजी सरदार लाभसिंग खून खटला सुनावणीसाठी आला. अमरिकसिंग ऊर्फ डॉ. अमरस्वरूप आझाद याने पंजाब हायकोर्टातील नामवंत वकील बचावासाठी नेमला होता. सेशन्स कोर्ट तुडुंब भरले होते. ज्यांना कोर्टात शिरायला मिळाले नव्हते ते लोक सेशन्स कोर्टाच्या खिडकीला लागून असलेल्या झाडांवर चढले. बाल्कनीत ऐकायला काहीच येणार नव्हते, पण दिसणार तर होते ना! बस! त्यांना अमरिकसिंग पाहायचा होता. पावणे अकरा वाजले होते. सरकारी

*उलटसुलट जबान्या देऊन अमरिकसिंग खटल्याचा रागरंगच बदलून टाकतो. परंतु भरभक्कम पुराव्यानिशी त्याच्यावरील आरोप शाबीत होणार ही खात्री वाटत असतानाच भरकोर्टातून तो पळून जातो. सबइन्स्पेक्टर इन्द्रसिंगांची अंबाला पोलीस स्टेशनवरून बदली करण्यात येते. चौधरी राधाकिशन त्यांच्या जागी येतात. दोन-तीन वर्षांचा काळ निघून जातो.*

*आणि एका रात्री दिल्ली पोलिसांकडून अंबाला पोलिस स्टेशनला बातमी मिळते. 'अमरिकसिंग' दिल्लीत आहे. आता तो डॉ. अमरस्वरूप आझाद बनला होता. दुसरेच दिवशी त्याला पकडण्यात आले. कडेकोट बंदोबस्तात त्याला अंबाल्याला आणले. ओळखपरेड झाली. चारपैकी एका व्यक्तीनं फक्त त्याला ओळखलं. जयपालनंही नवऱ्याला ओळखलं नाही. अमरिकसिंगाचा खटला सेशनकमिट झाला. 'तो मी नव्हेच' हे पटवण्याचा त्याचा खटाटोप यशस्वी होणार होता का?*

## लेखांक चार

वकील आणि अमरिकसिंगाचे वकील दोघेही बार रूममधून एकदमच बाहेर पडले. कोर्टाच्या लॉबीतून जाताना दोघेही हसत खेळत, गप्पा मारत चालले होते. कुणाला सांगून तरी पटले असतं का, हे फक्त नाटक आहे! कोर्टात गेले की दोघेही, 'भिक्षुको भिक्षुकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते' अशा पातळीवर भांडणार आहेत म्हणून. तेवढ्यात प्रेस फोटोग्राफरने कौशल्याने त्यांचा दोघांचा एकत्र फोटो घेतला. त्याला बिचाऱ्याला काय कल्पना की, दोन्ही वकिलांपैकी कुणीच फोटो देण्याच्या मन:स्थितीत नव्हता. सरकारी वकिलांच्यामागे त्यांचा कॉन्स्टेबल आणि बचावाच्या वकिलांच्यामागे त्यांचा क्लार्क हातात केसपेपर्स आणि जाडजूड पुस्तकांचे गठ्ठे घेऊन चालले होते! बंदोबस्ताच्या पोलिसांनी त्यांना दोघांना सलाम करून आत जायला रस्ता करून दिला. दोघेही चिंतेत होते. सरकारी वकील एकीकडे विचार करीत होते, 'सर्वसाधारणपणे खून खटल्यात आरोपीनेच खून केला आहे ही गोष्ट सिद्ध करणे म्हणजे कठीण कर्म असते. पण या खटल्यात ती मुख्य अडचण नाही. सरकारतर्फे एकूण ३६ साक्षीदार मी तपासणार आहे! त्यांतल्या कमीतकमी १० हून जास्त साक्षीदार हे अमरिकसिंगाने गोळ्या झाडल्या तेव्हा तिथे प्रत्यक्ष हजर होते. घडलेला प्रकार त्यांनी डोळ्यांनी पाहिलेला आहे (Eye witnesses), पण खरी अडचण आहे ती वेगळीच. आरोपी म्हणतो की, ज्या अमरिकसिंग नावाच्या

माणसाने हे भयंकर गुन्हे केले तो मी नव्हेच ! एवढेच नव्हेतर आयडेंटीफिकेशन परेडमध्ये ४ पैकी ३ साक्षीदार त्याला 'अमरिकसिंग' म्हणून ओळखू शकले नाहीत. ज्या एका साक्षीदाराने आरोपीला तोच अमरिकसिंग आहे म्हणून म्हटले आहे तो बचाव पक्षाच्या वकिलाच्या तुकानी उलट तपासणीत फसला तर ? तोही सांगून बसेल की 'कोर्टापुढे असलेला आरोपी हा अमरिकसिंग नव्हे !' आपली सर्व मेहनत फुकट जाईल. आरोपी निर्दोष सुटेल.

याउलट कुठल्याही फौजदारी वकिलाकडे नवी केस येते तेव्हा तो आरोपपत्रक (Charge sheet) आधी नीट वाचतो. नकळत का होईना पण पोलिसांकडून घडलेल्या चुका, साक्षीदारांची विसंगत विधानं काळजीपूर्वक लक्षात घेतो. अमरिकसिंगाच्या बचावाचे वकील आरोपपत्रक वाचून चिंतेत पडले होते. चार्जशीट टाईट होते. काय बचाव घ्यावा ? एवढेच नव्हे तर आपला अशील अमरिकसिंग हा B. A. LL. B. असून त्याला एवढे कळले नाही की, आपण मॅजिस्ट्रेटसमोर स्टेटमेंट करायला नको होते. कारण आरोपी बचावासाठी मॅजिस्ट्रेटसमोर जे स्टेटमेंट करतो त्यातल्या घटना सिद्ध करण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. आणि आरोपी अमरिकसिंगाने मॅजिस्ट्रेटला जे काही सांगितले त्यातली एकही घटना अमरिकसिंग सिद्ध करू शकत नव्हता. उलट 'तो मी नव्हेच ! ' हा बचाव घेऊनदेखील जर का सरकारपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यावरून अमरिकसिंग आणि आपले डॉ. अमरस्वरूप तेजसिंग आझाद या दोन्ही व्यक्ती एकच आहेत या निर्णयापर्यंत सेशन्स जज्ज आला तर ! आपला अशील लटकलाच. काय करू ? कोणता बचाव घेऊ ? शेवटी बचाव पक्षाचे वकील या निर्णयापर्यंत येऊन पोचले की, त्यातल्या त्यात प्राप्त परिस्थितीत 'तो मी नव्हेच ! ' हाच बचाव ठीक आहे.

घड्याळाचा काटा ११ वर सरकला ! अचानक कोर्टाचा पट्टेवाला " सायलेऽऽन्स " म्हणत कोर्टात आला. त्याच्यामागे होते ते न्यायमूर्ती बेदी. सर्व लोक उभे राहिले. त्यांनी कोर्टाचा मान राखला. सर्वजण खाली बसले ! केस पुकारली गेली !

( State v/s Amriksingh Tejasingh alias Dr. Amarswarup Tejsingh Azad ! "

सरकारी वकील झटकन उभे राहिले. त्यांनी खटल्याची पार्श्वभूमी, आपण कोण कोण साक्षीदार तपासणार आहोत हे सन्माननीय न्यायमूर्तींना थोडक्यात सांगून केस ओपन केली. न्या. मू. बेदी यांनी चौकशी केली. " आरोपीने बचावासाठी वकील दिला आहे का ?"

...आणि अमरिकसिंगाचे वकील झटकन उभे राहून म्हणाले,

( Yes ! Your Honour ! I have filed my appearance on behalf of the accused ! )

(होय ! सन्माननीय न्यायमूर्ती, आरोपीतर्फे बचावासाठी मी वकीलपत्र दाखल केले आहे.)

न्या. मू. बेदी यांनी आरोपीच्या आणि उभय पक्षांच्या वकिलांच्या उपस्थितीची नोंद घेतली आणि खटला सुरू झाला.

सर्वांत प्रथम साक्ष देण्यासाठी आले ते सरदार अमरनाथ. सरकारी वकिलांनी त्यांना तपासले !

" सरदार अमरनाथ ! तुम्ही आरोपीला ओळखता ? "

" होय ! "

" कसा ओळखता ? "

" माझे स्वर्गीय मित्र सरदार लाभसिंग यांचा जावई म्हणून. "

" अच्छा ऽ ! सांगा, १५ फेब्रुवारी १९५० ला काय झालं ? "

" सरदार लाभसिंग यांनी, ते आणि त्यांचा जावई आरोपी अमरिकसिंग यांच्यामध्ये त्यांची मुलगी आणि आरोपीची पत्नी जयपालकौर हिच्या माहेरी राहण्याबाबत जे भांडण होतं ते जातिरिवाजाप्रमाणं पंचांसमक्ष सोडविण्यासाठी पंच म्हणून मला बोलावलं. "

" बरं पुढं ? "

" आरोपी अमरिकसिंग त्या वेळी हजर होता. त्याच्या एकंदर बोलण्याच्या पद्धतीवरून तो दारू पिऊन आला आहे ही गोष्ट माझ्यासकट सर्व पंचांच्या लक्षात आली. आरोपी अमरिकसिंगाच्यादेखत जयपालकौरने त्याच्या चारित्र्याची, त्याच्या व्यसनांची कल्पना पंच म्हणून मला आणि इतरांना दिली. "

" बऽरं ! बऽरं ! पुढं ? "

" त्यावर आरोपी अमरिकसिंग म्हणाला की, तो दारू पिणं बंद करील. पण पंच म्हणून माझ्यासकट सर्व पंचांना वाटलं की कुठला दारुड्या ' मी दारू सोडली ! ' असे म्हणून ती लगेच सोडतो ? म्हणून आम्ही असा निकाल दिला की " जयपालकौरने महिनाभर माहेरी म्हणजे सरदार लाभसिंगांकडे राहावं ! त्या काळात आरोपीनं खरोखरच दारू सोडली आहे अशी सरदार लाभसिंगांची खात्री पटली तरच त्यांनी जयपालकौरला आरोपीबरोबर सासरी पाठवावं ! "

" त्या वेळी जयपालकौर तिथं होती ? "

" होय, होती. "

" कुठं बसली होती ? "

" जिन्याच्या पायरीवर. मध्यभागी. "

" आणखी कोण कोण होतं ? "

" सरदार लाभसिंग होते. इतर बरीच माणसं होती. "

" अच्छा ! तुम्ही मघाशी सांगितलंत की तुम्ही आरोपी अमरिकसिंगाच्या विरुद्ध

निकाल दिलात ! होय ना ?"
" होय !"
" मग सांगा त्यानंतर काय झालं ?"
" त्यानंतर आरोपी भयंकर संतापला. त्यानं खिशातून रिव्हॉल्व्हर बाहेर काढलं आणि जिन्यातून वर जाणाऱ्या जयपालकौरला गोळी घातली. त्याला पकडण्यासाठी मी पुढं गेलो. त्यावर त्यानं मला अवघ्या ४ फुटांवरून गोळी घातली आणि त्यानंतर लगेच सरदार लाभसिंगांना दोन गोळ्या मारल्या."
" हे सर्व तुम्ही प्रत्यक्ष पाह्यलंत ?"
" मग ? पाह्यल्याशिवायच का सांगतोय !"
" अहो, असे रागवू नका. पाह्यलं असलंत तर पाहृचलं म्हणून सांगा ! नसलं पाहृचलंत तर नाही म्हणून सांगा !"
" आता सांगितलं ना एकदा पाहृचलं म्हणून ! पुन्हा सांगतोऽऽऽ! पाहृचलं ! पाहृचलं ! पाहृचलं !"
कोर्टात हशा पिकला ! सरकारी वकिलांनी त्यांचे काम पुढे चालू ठेवले ! त्यांनी सरदार अमरनाथना विचारले, " आता आरोपीकडं पाहा ! नीऽट पाहा !"
...आणि बचावाचे वकील रागारागाने ताडकन् उभे राहिले ! आणि जवळ जवळ ओरडलेच,
( "I object Your Honour, my learned friend is leading the witness ! He has already seen the witness." )
( युवर ऑनर. " नीट पाहा !" असं सरकारी वकिलांनी साक्षीदाराला म्हणणं याला माझी हरकत आहे. माझे वकील मित्र त्यांना हवं असेल असंच उत्तर साक्षीदारानं द्यावं म्हणून त्याला ते मार्गदर्शन करताहेत. )
होय ! कुठल्याही वकिलाला साक्षीदाराला असा कुठलाही प्रश्न विचारता येत नाही की ज्याचे उत्तर एका ठराविक दिशेनेच येईल. समजा, घरमालक आरोपी आहे आणि साक्षीदार म्हणून त्याचा भाडेकरू कोर्टात उभा आहे. तर वकील त्याला असं विचारू शकत नाही की, " आरोपी तुमचा घरमालक ना !" कारण या प्रश्नाचं उत्तर साक्षीदार ' होय ' असंच देणार ! वकील ते कसं काढून घेईल ? वकीलसाहेब साक्षीदार भाडेकरूला विचारतील की, ' आरोपीला ओळखता ?'
" होय !"
" कसा ओळखता ?"
" ते माझे घरमालक आहेत !"
आणि मग वकीलसाहेब म्हणणार की " अच्छा ! अच्छा ! आरोपी तुमचे घर मालक आहेत तर ! बरं !"
जज्जसाहेब लिहून घेणार.
" I know the accused, he is my landlord !"

वरवर बघायला आचरटपणा वाटतो. वाटते एका साध्या गोष्टीसाठी इतके सव्यापसव्य. पण तो आचरटपणा नाही. कायदा म्हणतो की सत्य नेहमी साक्षीदाराच्या तोंडातूनच बाहेर आलं पाहिजे आणि उत्तर सुचवलं जाईल असा कुठलाही प्रश्न वकिलाला साक्षीदारांना विचारता येत नाही. अशा प्रश्नाला म्हणतात लीडींग क्वेश्चन !

अमरिकसिंगाच्या वकिलांनी हरकत घेतली होती ती यासाठी. त्यांचे म्हणणे असे होते की " नीट बघा !" असे साक्षीदाराला सांगून सरकारी वकील असे सुचवताहेत की आता पुढे असे सांग की ज्यांनी गोळ्या मारल्या तो अमरिकसिंग आणि कोर्टापुढे असलेले डॉ. अमरस्वरूप तेजसिंग हे एकच आहेत. "

सरकारी वकीलसुद्धा ताडकन उभे राहिले आणि त्यांनी कोर्टाला सांगितले की,

( Your Honour ! I have got every right to ask the witness to observe the accused carefully. Because that is the main point in this case ! )

(युवर ऑनर ! ' नीट बघा ' असं साक्षीदाराला सांगण्याचा माझा हक्क आहे ! कारण तोच तर या खटल्यात महत्त्वाचा मुद्दा आहे ! )

खंवचटपणाने बचाव पक्षाचे वकील सरकारी वकिलांकडे पाहत म्हणाले,

( Then why don't yourself enter in the witness box and say that the alleged accused Amriksingh and my client are one and the same. )

(असे ? मग साक्षीदार तपासण्याची यातायात कशाला करता ? तुम्हीच पिंजऱ्यात जाऊन सांगा की आरोपी अमरिकसिंग आणि माझे अशील या दोन व्यक्ती एकच आहेत म्हणून ! )

सरकारी वकील काही कमी नव्हते त्यांनी लगेच टोला हाणला.

( If this Hon'ble Court permits me to enter in the box, I will certainly do it ! And mind well then, it will be very difficult for you to take my cross. )

(या नामदार कोर्टाने मला तशी परवानगी दिली तर मी नक्कीच पिंजऱ्यात जाईन आणि लक्षात ठेवा, माझी उलटतपासणी घेणं तुम्हांला भारी पडेल.)

वकिलांची अशी आपसात भांडणे न्यायमूर्ती बेदींना नवीन नव्हती ! त्यांनी शांतपणे दोन्ही वकिलांकडे " झालं का तुमचं बोलून घेऊन काय ते ?" अशा अर्थाने पाहिले आणि अमरिकसिंगाच्या वकिलांनी घेतलेली हरकत न्यायमूर्तींनी फेटाळून लावली !

( Objection overruled ! )

का ? कारण " नीट बघा " असं म्हणणं हा प्रश्न नव्हे आणि कायद्यामध्य

उत्तर सुचविलं जाईल असा प्रश्न फक्त विचारता येत नाही.

सरकारी वकिलांनी बाजी मारली. त्यांनी मुद्दामच मोठ्याने विचारले, "हांऽ! सरदार अमरनाथ नीट बघा ! सांगा कोणी मारली तुम्हांला गोळी ?"

आणि सरदार अमरनाथनी आरोपी डॉ. अमरस्वरूप आझाद ऊर्फ अमरिकसिंग यांच्याकडे बोट दाखवून म्हटले, "ह्याने."

सरकारी वकील खूष झाले आणि खाली बसले. न्यायमूर्ती बेदींनी बचावाच्या वकिलांना सांगितले, "Yes. Cross."

आणि झगा सावरीत तो बुद्धिमान वकील उलटतपासणीसाठी उभा राहिला.

"सरदार अमरनाथ, तुमचं वय किती ?"

"६५ वर्षे."

"परवा तुम्ही डॉक्टर मजलानी यांच्या दवाखान्यात गेला होतात ना ?"

"होय !"

"कशासाठी ?"

"डॉ. मजलानी नेत्रतज्ज्ञ आहेत. आणि वयाच्या मानाने मला आता नीट दिसत नाही."

"बरोबर. अगदी बरोबर. आता असं व्हायचंच !"

आणि तुम्हांला वयाच्या मानाने काही काही गोष्टींचा विसरदेखील पडतो ना ? "

"हो !"

"म्हणजे १–२ महिन्यांपूर्वी आपण काय बोललो, कुणाला बोललो, कुणाला पाह्यलं, ते तुम्हांला नक्की खात्रीने सांगता येणार नाही."

"नाही येणार !"

"आणि तुम्ही म्हणता की अमरिकसिंगानं गोळ्या मारल्या त्या गोष्टीला आता जवळ जवळ ४ वर्षं पूर्ण झाली ! खरं ना ?"

"होय !"

"हे बघा, मी असं विचारतो की, तुम्हांला गोळी लागल्यामुळं फार यातना झाल्या असतील नाही ?"

"तर ! फारच !"

"आणि म्हणून तुमच्यासारख्या निष्पाप सज्जन, जातिवंत समाजसेवकाचा अमरिकसिंगावर फार राग असेल नाही ?"

"असणारच ! वकीलसाहेब, तुम्हांला जर का उगाचच कोणी गोळी मारली, तर तुम्ही काय जाऊन त्याचा मुका घ्याल की काय !"

पुन्हा एकदा कोर्टात हशा पिकला.

अमरिकसिंगाचे वकील आपले काम पुढे करू लागले. त्यांनी विचारले, "ते राहू

द्या हो ! मी काय विचारतो तेवढं सांगा ! आता असं बघाऽऽ ! तुम्ही असं म्हणता की तुम्हांला नीऽट दिसत नाही ! नीऽऽट आठवत नाही ! मग सांगा तुम्ही कशावरून असं म्हणता, की कोर्टापुढं असलेल्या आरोपीनंच गोळ्या मारल्या?"

"कशावरून म्हणजे ? अमरिकसिंग दिसायला ह्याच्यासारखाच होता म्हणून !"

"अऽऽच्छाऽऽऽ ! म्हणजे तोऽअमरिकसिंग ! तोऽऽऽऽ ! (इथे बचावाच्या वकिलांनी नैर्ऋत्येच्या दिशेने हात फेकला.) दिसायला ह्याच्यासारखा होता, असंच तुम्हांला म्हणायचंय ना ?"

"होय !"

सरकारी वकिलांनी कपाळाला हात लावला. भारत विरुद्ध पाकिस्तान अशी टेस्ट मॅच ब्रेबोर्न स्टेडियमवर असावी. स्टेडियम माणसांनी फुलून जावा. टॉस जिंकून भारताने फलंदाजी पत्करावी. टाळ्यांच्या कडकडाटात भारताच्या सलामीच्या जोडीने बाहेर पडावे आणि पाकिस्तानच्या द्रुतगती गोलंदाजाच्या पहिल्या ओव्हरच्या पहिल्याच चेंडूला भारताच्या सलामीच्या फलंदाजाची मधली दांडी


तुमच्या चेहेऱ्याची नि सौंदर्याची काळजी घ्या

चिघळणारी मुरमे नि पिंपल्स यांपासून हमखास संरक्षण मिळवा.





७ दिवसांची उपचार-योजना—फक्त २ रु. पेक्षा थोड्या जास्त खर्चात

Nital

नितल

मुरुम पुटकुळ्यांवरील औषधि क्रीम

- जंतुनाशक औषधि द्रव्यांनी युक्त.
- वेळीच लावण्यास सुरवात केली तर पुढे वा डाग राहात नाहीत
- फक्त २% इतका कमी गंधकाचा अंश असणारे एकमेव उत्पादन
- फक्त 'नितल' मध्येच, व्हिटॅमिन 'एफ्' असते की जे व्रण राहू न देता मुलायम त्वचा निर्माण करते.



प्रतिबंधात्मक उपचार

मुरमे, पुटकुळ्या चिघळू नयेत किंवा बऱ्या झाल्यावर पुन्हा पुन: उपद्रव होऊ नये म्हणून, तुमच्या आवडीच्या तेल रहित फेस क्रीममध्ये थोडेसे 'नितल' मिसळून ते नेहमी वापरा.

सर्व प्रमुख केमिस्टांकडे मिळते.

बृहन्मुंबईकरिता वितरक

**मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को.**, १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

**मे. एस्. एम्. प्रभू ॲण्ड सन्स**, १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

१५–२० फूट लांब जाऊन पडावी ! प्रेक्षकाला काय वाटेल ? तसंच सरकारी वकिलांना वाटलं.

अत्यंत आनंदाने खाली बसता बसता अमरिकसिंगाचे वकील म्हणाले, " That's all your Honour ! "

दोन्ही वकिलांची रस्सीखेच ही अशी झाली. मात्र बचावाच्या वकिलांना प्रत्येक साक्षीदाराच्या बाबतीत असा आनंद मिळाला नाही. काही साक्षीदार जे असं म्हणत होते की, खून झाला त्या वेळी आम्ही तिथे प्रत्यक्ष हजर होतो. आणि आत्ता कोर्टापुढे असलेला आरोपी अमरिकसिंग हा तसाच दिसतो, त्यांची उलटतपासणी बचावाच्या वकिलांनी घेतलीच नाही (No Cross). पण काही खमके साक्षीदार असे ही निघाले की त्यांनी बचावाच्या वकिलांना ठणकावून सांगितले की, ' छे: ! छे: ! वकीलसाहेब, ज्यांनी गोळ्या मारल्या तो अमरिकसिंग आणि आत्ता कोर्टा-पुढं असलेला अमरिकसिंग या दोन व्यक्ती वेगळ्या नव्हेत ! हाच तो ! आम्ही ओळखतो ना त्याला चांगला जवळून ! जयपालकौरने, ओळखपरेडमध्ये ' मी अमरिकसिंगाला ओळखू शकले नाही ' हे कबूल करून पुढे सांगितले की, " आता मला नीट ओळख पटली आहे, हाच माझा नवरा अमरिकसिंग. तिने आपल्या दुर्दैवी संसाराची सर्व हकीकत न्यायमूर्ती बेदींना सांगितली. कॅप्टन मेनन आपल्या साक्षीत म्हणाले की, " ओळखपरेडमध्ये मी आरोपी अमरिकसिंगाला ओळखू शकलो नाही हे खरं. पण आता नीट बघून मी सांगतो की हाच तो अमरिकसिंग. माझ्या माहितीप्रमाणे अमरिकसिंग हा B. A. LL. B. आणि अत्यंत हुशार, एफिशियंट गॅझेटेट ऑफिसर आहे. केवळ माझ्यासारखे अनेक वरिष्ठ अधिकारीच नव्हेत तर त्याच्या हाताखालचे लोकसुद्धा सांगतील की अमरिकसिंग हा आपलं काम चांगलं जाणतो ! फार हुशार आणि तल्लख बुद्धिमत्तेचा ऑफिसर आहे ! त्याच्या आयडेंटिटी कार्डावर अॅटेस्टेशन म्हणून सही आहे ती माझीच आहे ! त्या कार्डावर मी त्याचा अंगठाही घेतला. कारण सरकारी नियमाप्रमाणे सही व अंगठा घ्यावा लागत असे ! आणि मी लष्करी अधिकारी असल्यामुळे मला सही आणि अंगठा दोन्ही घेणंच अधिक श्रेयस्कर वाटतं ! मग तो मनुष्य कितीही शिकलेला असो ! हल्ली मात्र सरकारी नियम बदलल्येत ! हल्ली सही किंवा अंगठा घ्यावा असे नियम म्हणतो ! अमरिकसिंगच्या कार्डावर मी सही केली तेव्हा मात्र सही व अंगठा घ्यावा असा नियम होता. आयडेंटिटी कार्डावर असलेला अंगठा आरोपी अमरिकसिंगाचा आहे आणि तो माझ्यासमोर त्याने कार्डावर उमटवला आहे.

पंच आले. त्यांनी पोलिसांनी पिस्तूल अमरिकसिंगाच्याच हातातून काढून घेतले असे सांगितले. दिल्लीचे पंच आले. त्यांनी अमरिकसिंग ऊर्फ डॉ. अमरस्वरूप आझाद याच्याकडून बलजीतकौरच्या नावाची आणि सहीची रेल्वे लगेज क्लोक रूमची पावती व ३ स्त्रियांचे फोटो आमच्यासमक्ष पोलिसांनी जप्त केले म्हणून सांगितले.

फिंगर प्रिंट एक्स्पर्ट आला. त्याने कोर्टापुढे हजर केलेल्या रिव्हॉल्व्हरवर असलेले हातांचे ठसे अमरिकसिंगाच्या उजव्या हाताचे ठसे आणि डॉ. अमरस्वरूप तेजसिंग यांच्या हाताचा ठसा हे तिन्ही ठसे एकमेकांशी तंतोतंत जुळतात, असे सांगितले. तो पुढे म्हणतो की, " कुठल्याही दोन भिन्न व्यक्तींचे डाव्या आणि उजव्या हाताचे ठसे इतके तंतोतंत कधीच जुळणार नाहीत. सरकारी हॉस्पिटलचे डॉक्टर आले. त्यांनी सांगितले की, " १५ फेब्रुवारी १९५० ला आरोपी अमरिकसिंग की जो स्वतःच जखमी होता त्याला ट्रीटमेंट मी दिली. त्याच्या जखमांचे स्वरूप व वर्णन, एवढेच नव्हे, तर प्रत्येक दोन जखमांमधील अंतर किती होते याचे सविस्तर वर्णन करणारा हा घ्या माझा मेडिको–लीगल रिपोर्ट. त्यानंतर पंजाबचे पोलीस जवळ जवळ ४ वर्षांनी कोर्टापुढे असलेल्या आरोपीला घेऊन माझ्याकडे आले. मी त्याच्या चेहऱ्यावरच्या जखमांचे स्वरूप व दोन जखमांमधील अंतर मोजले. अर्ध्या सेंटीमिटरचादेखील फरक नाही ! मी असे ठामपणाने सांगू शकतो की ही केवळ निसर्गाची करामत किंवा योगायोग नव्हे ! हाच तो अमरिकसिंग ! ......"असे एकूण ३६ साक्षीदार सरकारतर्फे सरकारी वकिलांनी तपासले आणि केस संपवली!

आणि त्यानंतर बचाव पक्षाचे साक्षीदार आले ! किती ? एकूण २३ ! आणि गंमत अशी की बलजीतकौरची साक्ष कुठल्याच पक्षाने काढली नाही ! कारण सरकार पक्षाला असे वाटले की बलजीतकौरची साक्ष काढण्यात आपल्याला धोका आहे ! का ? कारण आपला नवरा अमरिकसिंग याला वाचवण्यासाठी ती असेच सांगणार की कोर्टापुढे असलेला आरोपी अमरिकसिंग उर्फ अमरस्वरूप आझाद हा माझा नवरा अमरिकसिंग नव्हे ! हा दुसराच कोणीतरी आहे ! उलट बचाव पक्षाचे म्हणणे असे होते की आम्ही बलजीतकौरला बचावाचा साक्षीदार म्हणून बोलावणार नाही ! का ? कारण ती असे म्हणणार की कोर्टापुढे असलेला आरोपी


लिट्‌क्विझ नं. ४५ मध्ये **रु. ५०,०००** जिंकाच

- पिनिक्विझमध्ये मनगटी घड्याळ
- रु. १२ पाठवून लिट्‌क्विझ वीक्लीचे ५० अंक मिळवा आणि 'एन्युअल सबस्क्रायबर्स क्वीझ' मध्ये भाग घ्या.
- अधिकृत उत्तर ताबडतोब मिळविण्यासाठी तुमच्या पत्रिकांबरोबर १० पैशांचे पोस्ट कार्ड पाठवा.

लिट्‌क्विझ प्राइवेट लिमिटेड, मुंबई–७.

डॉ. अमरस्वरूप आझाद ह्याच माझा नवरा अमरिकसिंग ! कशासाठी ? आपला फरारी असलेला नवरा अमरिकसिंग याला वाचवण्यासाठी !

बचाव पक्षातर्फे जे एकूण २३ साक्षीदार तपासण्यात आले त्यांपैकी २२ डॉ. अमरस्वरूप आझाद ऊर्फ अमरिकसिंग याचे पेशंटस् होते. प्रत्येकाने सांगितले की, आरोपीला आम्ही डॉक्टर या नात्याने गेली ३–४ वर्षेच ओळखतो ! सरकारी वकिलांनी उलटतपासणीत प्रत्येकाला फक्त एकच प्रश्न विचारला, "ऑक्टोबर १९५० पूर्वी तुम्ही आरोपीला डॉक्टर म्हणून ओळखत होतात का ?" आणि प्रत्येकाने उत्तर दिले होते "नाही !" उत्तर स्पष्ट होते ! सरदार लाभसिंग यांचा खून झाला होता तो १५ फेब्रुवारी १९५० ला आणि अमरिकसिंग पोलीस कोर्टातून पळाला होता तो मार्च १९५० च्या शेवटच्या आठवड्यात ! आणि ऑक्टोबर १९५० ( त्याच्या 'डॉक्टर' म्हणून असलेल्या सर्टिफिकेटाची तारीख ) च्या पूर्वी आपण डॉक्टरच होतो का आणखी कुणी, त्या तारखेपूर्वी आपले मित्र कोण होते, नातेवाईक कोण होते, हे अमरिकसिंग सांगू शकत नव्हता !

अमरिकसिंगाने बचावासाठी म्हणून आणलेले २३ सावे साक्षीदार ! Civil Gazetted officer ! मोहिंदरसिंग ! त्यांनी आपल्या साक्षीत सांगितले की सिव्हिल गॅझेटेड ऑफीसरच्या आयडेंटिटी कार्डावर त्याची सही घेतली जाते ! अंगठा नव्हे ! त्यांनी त्यांचे स्वतःचे कार्ड कोर्टाला दाखविले. त्यावर त्यांची सही होती. अंगठा नव्हता ! मात्र उलटतपासणीत त्यांनी कबूल केले की अमरिकसिंग ज्या वेळी Civil Gazetted officer झाला त्या वेळी "Thumb impression OR signature" असा नियम होता की नाही ते मला माहीत नाही ! किंवा "Signature AND Thumb impression !" असा नियम होता की कसे ? ते ही मी सांगू शकणार नाही ! ते फक्त कॅप्टन मेननच सांगू शकतील ! (की ज्यांची साक्ष आधीच कोर्टापुढे होती ! )

झाले ! या वातावरणात दोन्हीकडचे साक्षीदार संपले. सरकार पक्षाचे ३६ आणि बचाव पक्षाचे २३ साक्षीदार असे एकूण ५९ साक्षीदार अमरिकसिंगाचे भवितव्य ठरवणार होते ! आता दोन्ही वकिलांची वक्तव्ये (Arguments) व्हायची होती ! न्यायमूर्ती बेदी यांनी दोघांना तयारीसाठी तारीख दिली ४ ऑक्टोबर १९५४ !

४ ऑक्टोबर १९५४ ला कोर्टात पुन्हा गर्दी झाली ! ज्या वेळी आरोपी आपल्या बचावासाठी म्हणून काही साक्षीदार तपासतो अशा वेळी प्रथम भाषण करण्याचा अधिकार बचाव पक्षाचा असतो. आणि म्हणूनच अमरिकसिंग ऊर्फ डॉ. अमरस्वरूप तेजसिंग यांचे वकील प्रथम भाषणासाठी उभे राहिले ! आपला काळा झगा सावरीत ते आत्मविश्वासाने बोलू लागले, "प्लीज युवर ऑनर !

(क्रमशः)

"सारे जग श्वास रोखून बसेल"

असे बेगुमानपणे सांगणाऱ्या हिटलरच्या

झंझावाती पुरुषार्थाची कहाणी

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये फक्त

# भिंतीच्या पैलड्या

सुधाकर राजे

## टेबला, तुझा आकार कसा ?

कोणे एके काळी गलिव्हर प्रवास करीत करीत लिलिपुट नावाच्या देशात गेला. तेव्हा त्याला आढळून आले की अंडे मोठ्या टोकान फोडावे की लहान टोकाने फोडावे, याबाबतीत गंभीर मतभेद झाल्याने त्या देशात दोन राजकीय पक्ष निर्माण झाले होते. हाच गलिव्हर आणखी प्रवास करीत पॅरीसला पोहोचला असता तर त्याला याहूनही सुरस व चमत्कारिक गंमत दिसली असती. कारण, व्हिएटनामचे भीषण युद्ध थांबविण्यासाठी सर्व पक्षांची मंडळी पॅरीसला जमली आहेत, पण ज्या टेबलाशी बसून वाटाघाटी करायच्या त्या टेबलाचा आकार कसा असावा याच बाबतीत त्यांचे मतैक्य होऊ न शकल्याने अजून वाटाघाटींना म्हणे सुरुवातच होऊ शकलेली नाही. टेबल तिकोनी की चौकोनी, की गोल असावे, यावर बरीच भवति न भवति होऊन अखेर गोल टेबल मान्य झाले असल्याचे कळते, पण त्यातही हे गोल टेबल अखंड असावे की सांध्याचे याचा वांधा पडला आहे.

आता बोला, गलिव्हरसाहेब ! शारीरिक चिमुकल्यांच्या जगात गंमत जास्त, की मानसिक चिमुकल्यांच्या जगात ? आता टेबलाच्या आकारावर जर जगाची शांतता अवलंबून असेल तर वाटोळ्या टेबलाने जगाचे वाटोळेच झाले म्हणजे ? अन् टेबलाचा आकार जर महत्त्वाचा आहे तर टेबल कशाचे केले आहे याला का महत्त्व नको ? व्हिएटनाम हा बांबूचा देश, तर अमेरिका हा प्लॅस्टिकचा प्रदेश. तेव्हा बांबूचे टेबल की प्लॅस्टिकचे टेबल असा झगडा का निर्माण झाला नाही ? (बाकी असा वाद निर्माण झालाच असता तर भारताने शिसवी टेबल देऊन तडजोड साधली असती.) अन् प्लॅस्टिक टेबलाच्या बाबतीतही सन्मायका की फॉरमायका असा मतभेद अध्यक्ष जॉन्सन आणि नियोजित अध्यक्ष निक्सन यांच्यांत कशावरून निर्माण झाला नसता ? आणि शेवटी टेबलाचा आकार अन् लाकूड मान्य झाले तरी त्याला पाय किती असावेत हा जागतिक महत्त्वाचा प्रश्न शिल्लक उरतोच. विशेषत: सतत इतकी वर्षे नेटाने लाथाळी चालू ठेवणाऱ्या या मंडळींना हा प्रश्न विशेषच महत्त्वाचा वाटेल अशा माझा अंदाज आहे.

ते काही असो, हल्ली धुडगूस घालणाऱ्या अनेक समस्या का उद्‌भवल्या किंवा का नष्ट होत नाहीत हे ओळखण्याचा मार्ग आता सापडला आहे. उदाहरणार्थ, हल्ली सगळीकडचे विद्यार्थी दंगेधोपे का करीत आहेत ? त्यांना मास्तरांच्या मिशीचा कट आवडत नाही म्हणून. मजूर संपावर का जात आहेत ? त्यांना गिरणीच्या

भोंग्याचा आवाज भसाडा वाटतो म्हणून. सरकारी अधिकारी आवडीने लाच का खात आहेत ? बायको इतका चवदार पदार्थ खायला घालीत नाही म्हणून. पार्लेमेंटमध्ये विचारलेल्या बहुतेक प्रश्नांचे उत्तर " माहिती गोळा करण्यात येत आहे," असे देऊन मंत्री उडवाउडवी का करीत आहेत ? त्यांनी लहानपणी रंगीबेरंगी दगड गोळा करण्याचे ट्रेनिंग घेतले नाही म्हणून. अमेरिका-रशियाचे का पटत नाही? कोसिजिनला हॉट् डॉग आवडत नाही म्हणून. माओ आणि लिऊचे भांडण कशामुळे झाले ? माओला चायनीज् फ्राइड राइस विथ् प्रॉन्स आवडतो तर लिऊला विथ् चिकन आवडतो म्हणून.

## प्लास्टर ऑफ् पॅरिसचा मुख-चंद्रमा

अपोलो–आठच्या चंद्र-प्रदक्षिणेमुळे बऱ्या लोकांची फार गैरसोय झाली आहे. त्यातली पहिली मंडळी म्हणजे प्रियेच्या मुखचंद्रावर कविता करणारे आपले कवी. विशेषतः, चंद्र जवळून प्लास्टर ऑफ पॅरिससारखा दिसतो अशी अपोलो–आठमधल्या त्रिकुटाने अगदी गद्य शब्दांत माहिती दिल्यापासून तर प्रियेच्या मुखाला चंद्राची उपमा देण्याची कोठल्याच प्रियकराची ताकद होणार नाही. आता एवढे मात्र खरे की प्रियेने तोंडावर फारच पावडर थापली तर ते अप्रत्यक्षपणे सुचविण्यासाठी प्रियकर तिला म्हणू शकेल की आज तुझा मुखडा अगदी चंद्रासारखा दिसतो (— म्हणजे कसात अपोलो–आठमधून चंद्र प्लास्टर ऑफ पॅरिससारखा दिसला तसा दिसतो.) अशीच गैरसोय झालेली आणखी एक मंडळी म्हणजे पृथ्वी सपाटच आहे असे मानणारी इंग्लंडमधली एक संस्था. अपोलो–आठमधून घेतलेले पृथ्वीचे गोल फोटो म्हणजे थापेबाजी आहे अन् पृथ्वी गोल असल्याची सगळ्यांची समजूत करून देण्याचा अमेरिका व रशियाने मिळून कट रचला आहे, अशी या संस्थेच्या सभासदांची खात्री आहे. अगदी बरोबर. हे दोन प्रबळ देश मिळून एखाद्या दिवशी जगाचे वाटोळे करतील, तेव्हा त्याचीच ही पूर्वतयारी असावी.

## रखवालदाराचे सुलटे चोराचे उलटे

दिल्लीतल्या बंगल्यांची रात्री राखण करणाऱ्या रखवालदारांना विणकाम शिकवावे, म्हणजे रात्री गस्त घालताना त्यांचे हात मोकळे राहणार नाहीत व त्यांनी विणलेले कपडे विकत घेतले तर त्यांचे उत्पन्नही वाढेल, अशी एक कल्पना आली आहे. शाबास ! रखवालदाराचे दोन सुलटे व चोराचे चार उलटे अशी जोडी जमली तर बहार होईल. आणि एखादा मारेकरी अंगावर धावून आला तर रखवालदार त्याला म्हणू शकेल, " थांब, माझे हात केळी खायला गेले नसले तरी स्वेटर विणायला गेले आहेत. तेवढा पुरा होऊदे, मग घेतो तुझा समाचार. ' आतापर्यंत माझी आपली समजूत होती की, रखवालदारांच्या हाती सोटा, बंदूक असल्या गोष्टी शोभतात.–चूक ! रखवालदारांच्या हातात निटिंग पिन्स शोभतात. ○

# उज्ज्वल भविष्यासाठीं अचूक उपाय बचत!

आज त्यांना कांहीं काळजीकथा नाहीं. पण उद्यांचें काय ? भविष्याचा विचार करायला त्यांना शिकवा. भविष्यासाठीं बचत करायला आणि तीहि स्टेट बँकेत करायला त्यांना शिकवा.

**सेवेसाठी**
**स्टेट बँक**



S. 271 MR

# डॉ. खोराना प्रकरणाच्या निमित्ताने....

पृष्ठ ४७ वरून

हे पण खरे. जनतेचे जीवनमान सुधारावे, प्रत्येकाला अंगभूत गुणांचा मुक्तपणे विकास करावयास मिळावा आणि प्रत्येक भारतीयाची ताकद शक्यतो या देशाच्या उन्नतीसाठीच खर्च व्हावी याबाबतही दुमत नसावे. पण या साऱ्या गोष्टींचा विचार आपण खोराना प्रकरणाच्या संदर्भात करतो आहोत हे मात्र मला विचित्र वाटते. खोरानांना तुम्ही पूर्वीच भारतात परत आणू शकला असतात. चंद्रशेखरसारख्या शास्त्रज्ञांना तुम्ही अजूनही परत आणू शकाल. पण हा हट्ट कशासाठी? ते लोक आज ज्या स्वरूपाचे संशोधन करताहेत त्या संशोधनाची नजीकच्या काळात या देशाला जरुरी नाही. आणि हे जर असे असेल तर या देशाची साधनसंपत्ती त्या स्वरूपाचे मूलभूत संशोधन करण्यासाठी आपण खर्च करता कामा नये. त्या लोकांना खुशाल परदेशांत राहून मानवजातीची सेवा करू दे. ते लोक भारतात जन्मले, भारतात वाढले याचा आपण अभिमान बाळगू.

ते लोक भारतात आले म्हणून भारतातले वातावरण बदलेल, देशाची प्रगती झपाट्याने होईल, त्यांना मिळालेल्या बक्षिसांनी देशाचा काही फार मोठा सन्मान होईल ही एक चुकीची कल्पना आहे. **देशाची उंची त्यांनी किती नोबेल पारितोषिके वा आंतरराष्ट्रीय बक्षिसे मिळवली यावरून ठरवली जात नाही.** जपानचे उदाहरण घ्या! आशियातील हा सर्वांत प्रगत देश. तांत्रिक ज्ञानात तो आज अमेरिकेच्या जवळपास आहे. त्या देशातले सारे वातावरण विज्ञानमय आहे. पण या देशाने आतापर्यंत विज्ञानातील फक्त दोनच नोबेल पारितोषिके मिळवलेली आहेत. आपणांला आज जरुरी नसलेले मूलभूत संशोधन या देशात करण्यापेक्षा देशातले वातावरण विज्ञानमय बनविणे हे आपणासमोरचे प्रमुख काम आहे. आणि नेमका याच गोष्टीचा कोणी विचार करीत नाही.

आपली परिस्थिती खरोखरच गुंतागुंतीची आणि विचित्र आहे. विज्ञान आणि अंधश्रद्धा यांचे काही चमत्कारिक रसायन या देशात तयार होत आहे. देशातले शास्त्रज्ञ देवावर विश्वास ठेवतात हे मी समजू शकेन. ते एखाद्या बुवाचे भक्त झाले तरी ते मी समजू शकतो. पण या देशातील सर्वोत्तम शास्त्रज्ञ, प्रशासक आणि मंत्री जेव्हा सत्यसाईबाबांच्या चमत्कारावर विश्वास ठेवतात तेव्हा मी अस्वस्थ होतो. या देशाच्या संरक्षण खात्याचा स्वतःचा मोठा संशोधन विभाग आहे. डॉ. भगवंतम् यांसारखा नावाजलेला तज्ज्ञ शास्त्रज्ञ या संशोधन विभागाचा प्रमुख आहे. सत्यसाईबाबा हातातून घड्याळ काढतात तेव्हा तो भक्तिभावाने तेथे उभा असतो. त्याचा यावर विश्वास आहे तर तो त्यांना हातातून अणुबॉंब काढावयास का सांगत नाही?

या देशातील अंधश्रद्धा आणि भोळेपणा नाहीसा करून या देशात विज्ञानमय वातावरण निर्माण करणे हे आपणांसमोरचे सर्वप्रथम काम आहे. आणि तुम्ही पत्रकार याबाबत खूप काही करू शकाल. ▫

............

मला वाटते, या साऱ्या प्रश्नांत तुम्हांला या राष्ट्राबद्दल किती आत्मीयता, किती जिव्हाळा वाटतो हाच खरा सवाल आहे.




## व्यंकटेश कामत

## ३

"या देशात मुसलमानांच्या खालोखाल शास्त्रज्ञांचे लाड होताहेत आणि राष्ट्रीय मुसलमानांच्यापण वाटचाला येत नसेल एवढे कौतुक परदेशांत जाऊन आलेल्या शास्त्रज्ञांच्या वाटचाला येतंय. पण या एकतर्फी प्रेमाचा आता पुर्नविचार झाला पाहिजे."

श्री. व्ही. एन. कामतांच्या तोंडून हे शब्द बाहेर पडले मात्र आणि मी जरा गोंधळलोच. कामतांच्याकडून त्यांच्या नेहमीच्या मिस्किल, खोचक भाषेत काही मुलखावेगळे विचार ऐकावे लागणार हे मुलाखतीला आलो तेव्हाच मला माहीत होते. पण असे बघा, एखादा फलंदाज फार दणकेबाज खेळतो हे आपणांला माहीत असते. पण तरीही आल्याआल्या त्या फलंदाजाने सरळ लागोपाठ षट्कारच मारायला सुरुवात केली तर आपली



अवस्था काय होईल... ?—अगदी तशीच माझी अवस्था श्री. कामतांनी दिलेली उत्तरे ऐकताना होत होती. दोन तपांहून अधिक काळ कामत या क्षेत्रात आहेत. चव्वेचाळीस साली श्री. कामत एम्. एस्सी. झाले. त्यानंतर सरळ शिक्षणक्षेत्रातच राहिले असते तर कामत सध्याच्या 'जनता कॉलेज'च्या जमान्यात प्राचार्यसुद्धा झाले असते. किंबहुना आतापर्यंत किमान दोनदा तरी प्राचार्यपद स्वीकारता का म्हणून कामतांना विचारणा झालेली आहे. पण कामतांनी तरुण वयातच आपला स्वधर्म ओळखला. आणि मग केव्हाही कामतांना आयुष्याशी तडजोड करावीशी वाटली नाही. एखादा कवी कविता का करतो, चित्रकार चित्रे का काढतो, गवयाला गाणे म्हटल्याशिवाय बरे का वाटत नाही, या प्रश्नांप्रमाणेच कामत संशोधनच का करतात हा प्रश्न विचारणे वेडगळपणाचे ठरेल. स्वतःच्या संशोधनात हा माणूस मस्त आहे. मग कामतांना डॉक्टरेट मिळविणे आवश्यक वाटत नाही. स्वतःच्या वेतनाची खंत वाटत नाही. आपल्या तंद्रीत हा आपला संशोधन करतोय. 'टेट्राहेड्रा' 'टेट्राहेड्रा लेटर्स' 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ केमिस्ट्री' या जगविख्यात मासिकांतून कामतांचे वीसहून अधिक निबंध प्रसिद्ध झाले आहेत. **हे सारे संशोधन कामतांनी भारतांतील उपलब्ध परिस्थितीत उपलब्ध साधनसामग्रीवर केलंय.** यातला कोणताही निबंध कामतांनी जगातील कोणत्याही विद्यापीठाला सादर केला असता तर त्यांना सहज डॉक्टरेट मिळून गेली असती. पण कामतांना या उपचाराची कधी जरुरी वाटली नाही. 'इंडियन मायक्रोबॉयॉलॉजिकल सोसायटी'चे अध्यक्ष डॉ. फेबियन फर्नांडीस एकदा विनोदाने

म्हणाले होते, "व्ही. एन. कामत आणि एन्. कार. कामत या दोन प्रख्यात कामतांनी अद्याप डॉक्टरेट घेतलेली नाही. त्यामुळे डॉक्टरेट घेऊन मी काही चूक केली आहे काय असे अनेकदा वाटते."

## पांड्या, लेका बालीस्तर का नाही झालास ?

श्री. व्ही. एन्. कामत पुढे म्हणाले, "या देशात येणाऱ्या कोणत्याही शास्त्रज्ञाला तुम्ही किमान सातशे रुपये देता. तो काय संशोधन करू शकेल याची फारशी चौकशी न करता देता. हा पगार काही कमी नाही. या देशातील वृत्तपत्रांचे सह-संपादक, साहित्यिक, कॉलेजमधले प्रोफेसर या नवनिर्मितीच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांसही हेवा वाटावा असा हा पगार आहे. या देशात शास्त्रज्ञ या माणसाबद्दल सर्वसामान्य लोकांत तर खूप आदर आहे. खरं सांगू, चाळीस वर्षांपूर्वी खेड्यातला एखादा तरुण विंग्रजी शिकून गावी परतल्यावर त्याचे गावात जे कौतुक व्हाव-याचे ना, त्यातला हा प्रकार आहे. त्या तरुणाचे मित्र विंग्रजी ऐकून 'पांड्या पांड्या, तू बालिस्तर का नाही झालास ?' म्हणून तोंडात बोट घालून विचारायचे. पांड्या शहरात बालीस्तरी करायची सोडून खेड्यात या कुग्रामात येऊन उगाच कुजतोय असे त्यांना वाटायचे. भारतात शास्त्रज्ञांना योग्य संधी नाही असे आपण म्हणतो हा त्यातला प्रकार आहे.

हा प्रकार आणखी एका दृष्टीने भयावह आहे. शास्त्रज्ञ म्हणजे तरी शेवटी कोण ? भोवतालच्या घटनांची, परिस्थितीची, निसर्गाची एक वेगळी, नवी सुसूत्र मांडणी करू शकतो तो शास्त्रज्ञ. निसर्गाचे नियम समजावून घेऊन ते आपल्या सुखासाठी राबवणे हे शास्त्रज्ञाचे प्रमुख काम. या देशातील साधनसामग्री, सोयी-सवलती आणि उपलब्ध परिस्थिती ज्यांना वापरता येत नसेल ते संशोधन काय करणार कपाळ ! जगात इन्सुलिनचे सिन्थेसिस ही एक अशक्य गोष्ट समजली जात होती. गेल्या वर्षी ती गोष्ट एका संशोधकाने करून दाखविली. तो संशोधक चीनमधील एका विद्यापीठातील प्रोफेसर आहे. चीनने त्यांच्या हुशार तरुणांना फक्त देशातच शिक्षण दिले. नंतर देशातच डांबून ठेवले. त्यानंतर एखाद्या कारखान्यात मुकादम होण्यापेक्षा संशोधक वा शिक्षक बनावयास प्रवृत्त केले. **इतकेच नव्हे तर चीनमध्ये संशोधनक्षेत्रात वापरली जाणारी साधनसामग्री फक्त चीनमध्येच बनवलेली असते.** हे फक्त चीन सांगतो आहे असे नव्हे. 'इन्सुलीनच्या सिन्थेसिसची घटना घडली तेव्हा अस्वस्थ झालेले काही अमेरिकन पत्रकार चीनला भेट द्यावयास गेले होते. त्या वेळी 'डिस्कव्हरी'मध्ये लिहिलेल्या आपल्या लेखात मेंडलशनसारख्यांनी हे दिलखुलासपणे मान्य केले की, संशोधकाला नेहमीच काही भारी साधनसामग्री लागते असे नव्हे. गेल्या वर्षी नोबेल पारितोषिक

मिळाल्यावर वुडवर्डने दिलेली ती मुलाखत वाचलीय तुम्ही ? त्याची प्रयोगशाळा पाहावयास आलेल्या तरुणांना त्याने एक खोका दाखवला. त्या खोक्यात फक्त दोन खडू, एक फळा, एक फडके आणि चार टेस्टट्यूब्स होत्या. पण वुडवर्डचा हा विनोद आमच्या शास्त्रज्ञांच्या डोक्यावरून जाईल. तुम्ही **' सायन्स अँड टेक्नॉलजी '- मधील जॉर्जीची ती मुलाखत वाचा. दोनदा नोबल पारितोषिक मिळवणारा हा म्हातारा स्वत:च्या डोक्याकडे बोट दाखवीत सांगतोय, शेवटी फक्त या एवढ्या जागेत एका अनोखी तंद्रीत जे काही शिजते त्यावरून माझे प्रबंध तयार होतात. बाकी सान्या गोष्टी शेवटी फालतू आहेत. '**

## — कवी थोडे, कवडे फार —

ही सारी चर्चा आपण खोरानांच्या संदर्भात करतोय. खोरानांच्या बुद्धिमत्तेबद्दल मला खूप आदर आहे. किमान गेली सहा-सात वर्षे खोरानांच्या वाट्याला काही फार मोठा आंतरराष्ट्रीय सन्मान यणार हे संशोधनक्षेत्रातील सारे जाणकार ओळखून आहेत. पाच वर्षांपूर्वी भारतातील एका खाजगी कंपनीने खोरानांना एक फार मोठी नोकरी देऊ केली होती. आज खोराना अमेरिकेत आहेत, किमान तेवढ्या सोयीसवलती त्या नोकरीत उपलब्ध होत्या. खोरानांनी त्या वेळी ती नोकरी नाकारली. खोरानांचा एक वेळ अपमान झाल्याने ते चिडले असे त्याबद्दल सांगण्यात आले. पण आपण जरा व्यक्ती विसरून शांतपणे विचार करू या. बावन्न साली खोराना भारतात परत येऊ इच्छीत होते, त्या वेळी त्यांचे मोठेपण कशाच्या जोरावर ओळखता येणार होते ? दरवर्षी शेकडो भारतीय तरुण डॉक्टरेक्ट मिळवन नोकरीच्या शोधात हिंडत असतात. या वेळी तुम्ही एक महत्त्वाची गोष्ट विसरता.-माणसाने डॉक्टरेट मिळवली याचा अर्थ, त्याला स्वतंत्रपणे संशोधन करण्यासाठी तयार करण्यात आले, एवढाच असतो. थोडक्यात डॉक्टरेट म्हणजे, संशोधन करण्याचा परवाना. आपण चुकीने डॉक्टरेट मिळविलेल्या प्रत्येकाला शास्त्रज्ञ मानतो. आंतरमहाविद्यालयीन कविसंमेलनात वाहवा मिळविलेल्या प्रत्येकाला महाकवी मानण्यातला हा प्रकार आहे. त्यांपैकी बहुतेक सारे कवडे असतात. फार थोडे कवी ठरतात. डॉक्टरेट मिळविणाऱ्या होतकरू तरुणांच्या बाबतही आपण हेच ध्यानात घरले पाहिजे. "

कामतांनी दिलेली ही उपमा मला एकदम पटली. आम्ही दोघेही दिलखुलासपणे हसलो. या संधीचा फायदा घेऊन मी कामतांना जरा वेगळा प्रश्न विचारला, " भारतात जुन्यापुराण्या चौकटीमुळे, लाल फितीच्या घोटाळ्यामुळे तरुणांचा तेजोभंग होतो हे खरे आहे का ? "

कामत म्हणाले, " मी खरं पाहता मघाशीच या प्रश्नाचं उत्तर दिलंय. आता जरा सविस्तरपणे सांगतो. अमेरिकेतही शास्त्रज्ञांना कोणी नारळ घेऊन बोलवा-

वयास जात नाही ! याबाबत प्रत्यक व्यक्ती काय सांगते यापेक्षा प्रातिनिधिक पुस्तके काय सांगतात ते आपण विचारात घेऊ. 'अर्नेस्ट बोरेक 'च्या 'अॅटम्स विदिन अस ' या पुस्तकाला अमेरिकन सरकारने 'थॉमस अल्वा एडिसन प्राइज ' दिलंय. कोलंबिया विद्यापीठानं प्रकाशित केलेल्या या पुस्तकात शास्त्रज्ञ होऊ इच्छिणाऱ्या तरुणांना खूप आतल्या गोष्टी सांगितल्या. त्यात म्हटलंय, 'अमेरिकेत आज एखाद्या केशकर्तनालयात काम करणाऱ्या कारागिराला ज्या सुखसोयी, सवलती आणि संरक्षण मिळते तेवढेही आज अमेरिकेत मूलभूत क्षेत्रात संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञाला मिळत नाही.' अमेरिकेतील न्हावी दर सहा महिन्यांनी आपली गाडी बदलतो. शास्त्रज्ञ ती वर्षातून एकदाच बदलू शकतो.


आता तुमचा प्रश्न थोड्या वेगळ्या संदर्भात लक्षात घ्या. भारतात सरकारी क्षेत्रात वा खाजगी उद्योगधंद्यात एकदम मोठ्या पगाराची नोकरी मिळणे जड आहे. पण खेडेगावांतील कॉलेजात या तरुणांना चांगल्या नोकऱ्या मिळतील. त्या छोटेखानी प्रयोगशाळेत ते लोक त्या खेड्याच्या दृष्टीने जरुरीचे असलेले काही संशोधन करू शकतील. नाहीतरी डॉ. नरगुंदांसारखा वृद्ध भारतीय शास्त्रज्ञ आज एका कॉलेजच्या छोट्या अपुऱ्या प्रयोगशाळेत काम करतोय. त्या छोट्या प्रयोगशाळेत दरवर्षी सहा-सात जणांना डॉक्टरेट देतोय. तुम्हांला संशोधनाची किती आवड आहे, हा शेवटी खरा प्रश्न आहे. आता आणखी एक गोष्ट विचारात घ्या. परदेशांतून येणाऱ्या शास्त्रज्ञांनी नोकरीचाच हट्ट का धरावा? डॉ. नेरूरकरांचे उदाहरण घ्या. अमेरिकेतून आल्यावर बरोबर आणलेल्या डॉलर्सच्या जोरावर त्यांनी इंदूरसारख्या ठिकाणी स्वतःचा छोटा कारखाना काढला. आपल्या मार्गदर्शनाखाली संशोधन करावयास काही विद्यार्थी घेतले. अमेरिकेतील स्वतःच्या ओळखीच्या जोरावर, त्या विद्यार्थ्यांना अमेरिकन विद्यापीठांकडून डॉलर्सच्या स्वरूपात शिष्यवृत्त्या मिळवून दिल्या.

या साऱ्या प्रश्नांत तुम्हांला या राष्ट्राबद्दल किती आत्मीयता, किती जिव्हाळा वाटतो हा खरा सवाल आहे. तरुणांनी परदेशांत स्थायिक होण्यासाठी जाण्याची फार मोठी लाट आज उसळलेली आहे. इतर साऱ्या गोष्टींप्रमाणेच या गोष्टीतही आपणांकडे पुरेशी आकडेवारी उपलब्ध नाही. पण परिस्थितीचे गांभीर्य तुमच्या लक्षात यावे म्हणून फक्त एक उदाहरण देतो. फक्त एका गोरेगावच्या 'सिबा रिसर्च सेंटर 'मधून गेल्या चार वर्षांत पन्नासाहून अधिक तरुण परदेशांत गेले आहेत. 'आत गेला तो गेला' या न्यायाने या खुणा फक्त गुहेत जाणाऱ्यांच्या उठलेल्या आहेत. डॉ. खोरानांना भारतात संधी नव्हती असे म्हणता त्या वेळी तुम्ही या पळपुट्या तरुणांना एक नैतिक आधार मिळवून देता. खोराना भारतात असते तर त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले असते का, या चर्चेपेक्षा भाभा

अमेरिकेत राहिले असते तर त्यांनाही नोबेल पारितोषिक मिळाले नसते का, हे विचारात घेणे अधिक अगत्याचे आहे. डॉ. भाभा या भारताच्या थोर सुपुत्राने स्वतःच्या व्यक्तिगत सन्मानापेक्षा वा संशोधनापेक्षा या देशात संशोधनाची परंपरा निर्माण करणे अधिक महत्त्वाचे मानले. डॉ. भाभा हेच शेवटी भारतीय संशोधकांपुढचे आदर्श असले पाहिजेत. कारण भारतीय संशोधकांवर आज एक वेगळी जबाबदारी आहे. एखाद्या गरीब मोठ्या एकत्र कुटुंबातील थोरल्या भावाला व्यक्तिगत इच्छाआकांक्षा बाजूला ठेवून घराच्या भल्यासाठी झटावे लागते. त्याच्या व्यक्तिगत सुखाच्या होमामधून एक सुखी कुटुंब उभे राहते. खोराना, चंद्रशेखर, शशांक मित्रा या थोर शास्त्रज्ञांवरची जबाबदारीपण आज यापेक्षा वेगळी नाही." □

## नोबेल पारितोषिक आणि गुरुमाहात्म्य

नोबेल पारितोषिक हा जगातला तसा सर्वोच्च सन्मान. फार काळजीपूर्वक हे बक्षीस दिले जाते. पण काहीजणांना या पारितोषिकाच्या वाटपातही राजकारण दिसते. 'झिवॅगो'ला हे बक्षीस मिळाले त्या वेळी रशियाने अशी टीका जाहीरपणे केली होती. 'प्राईज'सारखे पुस्तक वाचताना काही वाचकांनापण अशी शंका येते. काही दिवसांपूर्वी मात्र एका संशोधकाने कमाल केली. त्याने सरळ एक वंशावळच सादर केली. ह्या वंशावळीतील प्रत्येक शास्त्रज्ञात गुरुशिष्याचे नाते आहे आणि त्या सर्वांना नोबेल मिळालेले आहे.



............


पण हा प्रश्न सोडवायला बर्लिनची भिंत हा एक शंभर टक्के यशस्वी तोडगा ठरला, हे एक ऐतिहासिक सत्य आहे.

डॉ. लॉर्ड बोडेन हे ब्रिटनमधले एक नावाजलेले शिक्षण शास्त्रज्ञ. सध्या ते मँचेस्टर विद्यापीठातील 'सायन्स अॅन्ड टेक्नॉलजी' या प्रख्यात कॉलेजचे प्राचार्य आहेत. ज्या प्रश्नाने ते अस्वस्थ झाले आहेत, त्यांची झोप उडाली आहे, अशा एका प्रश्नावर त्यांनी 'सायन्स अॅन्ड टेक्नॉलजी' च्या डिसेंबर १९६७ च्या अंकासाठी एक मुलाखत दिली होती. —ज्या मुलाखतीने ब्रिटनमध्ये मध्यंतरी अमाप खळबळ उडवून दिली, इतिहास निर्माण केला— त्या त्यांच्या मुलाखतीमधील हा महत्त्वाचा भाग.

## डॉ. लॉर्ड बोडेन

## ४

बुद्धिमान तरुणांची निर्यात ही फार भयावह गोष्ट आहे. ही गोष्ट इतकी भयंकर आहे, हे आपल्या अजून नीटपणे लक्षात आलेले नाही. आणि मला वाटते, त्यामुळेच याची भयानकता अनेक पटींनी वाढलेली आहे. मी कवी किंवा साहित्यिक नाही, याचे मला आज खरोखर दुःख होत आहे; कारण त्या-



मुळे या प्रश्नाने मी कसा वेडापिसा झालो आहे, हे मला म्हणूनच शब्दांतून सांगता येत नाही. एकाच वाक्यात सांगतो. आजच्या घडीला अप्रगत लोकशाहीप्रेमी राष्ट्रां-समोरील हे सर्वांत मोठे प्रश्नचिन्ह आहे.

साऱ्या नद्या जेवढ्या सहजपणे सागराला मिळतात तेवढ्या सहजपणे अप्रगत आणि गरीब राष्ट्रांतील बुद्धिमान तरुणांचे लोंढे आज अमेरिकेकडे जाताहेत. मला आक-ड्यांच्या जंजाळात शिरावयाचे नाही, पण एक साधे उदाहरण घ्या. गेल्या वर्षी ब्रिटनमध्ये जेवढे वैद्यकीय पदवीधर तयार झाले, त्यांपैकी पंचाहत्तर टक्के डॉक्टर्स अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी निघून गेले आहेत. ब्रिटनमध्ये डॉक्टरांची कमतरता असताना हे घडले. यातही मजेची गोष्ट अशी की, त्यामुळे आपल्या इंग्लंडचे काही फारसे नुकसान झाले नाही; कारण इंग्लंडमध्ये उत्तरेकडच्या सर्व प्रमुख रुग्णालयांत भारतीय डॉक्टर्स काम करताहेत. विश्वास बसणार नाही तुमचा. त्या रुग्णालयांत साठ टक्के डॉक्टर्स भारतीय आहेत. आफ्रिकेचे उदाहरण घ्या. घोमे येथे त्यांनी एक वैद्यकीय महाविद्यालय उभारलंय. आफ्रिकन लोक स्वतःला परवडणार नाही असा खर्च त्या विद्यालयासाठी करताहेत. आतापर्यंत त्या विद्यालयातून शहात्तर डॉक्टर्स बाहेर पडले आणि त्यांपैकी अठ्ठावन्न डॉक्टर्स फ्रान्समध्ये स्थायिक होण्यासाठी निघून गेले तरीही ब्रिटन व अमेरिकेतल्या एकाही जागरूक वृत्तपत्राला ही आकडे-वारी प्रसिद्ध करणे अगत्याचे वाटलेले नाही.

**त्या तरुणांना देशातच राहावयाची सक्ती करणे जरुरीचे नाही का ?**

मला या प्रश्नाचे योग्य उत्तर द्यावयास जमेल असे वाटत नाही. लोकशाहीमधील काही मूलभूत प्रश्न येथे उपस्थित होतील. काही तात्त्विक आणि नैतिक मूल्यांचा काथ्याकूट आपणांला करावा लागेल. खरे पाहता ज्ञान ही एक विश्वव्यापी गोष्ट

आहे. एखाद्या माणसाला आपल्या गुणांचा विकास व्हावा, आपणांला अधिक सुखाचे आणि समृद्धीचे दिवस यावेत असे वाटले तर त्यात चूक काही नाही. अशा वेळी त्या तरुणाच्या शिक्षणाचा खर्च त्याच्या देशाने केला या कारणासाठी त्याचा रस्ता रोखणे रास्त होईल का ?

पण त्याचा रस्ता रोखणे चुकीचे आहे असेही मी ठामपणे म्हणू शकत नाही. घानामधील एखाद्या तरुणाचे उदाहरण घ्या. त्याच्या शिक्षणासाठी त्या देशाने केवढा अमाप त्याग केला आहे त्याची कल्पना इंग्लंडमध्ये बसून कशी येणार ? त्या देशातील सर्वसामान्य माणसाची, साऱ्या जिंदगीची जी कमाई असते त्याच्या दहापट रक्कम एक डॉक्टर तयार करण्यासाठी लागते. घाना त्या डॉक्टरला पगारही खूप देते. त्या देशातील सर्वसामान्य माणसाचे जे उत्पन्न आहे त्याच्या किमान दहापट पगार डॉक्टरला मिळतो. आणि तरीही तो घानातील तरुण डॉक्टर अमेरिकेत निघून जातो. अमेरिकेत त्या तरुण डॉक्टरचे काही फार लाड होतात असे नव्हे. अमेरिकेतील सर्वसामान्य माणसाच्या तिप्पट पगार त्याला अमेरिका देऊ शकते. आता तो तरुण अमेरिकेत जावयास निघाला असताना, घानातील जनता जर उद्या त्याचें रस्ते रोखले गेले पाहिजेत, असे म्हणाली तर त्यात तरी तसे काय चूक आहे?

**या प्रश्नावर ज्यांनी योग्य उपाय शोधून काढला आहे, असे एखादे राष्ट्र तुम्हांला माहीत आहे का ?**

या प्रश्नाचे उत्तर मोठे विचित्र आहे. जरा स्पष्ट सांगू का ? अमेरिकेने संरक्षण आणि अंतराळभ्रमण या दोन क्षेत्रांवर आपले सारे लक्ष आज केंद्रित केले आहे. म्हणूनच आज अमेरिकेत तंत्रज्ञांची चणचण भासते. जगभरच्या दरिद्री तरुणांना तेथे सुलभपणे चांगल्या नोकऱ्या मिळतात. एक गोष्ट खरी ! शेवटी मर्यादित अर्थाने मार्क्स संपूर्ण बरोबर ठरला. गरीब अधिक गरीब होतील आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होतील, हा त्याचा सिद्धांत शेवटी राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहारापुरता तरी तंतोतंत खरा ठरलाय्. आणि मार्क्सला ज्यांनी द्रष्टा मानले, मार्क्सचे तत्त्वज्ञान ज्यांनी स्वीकारले, ते सारे देश आज या आपत्तीतून सुटलेले आहेत. रशिया आणि चीनमधील एकही बुद्धिमान तरुण तुम्हांला शोधूनसुद्धा अमेरिकेत गेल्याचे आढळणार नाही.

**--काय......काय बोलता हे आपण ? त्या तरुणांचे रस्ते संगिनींनी रोखले गेले असतील. राष्ट्राराष्ट्रांत तुम्हांला का बर्लिनच्या भिंती उभारावयाच्या आहेत ?**

खरे सांगू ? तुमच्या या प्रश्नातच तुमच्या प्रश्नाचे उत्तर साठवलेले आहे. जे घडले त्याचे मी समर्थन केलेले नाही. बळजबरीची आणि सक्तीची मलापण घृणा वाटते. पण कृपया एक सत्य नजरेआड करू नका. हा **प्रश्न सोडवायला बर्लिनची भिंत हा**

एक शंभर टक्के यशस्वी तोडगा ठरला हे एक ऐतिहासिक सत्य आहे. ही भिंत उभारण्यापूर्वी, पश्चिम जर्मनीमधील कारखानदार शब्दशः पूर्व जर्मनीमधील विद्यापीठांच्या दारात उभे असत. आपल्या तयार तरुणांची ही वाटमारी पूर्व जर्मनीने काही काळ सहन केली. त्यानंतर त्यांनी एक मजेशीर निर्णय घेतला. बर्लिनची भिंत उभी राहिली. आणि ज्या क्षणी ही भिंत उभी राहिली त्या क्षणी एक चमत्कार घडला. तयार तरुणांची ही एकतर्फी निर्यात एका क्षणात थांबली. पूर्व जर्मनीमधील कारखाने प्रगतिपथावर घोडदौड करू लागले. कदाचित विश्वास बसणार नाही तुमचा, पण त्यानंतर काही काळ पश्चिम जर्मनीमधील कारखाने सक्तीच्या उत्पादन कपातीच्या चक्रात सापडले होते. त्यांच्याकडे तयार तंत्रज्ञांचा तुटवडा होता.

**–किती विचित्र उपाय सांगितलात. या प्रश्नावर आपण इतर कोणतेच उपाय सांगू शकणार नाही काय ?**

आहेत, तसे इतरही उपाय आहेत. पण त्या उपायांच्या यशस्वितेबद्दल खुद्द मी स्वतःच साशंक आहे. साऱ्या लोकशाहीप्रेमी राष्ट्रांनी एखादी आचारसंहिता तयार करावयाची वेळ आज आलेली आहे. एखाद्या अप्रगत राष्ट्रातील तरुण ज्या वेळी दुसऱ्या देशात जातो त्या वेळी त्या राष्ट्राने त्या तरुणाच्या मायभूमीला किमान-

## डॉ. भाभा म्हणाले होते..

सैनिकांप्रमाणेच शास्त्रज्ञही बहुधा आयात वा निर्यात करता येत नाहीत. शास्त्रज्ञ आणि प्रयोगशाळा शेवटी आपल्या आपणच तयार कराव्या लागतात. मनासमोर एखादा आदर्श ठेवून तुम्ही एखादी मोठी प्रयोगशाळा बांधू शकत नाही...

'टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च'चे उदाहरण घ्या. देशातील कोणत्याही राष्ट्रीय प्रयोगशाळेपेक्षा ही संस्था आज मोठी आहे. पण सतरा वर्षांपूर्वी ही संस्था स्थापन केली त्या वेळी ही संस्था कशाप्रकारे उभारावी याची एकही योजना आम्ही तयार केलेली नव्हती. आपणांला पदार्थविज्ञान आणि गणितात काही मूलभूत संशोधन करावयाचे आहे एवढेच आम्ही मनाशी ठरवलेले होते. या देशातील साधनसामग्री आणि गरजा यांचा समतोल साधत साधत ही संस्था उत्स्फूर्तपणे, झपाट्याने फोफावली. या संस्थेत काम करण्यासाठी आम्ही एखाद्या विद्यापीठातून वा परदेशांतून तयार शास्त्रज्ञ आणलेले नाहीत. त्यांपैकी बहुतेक लोक तरुण वयात साहाय्यक संशोधक म्हणून या संस्थेत कामाला लागले. भरपूर उमेदवारी करून त्या जागेवर चढले......या देशात शास्त्रज्ञ आणि शास्त्रीय संस्था कशा उभ्या कराव्यात, याबाबत या संस्थेपासून तुम्ही खूप काही नवे शिकू शकाल.

पक्षी काही पैसे दिले पाहिजेत. आज ब्रिटनमध्ये क्रिकेट संघसुद्धा अशी आचार-संहिता पाळतात. एखादा क्रिकेट खेळाडू जेव्हा दुसऱ्या संघाकडे जातो त्या वेळी त्याच्या मूळ संघाला असे हक्काचे पैसे मिळतात. पण प्रगत आणि अप्रगत राष्ट्रे केवढ्या समंजसपणे या गोष्टीकडे पाहतील त्यावर हे सारे अवलंबून आहे.

मात्र एक शिक्षणप्रेमी गृहस्थ म्हणून मला तुमच्या नजरेस एक वेगळीच गोष्ट आणावयाची आहे. एखाद्या राष्ट्रातील विद्यापीठे हीच अखेर त्या राष्ट्राची शक्ति-स्थाने असतात. आपल्या दुर्दैवाने अप्रगत राष्ट्रांना हे माहीत आहे. आपली विद्यापीठे उत्कृष्ट असावीत हाच त्या राष्ट्रांचा आग्रह आहे. पण उत्कृष्ट विद्यापीठ म्हणजे ग्लासगो व केंब्रिज विद्यापीठांची नक्कल असा काही समज त्या देशात पसरलेला आहे. **कोणतेही राष्ट्र विद्यापीठ वा शिक्षणक्रम कधी आयात करू शकत नाही. विद्यापीठ हे तुमच्या समाजजीवनाचा आवश्यक, अविभाज्य भाग म्हणून सहजपणे उभे राहावे लागते. भोवतालच्या समाजाची आजची तयारी आणि उद्याची गरज यांचा समन्वय या विद्यापीठांनी सहजपणे घालावयाचा असतो.** अनेक अप्रगत राष्ट्रांना याची जाणीव नाही, असे मला वाटते. घानाचे उदाहरण घ्या. गेल्या वर्षी मी घानात होतो. घानाच्या विद्यापीठांत इंग्रजी भाषा, ग्रीकचा इतिहास, फ्रान्सचा भूगोल, शेक्सपीअरची नाटके या गोष्टी शिकवल्या जातात. खरोखरच उत्कृष्टपणे शिकवल्या जातात. पण घानाची गरज आज केवढी वेगळी आहे. घानात आज स्वच्छ पाण्याचा दुष्काळ आहे. घाणेरडे रोगजंतुयुक्त पाणी प्यावे लागल्याने अनेक मुले कायमची आंधळी बनतात. रस्त्यावर कमालीची अस्वच्छता आहे. झोपडपट्टीची खरूज शहरांमधून फैलावत आहे. रोगराईच्या साथीला


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

खेड्यांतले लोक आजही जनावरांसारखे बळी पडतात. आणि होय! अशा वेळी त्या देशाच्या प्रमुख विद्यापीठांतून बायरनच्या कविता शिकविल्या जातात! त्या देशातील विद्यापीठांची जबाबदारी केवढी वेगळी आहे हे त्यांना अजूनही समजत नाही. या शिक्षणाचा आणखी एक भयावह परिणाम होतो. त्या विद्यापीठांमधून बाहेर पडणारे तरुण भाषा, ज्ञान, संस्कृती यांत सर्वसामान्य लोकांपासून अलग पडतात. आपल्याच लोकांत ते तरुण परके बनतात. दूर अमेरिका वा ब्रिटनमधील लोक या तरुणांना अनेक गोष्टींत जवळचे वाटतात. या देशांतील विद्यापीठांची आता पुनर्रचना झाली पाहिजे.

...मी वर जे काही सांगितले ते तसे खरे आहे. कोणाला पटेल, कोणाला पटणार नाही; पण एक गोष्ट मात्र खरी की, कोणत्याही कारणाने आपणांसमोरचे बुद्धिमान तरुणांच्या निर्यातीचे स्वरूप त्यामुळे बदलत नाही. त्या प्रश्नाची भयानकता आणि स्फोटकतापण कमी होत नाही.–अप्रगत गरीब राष्ट्रांना त्यांच्या उद्याच्या नेत्यांपासून, शास्त्रज्ञांपासून आणि प्रशासकांपासून आज वंचित केले जात आहे आणि ज्यांच्या चांगुलपणाबद्दल माझ्या मनात अजिबात संशय नाही, असे काही सभ्य, सुशिक्षित, सुसंस्कृत लोक या व्यवहारात सामील आहेत. ◻

## अजंठा-वेरूळ....... तुमची परंपरा

काल मी 'टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' पाहावयास गेलो होतो. प्रयोगशाळांच्याभोवती तेथे सुंदर वनश्री वाढवलेली आहे. खुद्द भाभांनी ती वनश्री लावली आणि जोपासली. आमच्याकडेपण संशोधन मंदिरांच्या बाहेर वनश्री असतेच. पण आमच्याकडे कोणी वनस्पतितज्ज्ञ नेमून आम्ही ते काम करतो. भारतात हे काम एका शास्त्रज्ञाने केले. जीवन आणि विज्ञान यांचा समन्वय साधावा असे भाभांना का बरे वाटत होते?......आज अजंठा आणि वेरूळची लेणी पाहताना या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले आहे. सौंदर्य आणि उपयुक्तता यांचा एक अद्‌भुत संगम येथे उभारलेला आहे...या देशाची प्राचीन परंपरा आणि विज्ञान या दोन गोष्टींचा या देशात झगडा होण्याचे खरोखर काहीच कारण नाही. कारण अजंठा आणि वेरूळ हीच तुमची प्राचीन परंपरा आहे.

**–डॉ. ब्रोनोवॅस्की**
**'सायन्स टुडे'ला दिलेली मुलाखत.**

............


फारसा गैरसमज करून घेऊ नकोस. आणखी दीड वर्षात माझी डॉक्टरेट पुरी होईल आणि मी लगेच भारतात परत येईन...



डॉ. आखाराम कचरे

५

आखाराम कचरे. सातारा जिल्ह्यातील एका खेड्यातील मुलगा. धनगर समाजात जन्मलेला. घराण्याच्याच तिहासात नव्हे, तर पंचक्रोशीतील साऱ्या धनगर समाजाच्या इतिहासात, आखाराम यानेच प्रथम हातांत पाटी-पेन्सिल घेतली. हातांत घेतलेल्या या पाटी-पेन्सिलीचे आखारामाने चीज केले. पुणे विद्यापीठाच्या बी. एस्सी. आणि एम्. एस्सी. परीक्षेत तो पहिला आला. त्यानंतर काही दिवस तो मुंबईला अणुशक्ती संशोधन केंद्रात काम करीत होता. तीन वर्षांपूर्वी अमेरिकेतील हवाई विद्यापीठाने त्याला डॉक्टरेट करण्यासाठी भली मोठी शिष्यवृत्ती बहाल केली. धनगरवाडीचा आखाराम कचरे गेली तीन वर्षे हवाईला आहे. भारतात असताना विद्यार्थी चळवळीपासून तो पंचक्रोशीतील ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करण्यापर्यंतची अनेक कामे तो हौसेने करीत असे. तीन महिने ग्रामपंचायतीचा सरपंच म्हणूनही त्याने काम केलंय ! गेली दोन वर्षे हवाई विद्यापीठातील ' इंडियन स्टुडंटस असोसिएशन'चा अध्यक्ष आणि ' आशियाई



स्टुडंटस असोसिएशन 'चा उपाध्यक्ष म्हणून तो काम करतोय. खोराना प्रकरणाच्या संदर्भात अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांना काय वाटते ते समजावे म्हणून मी त्याला पत्र पाठवले होते. माझ्या पत्राला कचरेचे लगेच उत्तर आले. कचरेचे ते पत्र मला जसेच्या तसे देण्याचा मोह होतोय. हा बहाद्दर माझा जवळचा मित्र, पण या साऱ्या पत्रात त्याने एक खासगी गोष्ट लिहिली असेल तर शपथ! मला त्याचे ते पत्र पाहून, नकळत 'माणूस 'च्या दिवाळी अंकातील राजूच्या पत्रांची आठवण झाली. आखारामने लिहिले होते...

## हजार फुले फुलू द्यात

...तुझे पत्र पोचले. लगेच उत्तर लिहावयास बसत आहे. अमेरिकेतील आम्हा भारतीय विद्यार्थ्यांना या साऱ्या प्रश्नाच्या संदर्भात काय वाटते एवढेच मी लिहिणार आहे. माझे विचार तुला विस्कळीत वाटतील. अनेकांना माझे विचार पटणारही नाहीत. पण मी जे काही लिहितो आहे ते अमेरिकेतील बहुसंख्य भारतीय विद्यार्थ्यांचे प्रातिनिधिक मत आहे, असे मला वाटते.

एक गोष्ट सांगतो, अमेरिकेत आलो असलो तरी महाराष्ट्रातील वर्तमानपत्रांशी आणि सामाजिक घडामोडींशी असलेला माझा संबंध मी सोडलेला नाही. खोरानांना नोबेल पारितोषिक मिळाले त्या वेळी मला वाटले होते, ना. यशवंतराव मोहिते यांच्या भाषणांनी महाराष्ट्रात जेवढी खळबळ माजली होती निदान तेवढी तरी खळबळ या बक्षिसामुळे उडेल. पण तसे काही घडले नाही. माझे पंजाबी मित्र म्हणाले, पंजाब मात्र या घटनेमुळे खूप अस्वस्थ झाला आहे. हॉकीमधील सुवर्ण पदक गमावल्याने जेवढा अस्वस्थ झालाय त्याच्याहून अधिक अस्वस्थ झालाय! मला वाटते शशांक मित्रांना हे पारितोषिक मिळाले तर बंगाल, आणि चंद्रशेखरना बक्षीस मिळाले तर मद्रासमध्ये अशीच अस्वस्थता माजेल. आपले राष्ट्रीयत्व आता

प्रांतीयत्वात विलीन झाले आहे !

...दोस्त ! मला वाटते आम्हा अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांबद्दल तुमच्या मनात बरेच गैरसमज आहेत. भारतातीलच नव्हे, तर आशियातल्याही बहुसंख्य तरुणांना मायभूमीला परत जावे असेच वाटते. अमेरिकन जीवनात संपन्नता, मुक्तता आणि स्वातंत्र्य या गोष्टी आहेत हे खरे, पण भारतातील घरगुती, प्रेमळ, दिलखुलास, भावनेचा ओलावा असलेले जीवन येथे दुर्मिळ आहे. पुन्हा मायभूमीची ओढ ही एक नैसर्गिक प्रवृत्ती असतेच. मी स्वतः तर सावरकरांची 'सागरा प्राण तळमळला' ही कविता अनेकदा गुणगुणत असतो. तू म्हणशील, हे सारे जर खरे आहे तर आमच्यापैकी अनेकजण अमेरिकेतच स्थायिक का होतात ? मला वाटते, याला तीन प्रमुख कारणे आहेत—

असे बघ. एखाद्या जुन्या वाड्यात, जुन्या आचारविचारात वाढलेल्या तरुणीला तुम्ही कॉलेजात पाठविलेत, तिच्यावर नव्या विचारांचे संस्कार केलेत, आणि त्यानंतर पुन्हा तिला तिच्या त्या जुन्या घरी, त्या जुन्या वाड्यात बुरख्याआड जाण्यास सांगितलंत तर तिची जी मानसिक अवस्था होईल, ती अवस्था भारतातील एखाद्या विद्यापीठात वा राष्ट्रीय प्रयोगशाळेत काम करताना आज माझी होईल. माझी ही उपमा वाचून तुला कदाचित हसू येईल. पण भारतात वरिष्ठ तुमच्या कामात केवढी ढवळाढवळ करतात, मानापमानाच्या त्यांच्या कल्पना केवढ्या वेगळ्या आहेत याचा अनुभव मी घेतलेला आहे. अमेरिकेत प्रत्येक तरुणाला काम करण्याची केवढी मोठी संधी आहे. संधी हा शब्द मी थोड्या वेगळ्या अर्थाने वापरतोय. प्रत्येक माणसावर माणूस म्हणून येथे केवढा प्रचंड विश्वास टाकला जातो. त्याच्या मार्गाने जाऊन त्याला चुकावयाचा अधिकार आहे हे मान्य केले जाते. कोणाच्या चुकीकडे रागाने वा सहानुभूतीने नव्हे तर मित्रत्वाच्या भावनेने पाहिले जाते. चीनने मागे 'हजार फुले फुलू द्यात' (Let a hundred flowers bloom.) म्हणून फसवी घोषणा दिली होती. भारतातपण आपण तशी घोषणा दिली. आपली घोषणा फसवी नव्हती, पण ती फसलेली आहे. 'हजार फुले फुलू द्यात' या शब्दांचा खरा अर्थ मला अमेरिकेत आल्यावर जाणवला. माणूस म्हणून मला केवढा मान आहे हे मला हवाई विद्यापीठात काम करताना पहिल्यांदा जाणवले. आपण मनापासून लोकशाही स्वीकारणार असलो तर आपली विद्यापीठे, राष्ट्रीय प्रयोगशाळा आणि इतरही ठिकाणची नोकरशाही यंत्रणा आपण झपाट्याने बदलली पाहिजे. हे करणार नसलो तर मुळातच खरे व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे काय हे तरुणांना न समजण्याची चीनसारखी खबरदारी आपण घेतली पाहिजे.

दुसरा मुद्दापण मोकळेपणाने मांडावयास हरकत नसावी. भारतात गेल्यावर स्वतःची गाडी, बंगला वगैरे गोष्टी असल्याच पाहिजेत, असल्या भंपक कल्पना

माझ्या माहितीपैकी कोणाच्याच मनात नाहीत. पण भारतातील उपलब्ध साधन-संपत्तीच्या मानाने तुलनात्मक दृष्टया आपणांला योग्य पगार आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, अशी बहुतेकांची रास्त अपेक्षा आहे. शालेय शिक्षण संपल्यापासूनच आपल्यापैकी बहुतेकांचे शिक्षण पोटार्थी असते. त्या वेळी नकळत माझ्या शिक्षणाचा संपूर्ण मोबदला (Full Return) मिळविण्याचा मला अधिकार आहे हे प्रत्येकाच्या मनावर बिबवले जाते. आणि शेवटी प्रत्येकाला आर्थिक स्थैर्य, प्रतिष्ठा (Material Security) पण हवी असते.

खोराना, साराभाई आणि भाभा यांची तुलना करणे म्हणूनच मला गैर वाटते. भाभा आणि साराभाई यांना भारतात फार मोठी Material Security होती. तेवढे आर्थिक स्थैर्य वाडवडिलांनी कमवून ठेवले असते तर खोरानापण भारतात परत आले असते ! मला या संदर्भात एक वेगळी तुलना करावीशी वाटते. खोराना, चंद्रशेखर, शशांक मित्रा हे अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी आले आणि चीनचा अणुबाँब बनविणारा शास्त्रज्ञ एक दिवस अमेरिकेतून चीनमध्ये पळून गेला. हे असे का घडले याचा मागोवा आपण घेतला पाहिजे. चीन आपला शत्रू असला तरी चीनच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्रांतीचा फार जवळून अभ्यास केला पाहिजे. चीनबद्दल अमेरिकन वृत्तपत्रांवरून कळते ते एवढेच, की चीनमध्ये आज शिक्षक आणि शास्त्रज्ञ हे परवलीचे शब्द आहेत. त्या लोकांना एक आगळी सामाजिक प्रतिष्ठा आहे......रात्री दहानंतर ज्यांना स्वत:चे नाव आठवत नाही असे भारतातील काही मंत्री मी जवळून पाहिले आहेत. त्या लोकांचा रुबाब, मान, प्रतिष्ठा पाहिली आहे. आमदार, व्यापारी, उसाचे बागाईतदार या लोकांना भारतात आज जी सामाजिक प्रतिष्ठा आहे तेवढीसुद्धा जर आपण शास्त्रज्ञ आणि शिक्षक यांना देणार नसलो तर ते लोक भारताबाहेर राहिल्यावर त्यांना दोष देण्यात काय अर्थ आहे ?

या वेळी तू बहुधा माझ्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेला आवाहन करशील ! पण माझी खरी तक्रार नेमकी तीच आहे. आज आपल्या देशात राष्ट्रीयत्व नावाची काही गोष्टच शिल्लक नाही आणि याला अमेरिकेत आलेले भारतीय विद्यार्थी काही जबाबदार नाहीत ! प्रांत आणि जात या दोन धाग्यांनी आपण गेली वीस वर्षे आपल्या लोकशाहीचे आणि राष्ट्रीयत्वाचे वस्त्र विणलंय ! मला एक सांग, राजस्थान, आसाम, बिहार, धनगरवाडी या ठिकाणच्या तरुणांनी बकाल आणि कंगाल जीवन जगण्यासाठी कलकत्ता आणि मुंबईची वाट धरावयाची हीपण एक अर्थाने त्या प्रदेशांच्या दृष्टीने ' स्थानिक ब्रेनड्रेनची 'च प्रक्रिया नाही काय ? आपल्या स्थानिक आणि प्रादेशिक नियोजनाचापण विचार व्हावयास नको काय ?

पण हा विषय वेगळा आणि मोठा आहे. तो बाजूला राहूदे. मी तुला दोन वेगळी

# नियमितपणें वापरल्यानें फोऱ्हान्स टूथपेस्ट हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालते

तरुण तसेंच वयस्कर लोकांकडून आलेली अनाहूत प्रशस्तीपत्रें हिरड्यांचे विकार व दंतक्षय यांना आळा घालण्यात फोऱ्हान्स टूथपेस्टला मिळालेल्या आश्चर्यजनक यशाची स्तुति करतात. ही प्रशस्ती पत्रें जेफ्री मॅनर्स ॲण्ड कं. लि. च्या कोणत्याहि कार्यालयात पहावयास मिळतील.

“मला दांतांच्या विकाराचा त्रास होत असे. मी आपली फोऱ्हान्स वापरू लागलो. आता मला दांतांचा कोणताच विकार नाही. सुमारे २० ते २५ लोक आधीची टूथपेस्ट बदलून फोऱ्हान्स वापरू लागले आहेत. आणि माझ्या कुटुंबात तर ती सर्वांची **अत्यंत** आवडती होऊन राहिली आहे.”

—उदयशंकर तिवारी, पाटणा.

“शास्त्रीय पद्धतीने बनविलेली आपली **फोऱ्हान्स टूथपेस्ट** गेली दहा वर्षे मी वापरीत असून तिच्यामुळे माझे **हिरड्यांचे** सर्व विकार दूर झाले. आता माझ्या कुटुंबातील सर्वजण **फोऱ्हान्स टूथपेस्टने** नियमितपणे दांत घासतात.”

—एस्. एम्. लाल, नवी दिल्ली.

## फोऱ्हान्स

## —दंतवैद्यानें निर्मिलेली टूथपेस्ट

दांतांची योग्य निगा राखण्यासाठीं फोऱ्हान्स टूथपेस्ट व फोऱ्हान्स दुहेरी कार्य करणारा टूथब्रश दर रात्रीं व सकाळीं वापरा... आणि आपल्या दंतवैद्याकडे नियमितपणें जात चला!




**मोफत! “दांतांची व हिरड्यांची निगा” नामक रंगीत पुस्तिका**

ही पुस्तिका आपल्याला मराठी, हिंदी अथवा इंग्रजीमधून मिळूं शकेल. त्याकरितां हे कूपन भरून (टपालखर्चासाठीं) १५ पैशांच्या स्टॅम्पसहित पुढील पत्त्यावर पाठवा: मॅनर्स डेन्टल ॲडव्हायझरी ब्यूरो, पोस्ट बॅग क्रमांक १००३१, मुंबई १.

नांव ____________________ वय ____

पत्ता ____________________

भाषा ____________________

54F-152 MR

साधी उदाहरणे देतो. नुकताच हवाईला परत आलेला माझा प्रधान नावाचा मित्र अगतिक होऊन सांगत होता. आपल्या भागातल्या एका विद्यापीठात त्याला रीडरच्या पोस्टसाठी साधे मुलाखतीलासुद्धा बोलावण्यात आले नाही.–जात ही गोष्ट आता, आपल्या विद्यापीठातसुद्धा जाऊन बसलीय. मेनन तर मध्यंतरी म्हणाला होता भारतात जावयाचे म्हणजे कलकत्ता किंवा मुंबईला जाऊन स्वतःला ' इंडू गुंडू ' म्हणून घ्यावयाचे, त्यापेक्षा हवाईला त्याला घरच्यासारखे वाटते. आता सांग, एखाद्या प्रांतात वा जातीत जर जास्त तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ निर्माण झाले आणि त्यांना भारतात हेटाळणीची वागणूक मिळते, म्हणून त्यांनी देश सोडला, तर त्यात तरी तशी काही फार मोठी चूक आहे काय ?

...फारसा गैरसमज करून घेऊ नकोस. आणखी दीड वर्षात माझी डॉक्टरेट पुरी होईल आणि मी लगेच भारतात परत येईन. कारण मी एक गोष्ट नक्की केलीय. शास्त्रज्ञ बनण्यापेक्षा परत आल्यावर मी समाजकारण आणि राजकारण या दोन गोष्टींत लक्ष घालणार आहे. पण ज्यांना शास्त्रज्ञ म्हणून स्वतःचा विकास करावयाचा आहे ते माझे मित्र, आजच्या परिस्थितीत अमेरिकेत स्थायिक झाले तर त्यात काही चूक नाही. ◻

## साभार स्वीकृत

### दैनंदिनी

१. चिमणलाल पेपर कंपनी, मुंबई
२. मॉडर्न पेपर स्टोअर्स, पुणे
३. स्वस्तिक रबर प्रॉडक्टस, मुंबई
४. स्वदेशी केमिकल्स प्रा. लि., मुंबई

### दिनदर्शिका

१. सोव्हिएट लँड पब्लिकेशन, मुंबई
२. स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई
३. चित्रशाळा प्रेस आणि प्रकाशन, पुणे
४. देसाई पटेल पेपर कंपनी, पुणे
५. मॉडर्न पेपर स्टोअर्स, पुणे
६. प्रोफीशियंट शॉर्टहँड टाइपराइटिंग इन्स्टिटयूट, पुणे
७. व्हिनस बुक स्टॉल, पुणे
८. अब्दुलभाई फिदाअल्ली अँण्ड कंपनी, मुंबई



........

अमेरिका आणि रशिया यांच्याकडे तुम्ही ज्या क्षणी निग्रहाने, तडफेने पाठ फिरवाल त्याच क्षणी चीनप्रमाणे तुम्हालाही हाच अनुभव येईल...




## डॉ. कृ. श्री. नरगुंद

## ६

भारताच्या स्वातंत्र्यलढयाच्या तप्त मुद्रेचा संस्कार ज्यांच्यावर झाला आहे, अशी काही अस्सल नाणी अजूनही अधेमधे आपल्या आढळात येतात. आजकालच्या व्यवहारातल्या चलनी नोटांना या नाण्यांचे तेज, झळाळी, खरेपणा आणि खणखणीत आवाज सहन होऊ शकत नाही आणि या बावनकशी मुद्रांकित नाण्यांनाही त्याची पर्वा नसते. स्वतःची आणि भोवतालच्या चलनी नोटांची किंमत ही नाणी मनोमन ओळखून असतात. डॉ. नरगुंद हे एक असले 'असली' नाणे. भारतातील हा ज्ञानवृद्ध आणि वयोवृद्ध शास्त्रज्ञ स्वातंत्र्य लढयात तावूनसुलाखून निघालेला. आपल्याच कार्यात आणि तंद्रीत तृप्त आणि मस्त असलेला.

डॉ. नरगुंदांनी आता वयाची सत्तर वर्षे ओलांडली. पण या शास्त्रज्ञाची ठणठणीत प्रकृती आणि कामाचा उरक पाहिल्यावर ही गोष्ट कोण खरी मानील ? कोणत्याही दिवशी जा, हा माणूस सकाळी दहा ते रात्री दहापर्यंत स्वतःच्या प्रयोगशाळेत आढळेल. या वयात एका छोटया प्रयोग-



शाळेत हा शास्त्रज्ञ दहा-दहा विद्यार्थ्यांना डॉक्टरेटसाठी मार्गदर्शन करतोय. डॉक्टरांनी विज्ञानक्षेत्रात हिमालयाएवढे काम केले आहे, यावर विश्वास बसणार नाही तुमचा. हा काही क्रिकेटचा धावफलक नव्हे. या शास्त्रज्ञाने नाबाद शतक झळकवलंय. डॉ. नरगुंदांच्या हाताखाली संशोधन करून उच्च पदवी वा डॉक्टरेट मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या एकशेपाच आहे ! माझ्या माहितीतील इतर कोणत्याही शास्त्रज्ञाने असली अफलातून शंभरी गाठलेली नाही. नजीकच्या काळात कोणी गाठतील असेही वाटत नाही.

डॉक्टरांना भेटावयास आलेला कोणीही परकीय शास्त्रज्ञ त्यांना पहिल्या भेटीत ओळखू शकत नाही. तो त्यांच्याकडे चौकशी करतो, डॉ. नरगुंद कुठे आहेत याची. खादीची गोल झालेली पँट, त्यात घाईघाईने खोचलेला खादीचाच शर्ट, गळ्यात लटकवलेली शबनम, हा डॉ. नरगुंदांचा वेश आहे. कपडे संपूर्ण खादीचे. त्यातही हातघुलाईचे. त्या कपड्यांना इस्त्री वगैरे अंथरुणाखाली ठेवून केलेली ! ...आणि हा माणूस म्हणे तीस साली लंडन विद्यापीठाची डॉक्टरेट मिळवून आलाय ! भारतातला श्रेष्ठ शास्त्रज्ञ आहे ! वाटते, वेश असावा बावळा म्हणून सांगणाऱ्या रामदासांनाही हा माणूस सहज दोन–तीन टिप्स देईल !

तरुण वयात या शास्त्रज्ञाने बेहोषीत स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली. तुरुंगवास, खेड्यात जाऊन ग्रामोद्धार या गोष्टी मग आल्याच. त्याच वेळी डॉक्टरांनी संपूर्ण स्वदेशीचे व्रत स्वीकारले. बाहेर कार्यक्रमाला जाताना खादी वापरणे त्या मानाने तसे सोपे. संपूर्ण स्वदेशीचे व्रत घेणे महाकठीण. ती सांबाची पूजा. अनेक फायदे मिळवून देणारी. पण येऱ्यागबाळ्याचे ते काम नव्हे. हे व्रत डॉ. नरगुंद निष्ठेने चालवताहेत. स्वतःच्या प्रयोगशाळेत वापरली जाणारी रसायने आणि उपकरणे पण देशीच असावीत, हा त्यांचा आग्रह. महाग परदेशी औषधे घेण्यापेक्षा लंघनाने,

प्राणायामाने आणि योगासनाने माणूस बरा होतो, हे या ठणठणीत प्रकृतीच्या वृद्ध शास्त्रज्ञाचे ठणठणीत मत. हे सारे एक वेळ ठीक आहे. पण या शास्त्रज्ञाच्या घरात तुम्हांला साधा रेडिओ आढळणार नाही. रेडिओमधील शंभर टक्के भाग भारतीय असेपर्यंत त्यांना रेडिओ घरात ठेवावयाचा नाही. संतवाङमय, गीतेचे तत्त्वज्ञान आणि पातंजल योगशास्त्र हे यांच्या अभ्यासाचे विषय. योगासने आणि प्राणायाम हा दररोजचा व्यायाम !

सज्जन आणि सत्प्रवृत्त माणसाला आयुष्यात जे जे भोगावे लागते, ते ते सारे डॉक्टरांनी भोगलंय. एखाद्या शास्त्रज्ञाच्या कार्यात काही चुका राहणे ही काही विज्ञानक्षेत्रात नवी गोष्ट नाही. तीस वर्षांपूर्वी भारतातील उपलब्ध परिस्थितीत तर ते सहजशक्य होते. पण सॅन्टोनीन प्रकरणाच्या वेळी जे वादळ उठविण्यात आले होते, ते पाहिले की, लोकमान्य टिळकांनी भोगलेल्या ताईमहाराज प्रकरणाची आठवण होते. नवल एवढेच, या प्रकरणानंतरही डॉक्टरांचा माणसाच्या सदसद्विवेक-बुद्धीवरचा विश्वास तिळमात्र उडाला नाही. त्यांच्या आचारविचारांत थोडीही कटुता आली नाही. फक्त नेहमीपेक्षा थोडया अधिक गतीने ते आपल्या संशोधनात मग्न राहिले. नरगुंदांना त्या वेळी हिणवणारे त्यांचे सहप्रवासी केव्हाच सेवानिवृत्त झालेत. आणि इकडे डॉ. नरगुंद मात्र तरुणांनी हबकून जावे, अशा गतीने संशोधन करताहेत !

आपला महाराष्ट्र तसा गुणग्राहक आहे ! एखाद्याने चार कविता केल्या तर आपण त्याला महाकवी म्हणतो. कोणी दोन टीकालेख लिहिले तर आपण त्याचा विचार-वंत म्हणन सत्कार करतो. कोणी एखादे नाटक लिहिले तर त्याच्यावर तर वृत्त-पत्रांतून चक्क अग्रलेख येतात. पण डॉ. नरगुंदांनी वयाची सत्तरी ओलांडली, त्या वयात, त्यांच्या मार्गदर्शनाखाली शंभराव्या विद्यार्थ्याने डॉक्टरेट घेतली ! या देशात ही केवढी अद्‌भुतरम्य चित्तथरारक गोष्ट. त्या वेळी त्यांचा सत्कार वगैरे दूरच्या गोष्टी, मराठी वृत्तपत्रांतून त्यावद्दल एक साधी ओळ आली नाही. आणि हे सारे डॉ. नरगुंद 'विले इ पारल्या 'सारख्या गुणग्राहक मराठी नगरीत गेली दहा वर्षे स्थायिक झाले असताना घडले ! आणि मला प्रामाणिकपणे वाटते, हे सारे असे घडले, त्याला फक्त डॉक्टर नरगुंदच जबाबदार आहेत. माणसाने स्वतःवद्दल बोलू नये, त्याच्याजवळ विनय असावा हे सारे खरे. पण त्यालाही काही मर्यादा असाव्यात की नाही ! डॉ. नरगुंदांना अनेक देशी आणि परदेशी भाषा येतात. मराठी, गुज-राथी आणि कन्नड या तीन तर त्यांच्या मातृभाषा वाटतात. पण या भाषासंपन्न माणसाजवळ स्वतःबद्दल बोलावयास एक शब्द नसावा ! स्वतःबद्दल बोलावयाचे म्हटले की, आपले तोंडाला कुलूप.

ना खंत ना खेद या भूमिकेवर डॉ. नरगुंद आज उभे आहेत. 'उरलो संशोधना-

पुरता ' ही त्यांची जीवनविषयक भूमिका आहे. डॉ. नरगुंदांना भेटावयास आलो त्या वेळी हे सारे मनात होते. गांधी आणि रामदास यांच्या तत्त्वज्ञानावर पोसलेला हा शास्त्रज्ञ काही मुलखावेगळे सडेतोड विचार ऐकवणार याची खात्री होती, आणि माझा हा होरा चुकला नाही. मी मुलाखतीसाठी गेल्यावर, नेहमी फार कमी बोलणाऱ्या या कृतिशूर शास्त्रज्ञाची वाणी अस्खलितपणे वाहू लागली...

## मी पण अस्वस्थ झालो आहे......

या गरीब अप्रगत देशातील तरुण तंत्रज्ञ आणि शास्त्रज्ञ मोठ्या प्रमाणावर आज परदेशांत स्थायिक होण्यासाठी निघून जाताहेत. खोराना प्रकरणाच्या संदर्भात काही जणांच्या ही गोष्ट लक्षात आली. लॉर्ड बोडेनसारख्या पाश्चात्य शिक्षणतज्ज्ञाने मध्यंतरी या प्रश्नाला वाचा फोडली. परवाच्या ' सायन्स काँग्रेस 'मध्ये इंदिरा गांधींनी हेच सांगितले. आजकाल या अशा काही घटना घडल्या, उच्च पदस्थ लोकांनी काही सांगितले तर आपण एखादा प्रश्न अस्तित्वात आहे हे मान्य करतो. खरे पाहता हा प्रश्न तसा खूप जुना आहे. परदेशांत जाणारे फारच थोडे तरुण ' व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी ' परदेशांत जातात. बहुतेकांच्या बाबतीत परदेशांतले फार मोठे पगार हे त्यामागचे एकमेव कारण असते. या अप्रगत देशाला या ना त्या स्वरूपात त्यांच्या बुद्धिमत्तेची जरुरी असताना हे तरुण परदेशांत स्थायिक होण्यासाठी जाताहेत, ही यातील अस्वस्थ करणारी गोष्ट आहे.

या प्रश्नावर वरवरची अशी दोन सोपी उत्तरे सुचविली जातात. परदेशांत स्थायिक होण्यासाठी जाणाऱ्या तरुणांवर संपूर्ण बंदी घाला हा त्यांपैकी पहिला उपाय आहे. लॉर्ड बोडेनसारख्या लोकशाहीप्रेमी माणसाने हा उपाय सुचवला. तो म्हणतो, अप्रगत देशांनी खुशाल ' बर्लिनच्या भिंती ' उभाराव्यात. माझ्या मते आपणांसमोर जर तेवढाच उपाय असेल तर आपणही तो उपाय जरूर योजला पाहिजे. सक्ती नसावी, व्यक्तिस्वातंत्र्य असावे हीच शेवटी माझी जीवननिष्ठा आहे. पण व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे काही राष्ट्रहिताला तिलांजली देणे नव्हे. घटनेप्रमाणे हे करता येईल की नाही हे मी कसे सांगू ? मी काही कायदेपंडित नाही. पण अत्यावश्यक असेल तर घटना बदलता येते एवढे मला माहीत आहे. आणीबाणीच्या काळात राष्ट्रपती वटहुकूम पण काढू शकतात. तरुणांची इच्छा नसताना त्यांना देशात डांबून ते काही काम करतील का, असा प्रश्न या संदर्भात विचारला जातो. माझ्या मते हा प्रश्न तितकासा बरोबर नाही. दोर कापल्यावर पळणारे सैनिक लढतात हा तर आपला इतिहास आहे. समजा, त्यातील काही तरुण दुःखीकष्टी होतील, ते काही आजन्म तसे राहू शकणार नाहीत. काही दिवसांनी आपोआप कामाला लागतील. आणि ते तरुण कामाला लागले नाहीत तरी त्यांच्या मागोमाग येणारे

तरुण नक्कीच कामाला लागतील. कारण लहानपणापासूनच या देशात, आणि फक्त या देशातच आपणांला काम करावयाचे आहे हे त्यांना माहीत असेल.

या प्रश्नावर आणखी एक सोपा वरवरचा उपाय सुचविला जातो. एखादा तरुण परदेशांत स्थायिक होण्यासाठी निघून जातो, त्या वेळी देशाने त्याच्या शिक्षणावर खर्च केलेली साधनसामग्री वाया जाते. त्यामुळे त्या तरुणाकडून डॉलर्सच्या स्वरूपात खंडणी घ्यावी असा तो विचार आहे. हा उपायही माझ्या मते तसा वाईट नाही. निदान देशाला तेवढे पैसे तरी मिळतील ! मात्र परदेशांत जाणाऱ्या तरुणांकडून डॉलर्सच्या स्वरूपात पैसे घ्या असे ज्या वेळी तुम्ही म्हणता त्या वेळी नकळत तुम्ही एक गोष्ट मान्य करून जाता. परदेशांत जाणारे तरुण आणि तुम्ही एकाच पातळी-वर उभे आहात हे तुम्ही मान्य करता. त्या तरुणांच्या मनात डॉलर्सबद्दल जे प्रेम आहे तेच तुमच्याही मनात डॉलर्सबद्दल आहे. या देशाच्या भवितव्याचा विचार करताना ' डॉलर्स ' या शब्दाची मोहिनी तुम्हांला तरी का पडावी ? खरे सांगू, कोणत्याही खोटया आदर्शांनी, वेडया कल्पनांनी आपल्या देशातील सारे वातावरण आज डहुळलेले आहे. गोष्टीतला तो पुंगीवाला आठवतो तुम्हांला ? तो पुंगीवाला पुंगी वाजवत निघाला. आणि गावातील सारी मुले त्याच्या मागोमाग नदीकडे निघाली. पुंगीच्या तालावर नदीकडे चाललेल्या त्या मुलांच्या मार्गात भिंत उभारा म्हणून काहीजण सांगताहेत. काहीजण त्या मुलांच्या हातातील खाऊ काढून घ्या आणि मग त्यांना जाऊ देत म्हणून सांगताहेत...

खोरानां भारतात संधी नाही, पगार नाही म्हणून अमेरिकेत निघून गेले आणि ' रामन 'सारखा शास्त्रज्ञ मोठ्या पगाराची सरकारी नोकरी सोडून भारतात एका छोटया प्रयोगशाळेत कामाला लागला. दोन पिढयांत एवढा फरक का पडला याचा विचार आपण केला पाहिजे. काही मूल्ये प्रयत्नपूर्वक रुजवावी लागतात. रुजलेली मूल्ये डोळयांत तेल घालून जपावी लागतात. आणि आपल्याकडे उभी असलेली मूल्ये आणि गोष्टी भुईसपाट करावयास आपण जणू प्रतिज्ञाबद्ध आहोत. असे पाहा, परदेशांत गेलेल्या तरुणांवर तुम्ही आज चिडता. पण ' तरुणांनो खेडयांत चला' या घोषणेची पण आपल्यापैकी अनेकांनी एकदा अशीच टर उडविली होती. त्या वेळीच त्या मंत्राचा अर्थ समजावून घेतला असतात आणि दिला असतात तर आज ही पाळी आली नसती. खेडयांतून शहरांत आलेल्या माणसाला परत खेडयात जाण्यास लाज वाटते. न्यूयॉर्क, लंडन, पॅरिसला राहून आलेल्या तरुणांना जर पुन्हा मुंबईला परत येण्याची लाज वाटली तर त्यात त्या तरुणांची काय चूक आहे ? जीवनाचा अर्थ मनावर बिंबवणारी एखादी यंत्रणा नसेल, तसे वातावरण नसेल, मूल्याची टिंगल उडविण्यात जर मजा वाटत असेल, तर याहून कोणत्या वेगळ्या घटनांची आपण अपेक्षा करू शकू ?

शास्त्रज्ञ म्हणून मला तुम्हांला एक वेगळी गोष्ट सांगावयाची आहे. ज्या पद्धतीने आणि गतीने आपण तरुणांना शिक्षणासाठी परदेशांत पाठवितो आहोत त्याचाही आपण आता पुनर्विचार केला पाहिजे. ज्ञान कोठलेच वाईट नाही. मी पण लंडन विद्यापीठाचा डॉक्टरेट आहे. पण आज अमेरिकेत जे शिक्षण देतात त्याची आज आपल्या देशात खरो-खरच जरुरी आहे का? आज अमे-रिकेत 'पुश बटन रिसर्च' सुरू आहे. ते ज्ञान मिळवून आलेले शास्त्रज्ञ भारतातल्या साधनसामग्रींनी आणि प्रश्नांनीच गोंवळून जातात. आप-ल्याच देशात ते शास्त्रज्ञ परके बन-तात. परकीय देशांत राहून आलेल्या सैनिकांना तुम्ही 'ब्रेनवॉश' देता. अमेरिकेतून भारतात आलेल्या शास्त्र-ज्ञांना आज भारतात कामावर घेण्या-पूर्वी असा 'ब्रेनवॉश' दिला पाहिजे. आणि हे सारे करण्याऐवजी आपल्या तरुणांना आपण आज देशातच शिक्षण दिले तर काही बिघडणार नाही. खरी अडचण अशी आहे की, दोन्ही वेळ अमेरिकन गहू खात असल्यामुळे, आपणा कोणाच्याच मनातील साहेबा-बद्दलचे प्रेम अजून कमी झालेले नाही!

## दोर खुशाल कापून टाका.....

म्हणून माझ्या मते खोराना आणि परदेशांत पळणारे तरुण हे काही शेवटी खरे प्रश्न नाहीत. ते प्रश्नही वरवरचे आहेत. फक्त वरची लक्षणे

## माओच्या चीनमध्ये हे घडते

परगावी शिकावयास गेलेल्या मुलांवर वडिलांचे जेवढे संपूर्ण लक्ष असले पाहिजे, तेवढेच लक्ष राष्ट्राने परदेशांत शिक्षण घेणाऱ्या आपल्या तरुणांच्यावरही ठेवले पाहिजे. ते तरुण परत आल्यावर त्यांचे आचार, विचार, सवयी, शिक्षण देशाला भारभूत ठरणार नाहीत, हे डोळ्यांत तेल घालून पाहिले पाहिजे. निदान माओला असे वाटते. रशियामध्ये उच्च शिक्षणासाठी पाठविलेल्या चिनी तरुणांची ही गोष्ट. त्या तरुणांनी सकाळी दूध प्यावे आणि संध्याकाळच्या जेवणानंतर फळे खावीत म्हणून त्यांना चिनी सरकार एक वेगळी रक्कम देत असे. काही तरु-णांनी दूध व फळे न घेता ती रक्कम साठविली. त्या पैशांतून एक रेडिओ विकत घेतला. रशियामधील चिनी वकि-लातीने ही गोष्ट चीनच्या शिक्षण खात्याला कळविली. त्यानंतर रेडिओ विकत घेतलेल्या त्या तरुणांना शिक्षण बंद करून चीनमध्ये परत बोलावण्यात आले. त्यांना समज देण्यात आली. '...तुमची प्रकृती उत्कृष्ट राहावी म्हणून तुम्हांला दूध घेण्यासाठी ती रक्कम देण्यात येत होती. या देशाला परवडत नसताना ती देण्यात येत होती. रेडिओची तुम्हांला काहीच जरुरी नाही आणि या असल्या सवयी बरोबर घेऊन आलेले तरुण चीनच्या महान क्रांतीला भारभूत ठरतील–'

आहेत. खरे दुखणे खूप वेगळे आहे. खूप खोलवर रुजलेले आहे. त्या दुखण्याच्या मुळाशी जाण्याची जर आपली तयारी नसेल तर वेगवेगळ्या संदर्भात आणि वेगवेगळ्या प्रकारे या गोष्टी आपणांला पुन्हा पुन्हा सतावतील. खरे कारण असे आहे की एका चुकीच्या मार्गाने आपण आज खूप पुढे आलो आहोत. रासायनिक उद्योगधंदे आज या देशात खूप प्रगतिपथावर आहेत. रसायनशास्त्रज्ञ म्हणून मला त्याचा अभिमान वाटला पाहिजे. पण मी तुम्हांला एक वेगळीच गोष्ट सांगू इच्छितो. रसायन शास्त्रज्ञ म्हणून सांगू इच्छितो.—या साऱ्या वाळूत उभारलेल्या इमारती आहेत. उद्या युद्ध सुरू झाले तर पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे हे सारे कारखाने जमीनदोस्त होतील. 'आधी कळस मग पाया' अशा काही विचित्र पद्धतीने आपण प्रगती केली आहे. त्यातही मजेची गोष्ट अशी, की कळस बांधून झाल्यावरही पाया बांधण्याचा प्रयत्न आपण केलेला नाही. माझा टेरिलीनला विरोध नाही. मलाही टेरिलीन वापरावयास आवडेल. पण टेरिलीनसाठी वापरले जाणारे मूलभूत रासायनिक पदार्थ जर परदेशांतून आणावे लागत असतील तर टेरिलीन वापरणे आज पाप आहे हे तुम्हा तरुणांच्या मनावर कोणीतरी बिंबवले पाहिजे. एक टेरिलीनच नव्हे, तर झाडून साऱ्या अत्यावश्यक आणि अनावश्यक वस्तूंच्या उत्पादनामागची ही शोकांतिका आहे. परदेशांतील आयात थांबली तर उद्या आपण औषधे बनवू शकणार नाही. तुमचे खत वनविणारे कारखाने द्रवरूप अमोनियासारखे साधे पदार्थ परदेशांतून आणले नाहीत तर बंद पडतील. सुताने स्वर्गात जाणारा म्हणून तुम्ही त्या म्हाताऱ्याला हसलात. पण शेवटी सुताच्या मागे जे तत्त्वज्ञान होते, त्या तत्त्वज्ञानानेच या देशात स्वर्ग निर्माण करता येईल.

मला तर आज एक वेगळीच शंका येते. एक शेतकी शास्त्रज्ञ मध्यंतरी म्हणाला होता, 'अमेरिकन शेतकरी आज बाजारपेठ म्हणून भारतावर अवलंबून आहेत. ही बाजारपेठ हातची गेली तर ते शेतकरी अस्वस्थ बनतील. त्या शेतकऱ्यांची समजूत कशी घालावयाची ही एक मोठी समस्या अमेरिकन सरकारसमोर उभी राहील.' शेतीबद्दल मला काही फारसे माहीत नाही. पण माझ्या मते आज रासायनिक उद्योगधंद्यात अशी परिस्थिती असावी. आपल्याकडे बनणाऱ्या अनेक चैनीच्या वस्तू आणि काही ठिकाणचे मूलभूत संशोधन ही अमेरिकेतील रासायनिक उद्योगधंद्यांपुढील एक प्रमुख बाजारपेठ आहे. वरवर विश्वास न बसणारी ही गोष्ट माझ्या मते शेवटी खरी आहे. ते लोक आज तुमच्यावर अवलंबून आहेत! तुम्ही चंद्राच्या मागे गेलात तर चंद्र पुढे पुढे पळत असतो. पण ज्या वेळी तुम्ही त्याच्याकडे पाठ फिरवता त्या वेळी तो तुमच्यामागे येतो. अमेरिका आणि रशिया यांच्याकडे तुम्ही ज्या क्षणी निग्रहाने, तडफेने पाठ फिरवाल, त्या क्षणी चीनप्रमाणे तुम्हांलाही हाच अनुभव येईल.

म्हणून मला तुम्हा तरुणांना एक वेगळा धाडसी उपाय सुचवावयाचा आहे. हे गांधी जन्मशताब्दीचे वर्ष आहे. गांधीबाबांचे पुतळे कोठे आणि कसे उभारावयाचे ही चर्चा आता खूप झाली. गांधींची आठवण ठेवावयाची असेल तर निदान पुढच्या वर्षी या भूमीवर एक परकी गोष्ट येऊ देणार नाही अशी प्रतिज्ञा करा. हे करून तुम्ही गांधींना काही फार मोठी श्रद्धांजली वाहणार आहात असे नव्हे ! केव्हातरी युद्धाच्या तडाख्यात हे घडणारच आहे ! त्याचा निदान अनुभव तरी घ्या. कोणी सांगावे, त्या अनुभवातून तुम्ही तरुण काही अफलातून महत्त्वाच्या गोष्टी शिकून जाल. तुमच्या मनावर काही वेगळे संस्कार होतील. या देशातील तरुण शास्त्रज्ञांच्या बुद्धिमत्तेबद्दल मला प्रचंड विश्वास आहे. शक्यता आहे, तुमचे तरुण शास्त्रज्ञ झपाट्याने या गोष्टी देशामध्ये बनविण्याचे तंत्र शोधून काढतील. चीनमध्ये तसे घडले आहे. पण समजा, तसे जमणार नसेल, तर मग त्या गोष्टींशिवाय भागवून घ्यावयास तरुणांना शिकावे लागेल. पण या देशात हे कोणी करील असे वाटत नाही. आपणांकडे अजून शंभर टक्के रेडिओ बनलेला नाही आणि आपण टेलिव्हिजन आणण्याच्या गोष्टी करतोय. आणि हे सारे पुन्हा गांधीबाबांचे नाव घेऊन चाललंय!

## अजूनही तीच परिस्थिती कायम आहे . . .

गोष्ट तशी जुनी आहे. मी त्या वेळी अहमदाबादला होतो. विक्रम साराभाई त्या वेळी माझा विद्यार्थी होता. साराभाई यांनी उद्योगधंद्यांना मार्गदर्शन करण्यासाठी भल्या मोठ्या पगारावर दिल्लीचा एक रसायनशास्त्रज्ञ आणला होता. अहमदाबादला आल्यावर तो शास्त्रज्ञ मला लगेच भेटायला आला. त्या तरुण शास्त्रज्ञाचे ज्ञान पाहून मी पहिल्याच भेटीत हबकून गेलो ! त्याला रसायनशास्त्राची काही छदाम माहिती नव्हती. साराभाईसारख्या व्यवहारदक्ष माणसाने याला कसे नेमले याचे मला आश्चर्य वाटले. तरुण साराभाईला मी याचे कारण विचारले. तो म्हणाला, " मला काही माहीत नाही. माझ्या वडिलांकडून अशी चूक होणार नाही. पण मी त्यांना कल्पना देतो. " दुसऱ्या दिवशी तरुण विक्रम म्हणाला, " वडिलांना त्या शास्त्रज्ञाच्या ज्ञानाची पूर्ण कल्पना आहे ! पण आमच्या कारखान्यासाठी आवश्यक असलेले परवाने दिल्लीचा एक अधिकारी देतो. त्याला प्रत्यक्षात काही पैसे देणे बरोबर नाही. हा शास्त्रज्ञ त्याच्या बायकोचा भाऊ आहे. त्याला नोकरी देणे आवश्यक आहे..." या राज्याला ' परमिटराज ' म्हणणारे राजाजी काही वेडे नाहीत. अजूनही तीच परिस्थिती कायम आहे. थोडया वेगळ्या स्वरूपात कायम आहे. या देशात तरुण शास्त्रज्ञांना नोकऱ्या नसताना, एकच शास्त्रज्ञ अनेक उद्योगधंद्यांना मार्गदर्शक म्हणून काम करतो. राष्ट्रीय प्रयोगशाळेचे प्रमुख आणि विद्यापीठातील विभाग प्रमुख, अगदी सहजपणे हे मार्गदर्शकाचे काम स्वीकारतात. या अनेक कामांमुळे ते तरुण शास्त्रज्ञ कोणतेच काम व्यवस्थित करू शकत नाहीत. विद्यापीठांतील

प्राध्यापक जेव्हा हे काम स्वीकारतात त्या वेळी त्यांचे व त्यांच्या विद्यार्थ्यांचे संशोधन बाजूला राहते. त्यांच्या विद्यार्थ्यांना ही अवांतर कामेच खूपदा करावी लागतात राष्ट्रीय प्रयोगशाळेचे प्रमुखपद ही तर केवढी जबाबदारीची गोष्ट आहे. चोवीस तास हे लोक आपल्या कार्यात मग्न पाहिजेत. या लोकांना ही कामे करावयास वेळ मिळतो कसा? त्यांना जर ही इतर कामे करावयास वेळ मिळत नसेल तर हे व्यवहारदक्ष कारखानदार त्यांना नेमतात का?—चौकशी केलीत तर बहुतेक ठिकाणी तुम्हांला मला विक्रमने दिलेले उत्तरच ऐकावयास मिळेल. या शास्त्रज्ञांनी ही इतर अवांतर कामे थांबविली, तर त्यांचे अंगीकृत कार्य ते शास्त्रज्ञ उत्कृष्टपणे पार पाडतील आणि इतर तरुण शास्त्रज्ञांनाही नव्या नोकऱ्या मिळतील.

मला कोणालाही दुखवावयाचे नाही. पण कोणी दुखावले जातील म्हणून मी सत्य सांगताना कचरण्याचेही काही कारण नाही. भारतातील तरुण शास्त्रज्ञांच्या बुद्धिमत्तेचा मला हेवा वाटतो. ते खूप खूप हुशार आहेत. कोणत्याही रशियन वा अमेरिकन शास्त्रज्ञांएवढे हुशार आहेत. त्यांपैकी काहीजण आज राष्ट्रीय प्रयोगशाळांचे प्रमुख आहेत. काही प्रमुख विद्यापीठांत विभागप्रमुख आहेत. तशी लहान वयात त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी आलेली आहे. आणि विश्वासाने सांगतो, हे काम पेलवेल एवढे कर्तृत्व त्यांच्याकडे निश्चित आहे. पण मग पुन्हा आपण प्रथम पाहिलेलीच अडचण आहे. मूलभूत निष्ठांत हे लोक कोठेतरी कमी पडताहेत. पसा जरूर हवा. पण पैशाचा मोह सुटू नये. स्वतःच्या अंगीकृत कार्याकडे दुर्लक्ष होऊन ती हाव सुटू नये. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे, एकदा या पदावर आल्यावर या लोकांचे कार्य थंडावते आहे. यांपैकी बहुतेक लोक वर्षातून सहा महिने मुक्कामावर नसतात. असतात, त्या वेळीही तीन-चार तासांहून अधिक वेळ स्वतःच्या प्रयोगशाळेत नसतात, ही गोष्ट सत्य आहे. विज्ञान जगात फेरफटका मारावयास तुमचा बातमीदार पाठविलात तर तो हाच अहवाल पाठवील. ही गोष्ट आपण सहन करता कामा नये. राष्ट्रातील अत्यंत हुशार, खूप कर्तबगार, असे शास्त्रज्ञ आज अशाप्रकारे वयाच्या पन्नाशीतच सेवानिवृत्त होताहेत! आपल्या राष्ट्राच्या दृष्टीने खरा 'ब्रेनड्रेन' वा 'ब्रेनरस्ट' हा आहे! त्यामुळे राष्ट्रीय प्रयोगशाळांचे प्रमुख आणि विद्यापीठांतील विभाग प्रमुख यांच्या नेमणुकांबाबत आपण आज अमेरिकन पद्धत स्वीकारली पाहिजे. या लोकांच्या एकूण कामाविषयी एक सक्तीची आचार-संहिता पण हवी.

## हे तर यक्षप्रश्न आहेत...

आपल्या प्राचीन परंपरा आणि सर्वश्रेष्ठ विज्ञान यांचा समन्वय आपण कसा साधणार हा एक अवघड प्रश्न आहे. जुन्यातले टाकाऊ टाकून देत असतानाच जे चांगले आहे ते प्रयत्नपूर्वक, आग्रहपूर्वक जपावयाचे आहे. हे खरोखर कठीण काम

आहे. हे काम केवढे अवघड आहे हे तुम्हांला समजावे म्हणून सांगतो. मी संत-वाङ्मय आवडीने वाचतो. पण आपल्या धर्मग्रंथांत सांगितला आहे त्या स्वरूपात मी परमेश्वर स्वीकारू शकत नाही. अगदी गांधी-विनोबांनी त्या रूपात परमेश्वर पाहिला असेल, तरी मी ते मान्य करू शकणार नाही. परमेश्वर असलाच तर तो जास्तीतजास्त ' इलेक्ट्रॉन 'च्या स्वरूपात असेल. विज्ञाननिष्ठ माणूस म्हणून मी यापेक्षा आणखी काहीएक स्वीकारू शकणार नाही. दुसरी गोष्ट सांगतो. मी शाकाहारी माणूस आहे. हिंसा मला आवडत नाही. गाय हा तसा माझाही प्राचीन वारसा आहे. पण आज भाकड गाय कापलीच पाहिजे हे मी वैज्ञानिक सत्य म्हणून स्वीकारतो. खरे पाहता शास्त्रज्ञांच्या दृष्टीने गायीची हत्या थांबविणे काही फार कठीण नसावे. एखाद्या शास्त्रज्ञाने काही काळ काम केले तर तो एखादे रसायन शोधून काढील. ते रसायन गायीच्या अंगात घातलेत तर गाय जिवंत राहील. पण गायीचे मांस खाणारा माणूस मरेल. या एका शोधामुळे गायींची हत्या लगेच थांबेल पण त्या भाकड गायी मग गोठ्यांत तडफडून मरतील. त्यांना घालावयास आपणांकडे वैरण नसेल. जीवनात विज्ञान स्वीकारावयाचे म्हणजे केवढी तडजोड करावी लागते हे तुम्हा तरुणांना समजावे म्हणून सांगितले. फार प्रयत्नांनी मला हे जमले. पण हे साऱ्यांनाच जमेल असे नव्हे. भगवंतमसारखा शास्त्रज्ञ श्रीसत्यसाईबाबांच्या जादूच्या प्रयोगांना हजर असतो तेव्हा मला त्याचा राग म्हणून येत नाही. त्याची कींव येते. एक अवघड गोष्ट त्याला जमली नाही ! अत्यावश्यक असून जमली नाही ! राग तुम्हा तरुणांचा येतो. कारण तुम्हीं अजूनही या गोष्टींवर विश्वास ठेवताना आढळता. या गोष्टी सोडणे तुमच्या दृष्टीने सोपे आहे. कारण तुमचा जन्मच विज्ञानयुगात झाला. देशातील तरुणांना उद्देशून अच्युतराव एकदा म्हणाले होते, " या देशातले तरुण जिवंत असते तर अस्पृश्य स्त्रियांच्यावर अत्याचार करणाऱ्यांना त्यांनी हॉस्पिटलमध्ये पाठविले असते. हे घडले असते तर त्या तरुणांच्या बंडखोरीचा मला अभिमान वाटला असता ! " विज्ञानक्षेत्रातही आपण हेच म्हणू शकू. आपला प्राचीन आध्यात्मिक वारसा फार मौलिक आहे. पण त्याच्या नावावर जर कोणी जादूचे प्रयोग दाखवू लागला तर तुम्ही तरुणांनी त्या गोष्टीला विरोध केला पाहिजे. तुम्ही स्वतः त्यावर विश्वास ठेवता कामा नये. या अशा प्रयोगांच्या वेळी तुम्हा तरुणांनी तेथे निदर्शने केली, आणि काही नवे वैज्ञानिक प्रयोग करून दाखविले तर ते मी समजू शकेन !

दुसराही एक प्रश्न आहे. या देशातले वातावरण संशोधन करावयास अनुकूल नाही ही काही तरुणांची तक्रार मी खूप ऐकून राहिलोय. म्हणजे मग आम्ही जे जन्मभर केले ते काय संशोधनच नव्हते की काय ? काही जणांच्या मते आमचे संशोधन कमी प्रतीचेही असेल, पण ते संशोधन आहे हे तरी मान्य कराल ! —या देशातील वातावरण खूप ढवळलंय हे मलाही मान्य आहे. पण शेवटी शास्त्रज्ञाने

भोवतालची परिस्थिती वाकवून घ्यावयाची असते. आपल्या भोवतालचे वातावरण शेवटी प्रत्येकाने निर्माण करावयाचे असते. परदेशांतून आलेले तरुण या देशातील वातावरण संशोधनास अनुकूल नाही असे म्हणतात, आणि ते तरुण रूप, हुंडा आणि कुंडली या तीन गोष्टी पाहून लग्न करतात. तुम्ही तरुण कदाचित हसाल. पण एका नाजूक बाबतीत तुम्हांला थोडा आग्रहाचा सल्ला देतो. खरे पाहता शास्त्रज्ञाने आपल्या घरापासून भोवतालचे वातावरण संशोधनास अनुकूल बनवावयास हवे. शास्त्रज्ञाची सहधर्मचारिणी ही खऱ्या अर्थाने त्याची सहधर्मचारिणी हवी. अमेरिकेतील आणि इंग्लंडमधील प्रमुख शास्त्रज्ञांच्या बायका शास्त्रज्ञ आहेत. किमान विज्ञानप्रेमी आहेत. नोबेल पारितोषिक मिळविणाऱ्या जोडप्यांची नावे तुम्हांला माहीत असतील. फिशरचे गाजलेले पुस्तक त्याच्या बायकोने संपादित केलंय. आमच्या वेळी लहानपणी लग्ने होत. बायको फारशी शिकलेली नसे. तिच्याकडून संशोधनात मदत झाली नाही तरी त्रास होत नव्हता. शास्त्रज्ञ म्हणून नवऱ्याला कमी पैसे मिळाले तरी त्यात संसार करण्याची वृत्ती लहानपणापासून स्वीकारलेली होती. आज तरुण खूप उशीरा लग्न करतात. मुलींच्याही पैशाबद्दलच्या कल्पना आणि इतर आवडीनिवडी ठरलेल्या असतात......आणि इकडे शास्त्रज्ञाचे जीवन हे एक व्रत असते. एका वेगळ्या बेहोषीत आणि तंद्रीत ते आयुष्य सुरू असते. मग विसंवाद निर्माण होतो. शेवटी बायकोला दुखवणे नको म्हणून हे शास्त्रज्ञ आयुष्याची तडजोड करतात, किंवा घरातले वातावरण खूपदा बिघडवून टाकतात. शास्त्रज्ञाला संशोधनाला आवश्यक असे वातावरण जरूर हवे. पण ते इतर कोणी निर्माण करून आणून देत नाही. जीवनाचा जोडीदार निवडण्यापासून तरुण शास्त्रज्ञांनी या गोष्टीची जाणीव ठेवली पाहिजे !

## मी अजुन जहाज सोडलेले नाही !

बाबासाहेब आमटे यांची ती कविता तुम्ही बहुधा वाचली असेल. ते म्हणतात,

> ' लाटांच्या उग्र कल्लोळांना आणि पळणाऱ्या सैनिकांना कळू द्यात
> हे बुडणारे जहाज मी अजून सोडलेले नाही...... '

मी काही आमटे यांच्याएवढा मोठा माणूस नाही. पण निरनिराळ्या क्षेत्रांत राहून प्रामाणिकपणे काम करणाऱ्या, माझ्या पिढीतील इतर सैनिकांची आणि माझी भूमिका पण यापेक्षा फारशी वेगळी नाही.......आम्ही अजून हे बुडणारे जहाज सोडलेले नाही. पण हे जहाज सोडले नसले तरी या जहाजावरचा आमच्या पिढीचा ताबा सुटला आहे हे जाणवले आहे. मनाने तरुण असलो तरी शरीराने थकत चाललो आहो हे पण अधूनमधून जाणवते. या जहाजावरचा आमच्या पिढीचा ताबा सुटला यातही नवे काही नाही. तो तर सृष्टिक्रम आहे. पण आमचा ताबा

सुटला आणि हे जहाज भरकटत चालले आहे हे पाहवत नाही. ही जबाबदारी तर तुम्हा तरुणांची आहे.

खरे सांगावयाचे तर मला तुम्हा तरुणांना कोणताही उपदेश करावयाचा नाही. माझी तेवढी योग्यता आहे असे मी प्रामाणिकपणे समजत नाही. आयुष्यभर साध्या सैनिकाची भूमिका मी पार पाडत आलो. शेवटी तीच माझी आवडती भूमिका आहे. कृपया पुन्हा माझ्या मुलाखती घेण्यालाही येऊ नका. तुमच्यात आणि माझ्यात दोन-तीन पिढ्यांचे अंतर आहे. त्यामुळेही आपल्या मतात अपरिहार्यपणे फरक असतील. त्यातून अर्थशास्त्र, समाजशास्त्र या गोष्टींचा माझा फारसा अभ्यास नाही. पण मला वाटते या देशातील प्रश्न कळावयाला आणि सोडावयाला काही फार मोठ्या तत्त्वज्ञानाची जरुरी नाही. साधे व्यवहारज्ञान त्यासाठी पुरेसे आहे. स्वदेशी, स्वावलंबन, चोख प्रामाणिक कारभार, ज्ञानाबद्दलची तळमळ, सर्वस्व ओतून समोरचे काम करण्याची वृत्ती या तर शेवटी हिमालयाहून प्राचीन गोष्टी आहेत. या साऱ्या गोष्टींचा कडवा आग्रह धरीत असतानाच तुम्हांला आणखीही एक काम करावयाचे आहे. या देशाची प्राचीन परंपरा आणि सर्वश्रेष्ठ विज्ञान यांचा समन्वय तुम्हांला घालावयाचा आहे. तुम्हा तरुणांना मार्गदर्शन करतील असे माझ्यासमोर फारसे कोणी नाहीत, अशी कोणती यंत्रणाही नाही. तुम्ही तरुणांनीच आता तडफेने आणि जिद्दीने पुढे आले पाहिजे. अन्नस्वतंत्रतासंचलन, सोमनाथचे श्रममंदिर, या गोष्टींनी मी म्हणूनच आनंदित झालो होतो. पण हे प्रयत्न एकाकी आणि तुरळक ठरता कामा नयेत. तुम्ही तरुण किती प्रामाणिकपणे आणि तडफेने पुढे येता आणि स्वतःचे नवे मार्ग शोधता, यावरच शेवटी तुम्हांला आज अवघड वाटणाऱ्या प्रश्नांची सोपी उत्तरे अवलंबून आहेत. ○

## स मा प्त

# रंगभूमि

तामीळ गद्याचा मराठी अवतार.

## मेजर चंद्रकांत

नाटकातली व्यक्तिरेखा जेवढी उदात्त, तेवढे ते नाटक प्रेक्षकांपासून दूर जाते, की अधिक जवळ येते ? प्रतिष्ठा ही कारण नसतानाही मिळते आणि क्षुल्लक कारणाने जात असल्याने, घराण्याची प्रतिष्ठा वगैरे अट्टाहासाने सांभाळणारी माणसे चालू जमान्यात नाटकाचा केंद्रबिंदू तोलू शकतात काय ? मेजर चंद्रकांत हा मूळ तामीळ नाटकाचा, गुजराथी भाषेद्वारा मराठीत आलेला गद्यावतार रंगभूमीवर पाहून असताना असे काही प्रश्न सारखे त्रास देत होते. के. बालचंद्रन् यांचे मूळ तामीळ नाटक, हजाराहून अधिक प्रयोगांचे यश लाभलेले आहे, ही माहिती फारशी उत्साहवर्धक नव्हतीच. एक भयंकर तामीळ चित्रपट नुकताच पाहिला होता, त्याचा हा परिणाम असावा.

पहिल्या अंकात अंध मेजर चंद्रकांत देशमुख, त्यांची दोन मुले व महादू गडी यांचा परिचय झाला. मराठी नाटकांची सुरुवात खांद्यावर फडके टाकलेल्या घरगड्यापासून होण्याची सवय सुटलेली असल्याने खूप दिवसांनी ओळखीचा प्रवेश सुरू झाला. मेजरसाहेब अतिशय करारी, कर्तृत्ववान दिसत होते. अर्थात त्यांची दृष्टीही कोणत्या तरी कठोर कर्तव्यपालनात हरवलेली असावी हे लक्षात आलेच. मोठा मुलगा विश्राम हा पोलीस अधिकारी प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आहे व मेजरसाहेबांच्या अर्ध्या वचनात आहे, इत्यादी गोष्टी पाहून तिसऱ्या अंकात काहीतरी पोलिसी प्रकरण येणार आहे याचीही सूचना मिळाली होती. दुसरा मुलगा विक्रम हा शिकायला दूर राहत असतो, परंतु वाढदिवसाची आठवण होऊन घरी येणार असल्याने मेजरसाहेबांची उडालेली धांदल, महादू गड्याशी त्यांनी उकरून काढलेल्या विक्रमच्या आठवणी या पहिला अंक पुरेसा दीर्घ ठेवण्यास अतिशय उप-

योगी पडल्या. समेळ गुरुजींनी मेजर चंद्रकांत यांचा मित्र या नात्याने जो सूर लावला त्यावरून नाटकात थोडीशी मजा करण्यासाठी हे गुरुजी आता अधून-मधून येत राहणार हे लक्षात आले. समेळ गुरुजी येत राहतात ते आपल्या मुलीचे लग्न विश्रामशी जमावे या उद्देशाने.

पहिल्या अंकानंतर आलेल्या मध्यंतरात माझ्या मागील रांगेतील एका व्यक्तीने माहिती पुरवली–' ऊंचे लोग ' हा चित्रपट याच नाटकावर निघालेला आहे. याची ' ऊंचे लोग ' मी पाहिलेला नसल्याने दुसऱ्या अंकाचा पडदा वर का गेला या उत्सुकतेने पुन: सावरून बसणे आले.

मेजर चंद्रकांत यांचा मुलगा विक्रम हा प्रत्यक्षात जरा साधाभोळा, कोवळा दिसत होता तसा तो नाही. त्याने कॉलेजात असतानाच घराण्याच्या अब्रूला धोक्यात आणण्याचे उद्योग सुरू केले आहेत, याची जाणीव या अंकात होते ती त्याच्या नावे आलेल्या मधू नावाच्या मुलीच्या पत्राने: तिला दिवस गेलेले आहेत व विक्रम हा आता तिला टाळीत आहे, ही गोष्ट विश्रामला कळते; परंतु अंध पित्याला पत्रातील मजकुरात फिरवाफिरव करून तो पत्र वाचून दाखवतो व अंधारात ठेवतो. विक्रमला मात्र तो तातडीने त्या मुलीला भेटण्यासाठी रवाना करतो. ती मुलगी तिकडे आत्महत्या करते.

तिसऱ्या अंकात एक खुनी तरुण रात्रीच्या वेळी खिडकीतून घरात येतो व मेजर चंद्रकांत त्याला आश्रय देतात. बहिणीला विक्रमपासून दिवस गेले व त्याने तिला निराधार केल्यामुळे तिला आत्महत्या करावी लागली, या अन्यायालाच न्याय देण्यासाठी. विक्रमचा खून करून मधूचा भाऊच नकळत मेजर चंद्रकांतांच्याच बंगल्यात शिरतो. योगायोगाचा इतपत उपयोग मराठी नाटकांत नेहमीचाच असल्याने यात विशेष काही कृत्रिमता वाटली नाही. नाटकाला या वेळी रंग भरू लागला. एखाद्या स्त्रीच्या हत्येस कारणीभूत झालेल्या तरुण मुलाचा तडकाफडकी निकाल लावणारा हा तिसऱ्या अंकातील अतिथी प्रेक्षकांची सहानुभूती मिळवू शकला. प्रत्येक खून हा १०० टक्के निषेधार्ह नसतो, ही गोष्ट मराठी रंगभूमीवर पचू शकते हे पाहून बरे वाटले.

कर्तव्य की प्रेम असा संघर्ष मेजर चंद्रकांत व पोलीस अधिकारी विश्राम यांच्यापुढे उभा राहतो असे संवादांतून दाखवले जाते. भावाचा खून करणाऱ्या खुनी माणसाला पकडताना विश्रामपुढे काही संघर्ष असण्याचे कारण नाही. बापावर प्रेम असूनही, खुनी माणसाला आसरा दिल्याबद्दल बापाला अटक करण्याची जरुरीच होती का ? वडिलांना घरात शिरलेला अतिथी हा आपल्या मुलाचाच खुनी आहे ही गोष्ट ठाऊक नव्हती आणि ठाऊक असती तरी आपल्याच मुलाने त्याच्या बहिणीला दगा दिला आहे, ही गोष्ट माहीत झाल्यावर मेजर चंद्रकांत यांचे मुलावरील प्रेम फार वरच्या पातळीवर रंगवण्याचे कारण नाही ! प्रेमापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे,

अशा तऱ्हेचे काही नाटकात आहे असे मला जाणवले नाही. कायदा श्रेष्ठ आहे आणि कायद्याने मिळणारा न्याय हा विलंब लावीत असल्याने एखाद्या वेळेस माणसाला कायदा हातांत घेऊन खून वगैरे पाडावासा वाटला तर ते कृत्यदेखील सहानुभूती मिळवू शकते, असा या नाटकाचा परिणाम होतो.

मला वाटते, नाटकाचा हा जो कदाचित लेखकाला अभिप्रेत नसणाराही परिणाम होतो तो निराळा असल्याने महत्त्वाचा आहे. वसंत सबनीस यांनी या नाटकाचे संवादलेखन कौतुकास्पद केलेले आहे. समेळ गुरुजींच्या मुलीला एकदा पाहण्याची इच्छा, मेजर चंद्रकांत यांनी व्यक्त केली होती. आम्हा प्रेक्षकांनाही ती मुलगी पाहण्याची इच्छा दुसऱ्या अंकाच्या अखेरीपर्यंत सारखी होत होती. कारण नाटकात स्त्री पात्रच नसल्याने या मुलीचे दर्शन झाले असते तर नाटकात अधिक गोडवा येण्याची शक्यता वाटत होती. अर्थात तिसऱ्या अंकाच्या सुरुवातीनंतर वसंत सबनीसांनी नाटकात स्त्री-पात्रच नाही याची खंत शिल्लक ठेवली नाही हे मोठेच यश म्हटले पाहिजे.

अंध मेजर चंद्रकांताची भूमिका दीनानाथ टाकळकरांनी केली, की मेजर टाकळा करांची भूमिका चंद्रकांत नावाचा कुणी मोठा गुणी नट तर करत नव्हता ना, असा संभ्रम पडावा इतकी ही भूमिका टाकळकरांनी समंजसपणे केली. दीनानाथ टाकळकरांच्या अभिनयसंपन्नतेचा परिचय घडावा यासाठी तरी हे नाटक रसिकांनी पाहिले पाहिजे. अतिशय सुंदर !

सतीष दुभाषींनी केलेले विश्रामचे काम आणि कमलाकर सारंग यांनी विक्रमच्या खुन्याचे केलेले काम ही दोन्ही टाकळकरांच्या शब्दफेकीशी पैजा घेणारी ठरली. नाटक मुंबई मराठी साहित्य संघासारख्या मातब्बर संस्थेने सादर केलेले व दिग्दर्शन दामू केंकरे यांचे असल्याने नाटकाची निर्मितिमूल्ये उत्तम होती, हे सांगण्याची आवश्यकता नाही.

—वि. ग. कानिटकर

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

**मेष** : सध्याचे आपले ग्रहमान अनिष्टच. पण पूर्वीपेक्षा पुष्कळच चांगले एवढेच. समाधान.

श. रा. मं. तिन्हीही ग्रहांनी तुमच्या विरुद्ध बंड पुकारल्यासारखे जाणवू लागेल. गुरू काहीसा अनुकूल आहे आणि शिक्षण क्षेत्रात–सांपत्तिक व्यवहारात घवघवीत यश मिळवून दाखवाल. पण हे मिळणारे यश सहजसुलभ नाही. धावपळ–घडपड सतत करावीच लागेल. वाढत्या खर्चाला आळा घालायचा शिकस्तीचा प्रयत्न करा. कोणतीही गोष्ट अनवधानपणे करू नका.

दि. २३ ते २८ या कालात अनेक लाभाचे योग येतील.

**वृषभ** : जीवनात चढ-उतार, यशापयश असायचेच. असे घडणे हा शाप नव्हे, वरदान होय. अनिष्ट कालात जिद्द डिवचली जाते–आणि प्रयत्नवाद उफाळून येतो. हे दिवस असेच आहेत. या आठवड्यातील रवि-हर्षल त्रिकोणयोगामुळे, आजवर कधी कुणालाही मिळाले नसेल असे नेत्रदीपक यश तुम्ही मिळवून दाखवाल. प्रयत्नांची शिकस्त केल्याने अनिष्ट कालावरही जास्त विक्रमी विजय मिळविता येतो याचे साक्षात उदाहरण म्हणजे आजच्या वृषभराशी व्यक्ती. या आठवड्यात गुरु–सूर्य-त्रिकोणही घडणार आहे. (२६ जानेवारी) तो तुमचे महत्त्व व माहात्म्य वाढवील. तुम्हांला हवे ते देऊन जाईल. तुमच्या साऱ्या अपेक्षा सफल करणारा हा काल आहे.

दि. २६–२८–३१ या कालाची नोंद ठेवा.

**मिथुन** : आजवर तुम्हांला जे थोडेफार यश मिळाले आणि यापुढेही मिळेल ते ग्रहांच्या अनुकूलतेमुळे नव्हे–ते सारे तुमच्या अविश्रांत परिश्रमाचे फल. प्रयत्नशील मानव काय अचाट कार्य करू शकतो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मानवाचे चंद्रावरील उड्डाण.

# दिनांक २६ जानेवारी ते ३१ जानेवारी १९६९ चे राशी भविष्य

## श्री. गो. जोशी सायनाचार्य

आजवर तुमची निष्ठा आणि तुमचा प्रयत्नवादच तुम्हांला साथ देत आला आहे. यापुढेही देईल.

नोकरीधंद्यांत विक्रमी यश मिळवाल, शास्त्रीय–संशोधनक्षेत्रात जगाच्या नजरा तुमच्यावर रोखल्या जातील असे काही लोकविलक्षण कार्य करून दाखवाल. सांपत्तिक योगही आता सुधारू लागल्याचा प्रत्यय यायला लागेल. मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पाडू शकाल.

दि. २६–२८–३० अपेक्षेबाहेर यश पदरी पडावे.

**कर्क :** या आठवड्यातील सूर्य-गुरुत्रिकोणयोगच तुमचे भवितव्य घडविणार आहे. चौथ्या मंगळाला लुडबूड करायला जागाच नाही.

संपन्न व थोर भागीदारांच्या साहाय्याने फार मोठे व्यापारी साहस कराल आणि परिणामी ते साहस घवघवीत यश घेऊन उठेल. नव्या योजना आकार घेऊ लागतील. प्रगतीच्या व धनोत्पादनाचे नवे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील.

अनारोग्य, सांपत्तिक पेचप्रसंग, प्रगतीतील अडथळे सारे सारे दूर होतील.

स्थावराची विवंचना मिटण्याची लक्षणे दिसायला लागतील.

दि. २६–२७–२८ अपेक्षित यश पदरी पडावे.

**सिंह :** हा आठवडा तुमच्या जीवनात चिरंतन स्मृतीचा ठरावा असे या वेळच्या अनुकूल ग्रहस्थितीचे आपणांस आवर्जून सांगणे आहे. सूर्य-हर्षल त्रिकोण, सूर्यगुरुत्रिकोण या दोन्ही अनन्यसाधारण योगांचा आपल्या जीवनावर, चारित्र्यावर,

आचारविचारांवर प्रकर्षाने परिणाम व्हावा.

नव्या कल्पना आकार घेऊ लागतील. व्यावसायिक क्षेत्रात काही भव्य दिव्य घडू शकेल. स्थलांतर–स्थित्यंतरही घडेल. आपले जे जे व्यवसायक्षेत्र असेल त्याला याच काली उत्थान मिळेल. अस्वास्थ्य, उद्वेग, नैराश्य सारे सारे इतिहासजमा होईल. आणि अंतःकरण उत्साहाने भरून येईल.

दि. २६–३०–३१ या कालाचे महत्त्व आपण विसरू शकणार नाही.

**कन्या :** आठवड्यातील रवि-गुरुत्रिकोणच तुमचे भवितव्य ठरविणार आहे. आजवर जे घडू शकले नाही ते या काली सहजासहजी घडून यायला लागेल.

शिक्षण, साहित्य, राजकारण कोणत्याही क्षेत्रात आपले पदार्पण घडले तरी तेथे आपणांस अपेक्षेबाहेर यश मिळू शकेल.

अनेकांच्या सहकार्याने नवे क्षेत्र हस्तगत कराल. कला, नाट्य, साहित्य क्षेत्रांत तुमची प्रतिष्ठा उंचावेल, नवे क्षेत्र हस्तगत होईल. आणि तिथे तुम्हांला प्रतिस्पर्धी राहणार नाही. वैचारिक संघर्ष मिटतील, आणि सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

दि. २५–२८–२९ या वेळी आपले बरेचसे हेतू सफल होतील.

**तूळ :** मंगळाची उग्रता संपुष्टात यायला लागलेली असल्याने आता आपणांस मागे रेंगाळण्याचे कारण नाही. आजवरच्या साऱ्या स्थगित कार्यांना गती मिळू लागेल.

या आठवड्यातील सूर्य-गुरुत्रिकोण तुमचा राहत्या जागेचा प्रश्न सोडवील, अनारोग्याची विवंचना मिटवील, व्यवसायक्षेत्रातील कटुता दूर करील. अपेक्षे-प्रमाणे घवघवीत यश जरी या वेळी मिळाले नाही तरी भविष्यकाली घडून येणाऱ्या अनुकूल घटना येथूनच आकार घेऊ लागतील.

सामाजिक राजकीय क्षेत्रांतही तुमचे स्थान निश्चित उंचावेल.

दि. २५–२९–३१ हा विशेष अनुकूल काल.

**वृश्चिक :** गुरु-शुक्र आणि सूर्य सारे समर्थ ग्रह तुमच्या पाठीशी उभे आहेत. आता तुम्हांला शनिमंगळांची दखल घ्यायची गरजच नाही. सहज पाऊल टाकलेत तरी तो पवित्राच ठरेल.

दि. २६ जानेवारीच्या रवि-गुरुत्रिकोणापासूनच तुमचे चारित्र्य आकर्षक बनू लागेल.

वैद्यकीय-वैज्ञानिक क्षेत्रांत तुमचे महत्त्व खूपच वाढेल. हुकलेली संधी पुन्हा लाभेल, सांपत्तिक पेचप्रसंग तर सुटेलच शिवाय अनपेक्षित स्वरूपाचे लाभही पदरी पडू लागतील, दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल, राजकीय क्षेत्रातील बरेचसे पेचप्रसंग सोडविण्यात यशस्वी व्हाल.

दि. २५–२८ अपेक्षित यशाचा काल.

**धनु :** धनु राशीच्या साऱ्या व्यक्तींचे नष्टचर्य आता संपल्यासारखेच आहे. चौथ्या शनीचा त्रास आता सहसा होणार नाही. हरवलेले स्वास्थ्य गवसेल, इष्टमित्रांचे सहकार्य लाभेल, नोकरीधंद्यासाठी केलेले प्रयत्न आता यश घेऊन उठतील.

स्थावरातील सर्व समस्या सुटू लागतील, कोर्टकचेरीतील वादविवाद संपुष्टात येतील. नोकरीधंद्यात बदल करण्याचे विचार मात्र डोक्यात येऊ देऊ नका. आहे तेच क्षेत्र आज ना उद्या आपणांस अपेक्षेप्रमाणे फलदायी ठरेल.

दि. २६–२८–३० या काळी अनुकूल वातावरण दिसू लागेल.

**मकर :** या आठवड्यातील सूर्य-गुरुत्रिकोण अधिकाधिक फलदायी कोणाला होणार असेल तर तो फक्त तुम्हा मकरराशी व्यक्तींनाच.

नोकरीधंद्यात प्रगतीच्या नव्या वाटा दिसू लागतील, मंगलकार्याचे ठरेल, बदली-बढतीचे योग कोणत्याही क्षणी दिसू लागतील.

सामाजिक पुढारीपण सहजासहजी लाभेल, राजकीय क्षेत्रात सतत आघाडीवर राहू शकाल.

साहित्यिकांना तर आजच्या इतका सर्वांगाने अनुकूल काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल.

आपणांस अधिकाधिक पुढे सरकण्याची संधी याच वेळी लाभेल.

दि. २६ ते २९ सर्वोत्तम यश देणारा काल.

**कुंभ :** गेल्या आठवड्यापासून तुमची पावले प्रगतीकडे पडू लागलेली आहेत. या वेळचा सूर्य-गुरुत्रिकोण तुम्हांला गतिमान करील. इष्टमित्रांची कृपा, थोरांचे सहकार्य, सर्व काही लाभेल आणि त्यामुळे कोणत्याही कार्यात यश मिळविणे सहज-सुलभ होईल.

धार्मिक मंगलकार्यासाठी प्रवास घडेल, नोकरीधंद्यात पुढे पाऊल पडेल. साहित्य-संशोधन याही क्षेत्रांत अनन्यसाधारण यश मिळवू शकाल. तुमची साडेसाती आता संपल्यात जमा आहे. आता मागे राहिलात तर पश्चात्तापाची पाळी येईल.

दि. २६–२८–३१ अपेक्षित यश देणारा काल.

**मीन :** गुरु-सूर्यत्रिकोण तुमचे भवितव्य ठरविणार आहे. असा शुभ योग पुन्हा लवकर होणार नाही. म्हणूनच तो अलौकिक, अनन्यसाधारण कार्य करून जाईल.

अनपेक्षित लाभ होतील. राजकीय क्षेत्रातील फार मोठ्या व्यक्तींशी स्नेहसंबंध जुळून येतील.

कला, नाट्य क्षेत्रांत तर असे काही कार्य करून दाखवाल की, त्यामुळे तुमची प्रतिष्ठा खूपच उंचावेल.

स्थावराचा प्रश्न सुटेल. मंगलकार्याचे निश्चित ठरेल. सांपत्तिक लाभ मोठ्या प्रमाणावर होतील. नवे स्नेहसंबंध जुळून येतील.

दि. २६–२९–३० अत्युत्तम काल. ○




# निजामाचे मृत्युपत्र

ब. मो. पुरंदरे

दख्खनच्या राजकारणात निजाम उल मुल्ख हा एक मोठा जबरदस्त माणूस होता. अकलेचा खंदा मुत्सद्दी. दख्खनच्या सहा सुभ्यांची दौलत निजाम सांभाळीत होता. दिल्लीत मोगल दरबारातील मुत्सद्यांना त्याने बोटावर खेळविले. मराठ्यांनी पराक्रमाने ह्या चिवट निजामाला अनेकदा रणांगणावर चोपले. तरीही निजाम शिल्लक राहिलाच ! धूर्तपणा, दूरदर्शीपणा आणि बेडरपणा त्याच्या अंगी रोमरोमी भिनलेला होता. तेच त्याचं सर्वांत मोठं बळ होतं. निजाम जगलाही खूप. मरताना ऐंशी वर्षांच्या वर त्याची उमर होती. त्याला पाच मुलगे होते. त्यांतील सर्वांत थोरला फिरोजजंग गाझीउद्दीन हा नेहमीच दिल्लीला असे. बाकीचे चौघे दक्षिणेत निजामापाशी असत.

निजाम अधिकाधिक थकत चालला, तेव्हा त्याच्या पोरांच्यात चुळबूळ सुरू झाली. बाप मेल्यावर राज्य कोणाला मिळायचे ? उघड उघड चर्चा करायची कोणाची हिम्मत नव्हती. मग या संबंधी बापाला विचारायची तर गोष्टच सोडा ! परंतु या त्यांच्या चुळबुळीची कल्पना निजामाला होती. खरं म्हणजे आपल्या पोरांपैकी एकाही पोराबद्दल त्याच्या अंतःकर

णात उत्कट प्रेम नव्हते ! कारण शौर्य किंवा मुत्सद्देगिरी ह्या बाबतीत पहिली चार पोरं तर अगदीच शामळू होती. सर्वांत धाकटा पोरगाच जरा चलाख होता. अन् निजामाचे प्रेम होते आपल्या नातवावर ! म्हणजे मुलीच्या मुलावर.

एक दिवशी निजाम एकटाच आपल्या महालात कागद आणि लेखणी घेऊन बसला होता. तेवढ्यात तेथे त्याची मुले आली. त्यांत नातूही होता. सर्वांनी नम्रतेने निजामाला कुर्निसात करून विचारले,

" आपण काय लिहीत आहात ? "

निजामाने किंचित स्मित करीत उत्तर दिले,

" वसीयतनामा ! "

पोरं चमकली ! वसीयतनामा म्हणजे मृत्युपत्र ! पोरं काहीच न बोलता गंभीरपणे कुर्निसात करीत करीत मागे फिरली. तेथून निघून गेली. वास्तविक प्रत्येकाचाच तो जिव्हाळ्याचा विषय होता ! म्हाताऱ्या निजामाचा वसीयतनामा.

निजाम त्या पोरांकडे पाहत राहिला. पण बोलला मात्र काहीच नाही. खरं म्हणजे तो वसीयतनामा वगैरे काहीही लिहीत नव्हता ! अजून त्यांचा कागद कोराच होत पण पोरांनी 'काय लिहिता ?' म्हणून विचारल्यावर मात्र त्याने झटकन उत्तर दिले होते, " वसीयतनामा ! "

पोरं निघून गेल्यावर निजामाने आपली लेखणी लगेच शाईत बुडवली आणि कोऱ्या कागदावर फक्त दोन वाक्यांचा मजकूर लिहिला आणि तो कागद तसाच तेथे ठेवून तो त्या महालातून निघून गेला.

वसीयतनाम्यात ह्या म्हाताऱ्यानं लिहिलंय तरी काय हे जाणायची पोरांना चुटपूट लागली होतीच. निजाम निघून गेल्यावर सगळी पोरं आशेने त्या महालात शिरली. कलमदानाच्या शेजारी एक कागद होता. त्यावर फक्त दोनच वाक्ये लिहिलेली होती. अधीरतेने त्यांनी ती वाचली—

'नान तहहयात दौलत ब करामत.'

ही वाक्ये वाचल्याबरोबर सर्वांचेच चेहरे पाहण्यासारखे झाले. ह्या वाक्यांचा अर्थ असा : पोटाला भाकरी जन्मभर मिळेल ! दौलत (म्हणजे राज्य) हवे असेल तर करामत ( कर्तबगारी ) अंगी हवी !'

○

........................

येथेच अधूनमधून पुरवून गेला. ' माणूस 'च्या छपाईचा दर्जा त्यांनी खूप उंचावर नेऊन ठेवला. मालक बाबासाहेब गोखले यांच्याशी माणूसमधून आलेल्या एखाद्या राजकीय विषयावर खडाजंगी उडाली नाही असा एक आठवडा येथे उलटला नाही. कारण ते पडले डावे आणि माणूसची भूमिका प्रागतिक राष्ट्रवादी. या असल्या वेळीअवेळीच्या बैठकांमुळे आणि उद्योगांमुळे माणूस-कार्यालयातील नोकरवर्ग पुष्कळदा जेरीस येई, कामाचा ताण कमीजास्त पडे. पण कचेरी असली तरी वातावरण आणि वागणूक घरच्यासारखी असल्याने कोणी नाराज, रुष्ट झाले नाही. राग आले, गेले. निरनिराळ्या योजनांत सगळेच उत्साहाने सामील झाले. पॅकर शंकर मराठे वेरूळला संचलनासाठी आलेला होता तर खुर्चीला नेहमी चिकटून असलेले गणपत्ये ' युक्रांद' च्या तरुणांबरोबर सुप्याला विहिरीचे पाणी ओढीत होते, सगळ्यांचा डोळा चुकवून रात्री त्यांच्यापैकी काहींकडून ' ट्विस्ट ' चे धडेही उचलीत होते. गंधे यांचे दोनाचे चार हात येथे झाले. सौ. निर्मला पुरंदरे, दिलीप माजगावकर ही नव्या दमाची कुमकही येथेच येऊन दाखल झाली.

आता हे राजहंस-माणूस-कुटुंब आपले तिसरे स्थलांतर करीत आहे—नागनाथ पाराजवळील सरदार मळेकर यांची वास्तू, १०२५ सदाशिव, पुणे. येथे आता कोणत्या उलाढाली होतात, जुन्यापैकी काय राहते, काय जाते, नवे कसे रुजते, बहरते हे सर्व भविष्याच्या पडद्याआड लपून आहे. आठ वर्षांपूर्वी १०१५ सदाशिवच्या माळ्यावर उगवलेले हे रोपटे या १०२५ सदाशिवच्या ' मळ्या 'त केवळ आडमाप वाढले, ताडमाड उंचावले तर त्यात फारसे प्रेरक, स्मरण ठेवावे असे काही असणार नाही. या वाढीमुळे इतरांच्या विधायक प्रवृत्तींना किती चालना मिळते, पुरुषार्थाला किती जाग येते, प्रागतिक राष्ट्रवादाची ध्वजा किती उंचावते यांवर तिचे खरे मोल अवलंबून आहे. आजवर काही प्रमाणात हे मोल लाभले नसेल किंवा पुढेही वाढत्या प्रमाणात लाभणार नसेल तर संपादकीय दृष्टिकोनातून तरी हा सारा खटाटोप व्यर्थच ठरेल. जगावे-वाढावे, जगण्या-वाढण्याला काही अर्थ प्राप्त करून देता येत असेल तर. नाहीतर पशुपक्षी आणि माणूस यांत फरकच नाही. हा अर्थ मग ज्याचा त्याचा कोणताही असू दे. ज्याला त्याला नाहीतरी आपले अर्थ आणि आदर्श हे शोधूनच काढावे लागतात. आयते तयार जे उचलले जातात ते केव्हा ना केव्हा गळूनही पडतात. प्रत्येकाला हा शोध घेण्याचा हव्यास जडावा, असलेल्यांचा वाढावा हीच या भव्य ऐतिहासिक वास्तूत प्रवेश करताना ' माणूस 'ची शुभ कामना आहे.

**—संपादक**

♣ ♣

♣ ♣

♣ ♣

♣ ♣

♣ ♣

# डी. बी. बांदोडकर ॲन्ड सन्स

पणजी

गोवा

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४, येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**